श्रीहर्ष.

हा निबंध,

पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी

बाणभट्ट, कादंबरीसार, मित्रचंद्र, हंसिका, षड्ऋतुवर्णन, कृष्णाकुमारी, बोधामृत इ० पुस्तकांचे कर्ते,

यांनीं

अनेक इंग्रजी ग्रंथ, शिलालेख, ताम्रपट व संस्कृत ग्रंथ यांच्या आधारानें

तयार केला.

तो
मुंबई येथें
रा. हरि गोविंद लिमये यांनीं 'मुंबईवैभव' स्टीम प्रेसमध्यें
मालकांकरितां छापिला.

आवृत्तिं पहिली.

शके १८३३ सन १९११

किंमत बारा आणे.

प्रकाशकः—पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी, ४००, शनिवार पेठ, पुणें.

विद्वान् व विद्वत्प्रेमी राजाश्रीहर्ष याची देशकाल वर्तमानानुरूप बरोबरी करणारे.

श्रीमंत.

सयाजीराव महाराज गायकवाड

सेनाखासखेल समशेर बहाद्दर

यांस

यांचें ठायीं दिसून येणारें विद्याव्यसन, विद्याप्रसाराचे कामीं
औदार्य, स्वाभिमान, स्वदेशप्रीति, प्रजावात्सल्य इ.
अनेक गुणांचे अभिनंदनार्थ.

ग्रंथकर्त्यानें

हें पुस्तक

परमादरानें अर्पण केलें आहे.

अभिप्राय.

I have gone through the Marathi essay on "*Shriharsha*" written by Pandurang Govind Shastri Parkhi for the Sahitya Sammelan of Baroda. *It puts together all the available information about This great Emperor of India* who flourished in the 7 th century A. D., and who was a great patron of learning and learned men. Pandurang Shastri has also brought under review the three Sanskrit Dramas Composed by this Emperor-Poet, *and has conclusively shown that he was undoubtedly the author of these three dramas*. Pandurang Shatri has at the end of his essay critically examined some of the theories of Dr. Hoernle in connection with the events, dates, and personalities connected with Shriharsha's life and shown that these theories are untenable. *In short this essay is full of interest and information* and deserves to be separately printed, as the secretary to the Baroda Sahitya Sammelan opines. I have no doubt that persons interested in the development of Marathi literature will liberally help Pandurang Shasti Parkhi, in printing his valuable paper.

Bombay,
3—2—11. } (Sd.) *C. V. Vaidya. M.A.LL.B.*

The office of literary criticism is to encourage the literary art and to promote due appreciation of the merits of literary artists by the exposition of true canons of literary criticism, by the discovery of the hidden beauties in literary works and by the examination of the merits as well as the demerits of authors. Judged from this standpoint Mr. Parkhi Shastree's work is an excellent example of literary

criticism. He has not only studied his author's works completely but has successfully tried to enter into the spirit of the times in which the poet Bana and the patron Shriharsha flourished, and has also laid under requisition the vols. of the Epigraphia Indica to determine his author's position in ancient Indian History. The book as a critical study of the poet and the patron is a perfect success and will serve as a model for future workers in the critical branch of literature.

Mr. Pandurang Shastree has also shown great critical acumen and independence of judgment in censuring many of the vagaries of Western Scholars. And to my mind he is right in doing so. Western professors, in spite of their boasted critical faculty, lack in that moral feeling of sympathy with our manners and customs which is so essential for the true appreciation and even the understanding of literature. Besides this their knowledge of the Sanskrit language as such is bound to be meagre. Without this moral relation between the critic and the author literary criticism degrades into a mere vanity, a mere farce. To conclude, the Shastri's work deserves substantial patronage at the hands of the learned reader.

Poona, 7th March } (Sd.) K. B. Pendse, M. A.

वे. शा. सं. रा. रा. पांडुरंग शास्त्री पारखी यांचा नवीन ग्रंथ 'श्रीहर्ष' मी वाचिला. प्रकृति अस्वस्थ असल्यानें जितका जपून वाचायाला हवा होता तितका वाचून झाला नाहीं. तरी श्रीहर्ष–बौद्धांच्या कसास उतरलेला महाराजा आणि—कवि—यासंबंधानें जी माहिती 'हर्षचरित,' हुएनसँगचा ग्रंथ, श्रीहर्षाचीं नाटकें,—विशेषतः अलीकडे उपलब्ध झालेलीं ताम्रपत्रें, नाणीं, शिक्के इत्यादिकांवरून मिळण्यासारखी आहे, ती यांत एक एक कुसुम अशी गुंफिली आहे. ती देतांनां युरोपियन पंडितांच्या मानांचा सर्वस्वी स्वीकार शास्त्रीबोवांनीं केला नाहीं. उलटपक्षीं आपल्या देशांतलें प्राचीन ज्ञान वगैरे उत्तमोत्तम, हीहि अंधभक्ति स्वीकारिली नाहीं. डॉ. होर्नलेच्या लेखांवरील त्यांची टीका वाचण्यासारखी आहे, तीवरून इतिहाससंशोधकांनां संस्कृत ग्रंथांचा परिचय मुळाशींच

असावा लागतो-भाषांतरावरून निर्वाह होत नाहीं—व तर्कबुद्धि व्यवस्थित पद्धतीनें चालविणें अवश्य आहे, हें दिसून येईल.

श्रीहर्ष हा ग्रंथ ' बाणा ' च्या जोडीचा आहे. दोहोंतहि त्यांचें लेखनचातुर्य, रसिकता, शोधकबुद्धि व संस्कृत वाङ्मयाचा परिचय, हीं उत्कृष्ट दिसून येतात. मराठी भाषेंत जसे ग्रंथ हवे आहेत, तशांतला हा एक आहे. हा विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडेल तसाच बहुश्रुत वाचकांस बोधप्रद होईल. यास उदार आश्रय मिळेल, अशी आशा आहे.

अकोलें. ता. १८–२–११. } (सही) वि. मो. महाजनी. एम्. ए.
(ए. इनस्पेक्टर. प्रांत वऱ्हाड.)

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री **पांडुरंग** शास्त्री पारखी मुक्काम–पुणें यांचे सेवेशीः—

शिष्य हरि भडकमकर याचा कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.आपण आपली नवीन कृती 'श्रीहर्ष' मजकडे अवलोकनार्थ पाठवीली ती समग्र वाचली. आपल्या पूर्व कृतीस या नवीन ग्रंथाची जोड चांगलीच झाली आहे. या दोन ग्रंथांपासून कविमुकुटमणि–बाण–व त्याच्या अत्युदार मार्मिक, धार्मिक, रसिक व विद्याविनयसंपन्न आश्रयदाता श्रीहर्ष या दोघांची व त्यांचे समान कालीन कांहीं प्रसिद्ध व्यक्तींची उत्तम प्रकारें ओळख करून घेण्याचें मराठी वाचकांस उत्तम साधन झालें आहे. तसेंच श्रीहर्षाचा काल व त्याचें जीवनचरित्र यांविषयीं सयुक्तिक अनुमानें कोणतीं या बद्दल वाचकांस चांगला बोध होईल. श्रीहर्षाच्या कृतींचें जें संक्षिप्त वर्णन दिलें आहे त्यावरून हे तिन्ही ग्रंथ थोडक्यांत मार्मिकपणानें समजून घेण्याचें वाचकांस श्रेय येईल, व या तिन्ही कृती एकाचेच हातन घडल्या गेल्या आहेत व तो कर्ता राजकवि श्रीहर्षच स्वतः असला पाहिजे या विषयीं संशय राहाणार नाहीं.

सारांश ही आपली कृति सर्वांशीं आदरणीय झाली आहे, व मराठी भाषेस हें उत्तम पुष्प जोडल्याचें श्रेय आपणांस आहे. आपली प्रकृति वृद्धापकालानें फार अशक्त असल्याचें समजलें. परमेश्वर आपणास आरोग्य देवो व आपणाकडून अजूनही वाग्देवीसेवा घडवून आणो अशी प्रार्थना करितों.

कळावें सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

आपला नम्र शिष्य.
(सही) **हरि महादेव भडकमकर**, एम्. ए.
संस्कृत प्रोफेसर विल्सन कालेज.

प्रस्तावना.

आज सुमारें दोन वर्षें झालीं. बडोदें येथील ग्रंथकारांच्या संमेलनास हजर राहण्याविषयीं मला निमंत्रणपत्रिका आली होती. परंतु मी आजारी असल्यामुळें मला जातां येणें शक्य नव्हतें तथापि तेथें जमणाऱ्या विद्वज्जनांची विशेषतः या विद्वत्समूहाचे पुरस्कर्ते जे श्रीमंत **सयाजीरावमहाराज गायकवाड** यांची आपण कांहींतरी अल्प स्वल्प सेवा करावी असें मनांत घोळूं लागलें. परंतु प्रकृति नीट नसल्यामुळें ' उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ' या न्यायानें मनांतले हेतु मनांतच उत्पन्न होऊन ते नाहिंतसे होऊं लागले ! त्यांतून खरोखरीच विद्यादरिद्र्याच्या मनाची अशी डळमाळित स्थिति होणें हेंहि सहाजिकच आहे ! असो स्वकीय राजाच्या राजधानीच्या ठिकाणीं विद्वत्संमेलन व्हावयाचें आहे तेव्हां पूर्वी (पूर्वकालीं) सज्जन व विद्वान् बंधूंच्या द्वारें अशाच विद्वान् व उदारधी विख्यात पूर्व–राजाचें व विद्वानांचें अशा प्रकारचें संमेलन होऊन परस्परांचा परस्परांस उपयोग झालेला आहे तेव्हां अशा विषयावर निबंध लिहिण्याचें जमलें तर पहावें, असें मनांत आलें. त्याप्रमाणें यथावकाश पूर्वकालीन विद्वान् व विद्वत्प्रेमी राजा **श्रीहर्ष** याजवर मी निबंध लिहून व श्रीमत्सयाजीराव यांजवर संस्कृत कविता करून संमेलनाचे चिटनिसांकडे पाठविल्या, पैकीं कविता संमेलनाच्या छापील रिपोर्टांत प्रसिद्ध झाल्या आहेत. श्रीहर्षनिबंधासंबंधानें सदर चिटनीस यांनीं असें कळविलें कीं " आपला निबंध चांगल्या माहितीनें भरलेला आहे तो स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध होण्याजोगा मोठा आहे. रिपोर्टांत छापण्यासारखा नाहीं. " नतंर कांहीं दिवसांनीं सदर निबंध संमेलनाचे विद्वान् अध्यक्ष व कवि डॉ. **कर्नल कीर्तिकर** यांजकडे वाचण्याकरितां दिला. तो वाचून पाहून आपला अनुकूल अभिप्राय प्रदर्शित करतांनां त्यांनीं असेंहि कळविलें कीं तुमचें पुस्तक चांगलें आहे, सबब तें प्रसिद्ध होण्याच्या कामीं कांहीं मदत करावी असें मला वाटतें. व त्यानंतर लौकरच सदर निबंध छापण्याच्या खर्चाची सर्व जबाबदारी आपणावर घेऊन तो छापण्याविषयीं त्यांनीं येथील ज्ञानप्रकाश छापखान्याचे व्यवस्थापकांस सांगितलें. डॉक्टरसाहेबांचें मजवरील हें विद्याविषयक प्रेम केवळ निरपेक्ष असेंच होतें; कारण पुस्तक प्रसिद्धीच्या कामीं मला उदार आश्रय देऊन वरती सदरहू निबंध मी श्रीमान् सयाजीरावमहाराज यांस अर्पण करावा असें त्यांनीं आपण होऊन सुचविलें. डॉक्टरसाहेबांच्या ह्या औदार्याबद्दल मी त्यांची कितीहि प्रशंसा केली तरी ती थोडीच होणार आहे.

'रागिणि नलिने लक्ष्मीं दिवसो निद्धाति दिनकरप्रभावाम् ।
अनपेक्षितगुणदोषः परोपकारः सतां व्यसनम् ॥' हर्षचरित-बाणभट्ट.

सदर निबंध छापून प्रसिद्ध होण्याचा योग हा अशा रीतीनें घडून आलेला आहे. माझ्या आयुष्यांतील विद्यादेवीची शेवटची सेवा सर्वविद्याप्रिय मराठी वाचकांस मी आपली आठवण ह्मणून सादर करितों. ती त्यांना प्रिय होवो ! !

असो. आतां सदर निबंधासंबंधानें दोन शब्द लिहितों.

कोणत्याहि लेखास खरे प्रमाणभूत आधार ह्मटले ह्मणजे शिलालेख, ताम्रपट व त्यावेळच्या पुरुषानें लिहिलेले (इतिहास) विशेषेंकरून ग्राह्य होत. श्रीहर्ष राजाच्या निबंधास असेच आधार घेतले आहेत. मधुबनताम्रपत्रलेख व बस्खेरताम्रपत्रलेख असे हर्षराजाच्या वेळचे ताम्रपत्रलेख सापडले आहेत. त्या दोहींत सारखाच मजकूर असल्यामुळें मधुबनताम्रपत्रलेखच मराठी भाषांतरासह दिला आहे. हर्षाचे वंशजांस देवताप्रसाद, त्यांची सत्कुलीनता, सदाचारसंपन्नता व विद्वन्मान्य विद्वत्ता व हर्षाचे पराक्रमादि गुण कसे होते हेंहि यांत चांगले दाखविलें आहे. बाणानें दिलेल्या व हुएनसँगनें दिलेल्या हर्षचरित्राचें मराठी संक्षिप्त भाषान्तर, त्या दोन्हीं हर्षचरित्रांतील व इतर प्रमाणभूत गोष्टी यांचेहि आधार यास घेतले आहेत. हर्षाच्या कालनिर्णयासंबंधानें प्रमाणभूत असलेले शिलालेख व हूएनसँगचें प्रवासवृत्त हेंहि यांत दिले आहेत. प्रसंगानें हर्षाचा प्रतिस्पर्धी दुसरा सत्याश्रय पुलकेशी याचें संक्षिप्त चरित्र, हर्षबंधु सज्जनकृष्णराज याचें परोपकारकर्तृत्व व त्याच्या योगानें हर्षराजा व बाणादिकवि यांचा संयोग, हर्षाचे दानशौंडत्व, त्याचें सप्रमाण विद्वत्त्व व ग्रंथकर्तृत्व व बौद्धधर्माकडे कल तसेंच डॉ. हॉल यांच्या मताचें निराकरण आणि हर्षराजाच्या ग्रंथांचें यथामति व यथावकाश केलेलें विवेचन इतक्या प्रकरणांचें विवेचन यांत केलें आहे.

डॉ. होर्नलेसाहबांनीं रॉयल ए. सोसायटीपुढें हर्षाचें संबंधानें निबंध वाचल्याचें कळल्यावरून तो संपादन करून त्यांतील मुद्यांच्या संबंधानें यांत विचार करून त्याचें यथामति विवेचन [खण्डन] केलें आहे. मी बाणकवीवर पूर्वीं निबंध लिहिला आहे, यांतीलहि कांहीं मजकूर यांत घेणें अवश्य वाटल्यावरून यांत घेतला आहे.

श्रीहर्षाच्या नांवावर तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत त्यांत दोन नाटिका व एक नाटक आहे ह्या तिन्ही ग्रंथांच्या आरंभीं त्या त्या ग्रंथासंबंधानें मी मराठींत यथामति व यथावकाश विवेचन केलें आहे.

नाटिका व नाटक यांची लक्षणें साहित्यदर्पणांत पुढें लिहिल्याप्रमाणें दिलीं आहेत:

" नाटिका क्लृप्तवृत्ता स्यात्स्त्रीप्राया चतुरंकिका
प्रख्यातो धीरललितस्तत्र स्यान्नायको नृपः ।

स्यादन्तःपुरसंबंधा संगीतव्यापृताऽथवा
नवानुरागा कन्यात्र नायिका नृपवंशजा ।
संप्रवर्तेत नेतास्यां देव्यास्त्रासेन शंकितः
देवी पुनर्भवेज्ज्येष्ठा प्रगल्भा नृपवंशजा ।
पदे पदे मानवती तद्वशः संगमो द्वयोः
वृत्तिः स्यात्कौशिकी स्वल्पविमर्शाः संधयः पुनः ॥"
" नाटकं ख्यातवृत्तं स्यात्पञ्चसंधिसमन्वितम्
विलासर्द्ध्यादिगुणवद्युक्तं नानाविभूतिभिः ।
सुखदुःखसमुद्भूतिनानारसनिरन्तरम्
पञ्चादिका दशपरास्तत्राङ्काः परिकीर्तिताः ।
प्रख्यातवंशो राजर्षिर्धीरोदात्तः प्रतापवान्
दिव्योऽथ दिव्यादिव्यो वा गुणवान्नायको मतः ।
एक एव भवेदङ्गी शृङ्गारो वीर एव वा
अङ्गमन्ये रसाः सर्वे कार्योनिर्वहणेऽद्भुतः ।
चत्वारः पञ्च वा मुख्याः कार्यव्यापृतपूरुषाः
गोपुच्छाग्रसमाग्रं तु बन्धनं तस्य कीर्तितम् ।"

साहित्यदर्पण.

श्रीहर्षांच्या दोन्हीं नाटिकांत शृंगाररसाचेंच प्राधान्य आहे व इतर रसहि अंगभूत आहेत. श्रीहर्षाचें शत्रूंबरोबर दीर्घकालपर्यंत युद्ध सुरू असल्यामुळें त्याच्या तिन्ही ग्रंथांत युद्धप्रसंगाचें वर्णन आल्याखेरीज राहिलें नाहीं.

नागानंदनाटकांतहि शृंगारादिरसांचीं नैसर्गिक चांगलीं वर्णनें आहेत त्यांत दयावीर–जीमूतवाहन यांचें दयावीरत्व, दुसरीकडे कोठें न सापडणारें असून तें हृदयद्रावक आहे.

यांतील बौद्धतत्वें देवी व विष्णुभक्त गरुड यांस मान्य असल्याचें त्यांजकडूनच कवीनें खुबीनें दाखविलें आहे.

तिन्हीं ग्रंथांत कवीनें अनेक चित्तवेधक वर्णनात्मक चित्रें वाचकांच्या अंतःकरणांवर चांगल्या रीतीनें उमटतील अशीं घातलीं आहेत. याच्या वर्णनशैलीवरून हा कवि मध्यम कवींत अग्रगण्य मानण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं.

' अपारे काव्यसंसारे कविरेव प्रजापतिः ।
यथास्मै रोचते विश्वं तथेदं परिवर्तते ॥
शृङ्गारी चेत्कविः काव्ये जातं रसमयं जगत् ।
स चेत्कविर्वीतरागो नीरसं व्यक्तमेव तत् ॥'

---

१ अविकत्थनः क्षमावानातिगंभीरो महासत्वः ।
स्थेयान्निगूढभावो धीरोदात्तो दृढव्रतः कथितः ॥ सा.दर्पण.

कवित्वरूपसंसारांस कवि हा सृष्टिकर्ता आहे ! जसें त्यास वाटतें त्याप्रमाणें तो काव्यसृष्टींत रचना उभारून दाखवितो !

शृंगारप्रधान कवि असला तर तो तद्रसात्मक वर्णन करतो, तोच कवि विरक्त असला तर त्याचें काव्य नीरस होतें !

आपला हा राजकवि प्रथमतः शृंगाररसाचा भोक्ता असावा. परंतु तोच पुढें वीतराग झाला असावा. हें ह्यूएनसँगच्या वर्णनावरून, व बौद्धगुरु दिवाकरमित्र यास त्यानें गुरु केलें आहे यावरून व प्रयाग येथील त्याचे वर्तनावरून लक्षांत येण्यासारखें आहे.

हा आपला राजकवि वीतराग झाला असला तरी त्याचें कोणतेहि काव्य नीरस झालें नाहीं. त्यानें नागानदांत वीतराग नायक जीमूतवाहन याचे वर्णनांतहि रसभरित कृति उमटविली आहे ! यामुळें वरील साहित्यशास्त्रकाराचे वर्णनास हा अपवादक झाला आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

मी ह्या निबंधांत जें यथामति विवेचन केलें आहे तें सर्व अगदीं सर्वांशीं बरोबर असेल असेंच केवळ खात्रीनें ह्मणतां येत नाहीं. तथापि यापासून वाङ्मयास थोडा जरी उपयोग होण्यासारखा असला तरी माझ्या लिहिण्याचें सार्थक्य झालें असें मी समजेन !

संस्कृत ऱ्हस्वेकारोकारांत शब्द हे मूळचे ऱ्हस्वान्त किंवा दीर्घान्त आहेत याचा घोटाळा होऊं नये ह्मणून मीं मराठींत ते शब्द तसेंच लिहिण्याचें ठेविलें आहे. ' हि ' हें अव्यय संस्कृतांतीलच मराठींत आलें असावें असें समजून मीं ते ऱ्हस्वच लिहिण्याचें ठेंविलें आहे चतुर्थीचा ' ना ' प्रत्यय हा संस्कृतांतील षष्ठीचा अनेक वचनी ' नाम् ' प्रत्ययच मराठींत आला आहे. असें माझें मत असल्यामुळें मीं ' ना ' वर अनुस्वार देण्याचें ठेविलें आहे तसेंच इतर कांहीं शब्दांवर निरर्थक लादलेले अनुस्वार देण्याचें मीं टाळलें आहे अशा कांहीं बाबतींत शुद्धलेखनांत मतभेद दिसून येण्यासारखा आहे.

हा निबंध लिहिण्यास प्रकृतीची अस्वस्थता व इतर कांहीं कारणें यामुळें जितका चांगला व्हावयास पाहिजे होता तितका झाला नाहीं याकरितां विद्वान् परीक्षकांनीं याचें निरीक्षण करतांनां त्यांस जेथें कमीजास्त करणें अवश्य वाटेल तेथें तसें करण्याच्या योग्य सूचना करण्याची तसदी घ्यावी. अशी ग्रंथकाराची त्यांस विनंति आहे, तसेंच यांत कमीजास्त व मागेंपुढें मजकूर पडला असला याबद्दलहि त्यांनीं क्षमा करावी अशी त्यांस विनंती आहे.

' अपि मुदमुपयान्तो वाग्विलासैः स्वकीयैः
परभणतिषु तृप्तिं यान्ति सन्तः कियन्तः ।'

पुणें पेठ शनिवार
मि.फा.शु. ९ श.१८३२

पां. गो. शा. पारखी.

अनुक्रमणिका.

त्या काळच्या चालीरीती इ०
नागानंदांतील संक्षिप्त गोष्ट.
प्रत्येक अंकासंबंधानें थोडक्यांत विवेचन.
काहीं चित्तवेधक स्थलनिर्देश.
त्या कालच्या चालीरीती इ०
श्रीहर्षाच्या अंगीं असलेल्या विशेष सद्गुणाबद्दल हर्षचरितांत असलेलें वर्णन.
डॉ. होर्नले साहेबानीं रॉयल ए. सोसायटीपुढें वाचलेल्या निबंधाची नक्कल (इंग्रजी)
वरील निबंधाचें मराठींत मुद्देसूत संक्षिप्त भाषांतर.
निबंधांतील मुद्यांसंबंधानें विवेचन (खण्डन)

श्रीहर्ष.

जयति ज्वलत्प्रतापज्वलनप्राकारकृतजगद्रक्षः ।
सकलप्रणयिमनोरथसिद्धिश्रीपर्वतो हर्षः ॥

हर्षचरित–बाणभट्ट.

श्रीहर्ष.–श्रीहर्षाचा मधुबनताम्रपत्रलेख.—श्रीहर्षाचें मधुबनताम्रपत्रलेखाचें मराठी भाषांतर.

श्रीहर्ष नांवानें तिघेजण प्रसिद्ध आहेत. एक इसवीसनाच्या सातव्या[1] शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला व दोघे इसवीसनाच्या बाराव्या[2] शतकांत होऊन गेले. पहिला राजकवि **वर्धनराजघराण्यांतील** असून **स्थानेश्वर, कनोज** येथील राजा होता व दुसरा ब्राह्मणकवि असून कनोजच्या **राष्ट्रकूट** राजांपैकीं **जयचंद्र** राजाच्या पदरीं होता. तिसरा याच सुमारास **काश्मीरचा** राजा होता. यानें **रत्नावली** नाटिका रचिली असें **वुइलसन्** साहेबांनीं ह्मटलें आहे परंतु हें निराधार आहे. **काश्मीरचा श्रीहर्ष** मुदलीच ग्रंथकार किंवा कवि नव्हता. पहिल्याच्या बापाचें नांव **प्रतापवर्धन** व आईचें नांव **यशोवती** असें होतें. दुसऱ्याच्या बापाचें नांव **श्रीहीर** व आईचें नांव **मामल्लदेवी** असें होतें. पहिल्यानें मोठाले पराक्रम केले असून तो विद्याव्यसनी असल्यामुळें त्यानें आपल्या पदरीं **बाण, मयूर** इत्यादि कवि बाळगिले होते. ह्या राजकवीनें **रत्नावली, प्रियदर्शिका** व **नागानंद** अशीं तीन नाटकें रचिलीं आहेत. दुसऱ्या ब्राह्मण कवीनें पंचमहाका-

---

१ याबद्दल ह्या निबंधांत आधार दिले आहेत.

२ **जयचंद्र**राजानें **काशीक्षेत्रीं** ब्राह्मणास संवत् ११२५ व सं. १२४३ या वर्षीं अग्रहार दिल्याबद्दल ताम्रपत्रलेख दिले ते छापले आहेत. यावरून हा काळ सिद्ध होतो.

त्यांपैकीं **नैषधचरितकाव्य, स्थैर्यविवरण, श्रीविजयप्रशस्ति, खंडनखंडखाद्य, गौडराजकुलप्रशस्ति, अर्णववर्णन, छन्दःप्रशस्ति, शिवशक्तिसिद्धि** आणि **साहसांकचरित** असे ग्रंथ केले आहेत. यांतील **नैषधचरितकाव्य** सर्वत्र प्रसिद्ध आहे. बाकीचे त्याचे ग्रंथ कांहीं उपलब्ध आहेत व कांहीं नाहींत. ह्या ब्राह्मण कवीनें आपण **कनोज** येथील राजाच्या पदरीं असल्याचें **नैषधचरितकाव्याच्या** शेवटीं प्रशस्तींत म्हटलें आहे. तें असें:—

"तांबूलद्वयमासनं च लभते यः कान्यकुब्जेश्वरात्
यः साक्षात्कुरुते समाधिषु परं ब्रह्म प्रमोदार्णवम् ॥
यत्काव्यं मधुवर्षि धर्षितपरास्तर्केषु यस्योक्तयः ।
श्रीश्रीहर्षकवेः कृतिः कृतिमुदे तस्याभ्युदीयादियम् ॥"

यावरून हा **श्रीहर्ष कनोज** येथील **राष्ट्रकूट** राजाच्या पदरीं होता व त्या राजाकडून याचा मोठा सन्मान होत असे, असें उघड दिसतें.

ह्या पुस्तकांत मीं प्राचीन **श्रीहर्षाच्याच** संबंधानें निबंध लिहिला आहे.

श्रीहर्षाचा मधुबनताम्रपत्रलेख.

त्याच्या पूर्वजांचे नामनिर्देश व त्याच्या वडील बंधूचें व त्याचें संक्षिप्त चरित.

श्रीहर्षानें ब्राह्मणांनां गांव अग्रहार दिल्याबद्दल दोन ताम्रपत्रलेख जमिनींत सांपडले आहेत. ह्या दोन्हींतहि सारखाच मजकूर आहे. फक्त दोन्हींत श्रीहर्षाच्या मुक्कामाचीं, ब्राह्मणांचीं, गांवांचीं व अधिकाऱ्यांचीं वगैरे नांवें मात्र वेगळीं आहेत. ताम्रपत्रांतील लेख कसा असतो याची जिज्ञासा कोणाच्याहि मनांत सहज होण्यासारखी आहे. याकरितां श्रीहर्षानें दिलेल्या अग्रहाराबद्दल ताम्रपत्रलेख पुढें दिला आहे.–

श्रीहर्षमहाराजानां दानपत्रम्.

१ ॐ स्वस्ति महानौहस्त्यश्वजयस्कन्धावारात् पिन्थिकायाः महाराजश्रीनरवर्धनस्तस्य पुत्रस्तत्पादानुध्यातः श्रीवज्रिणीदेव्यामुत्पन्नः परमादित्यभक्तो

२ महाराजश्रीराज्यवर्धनस्तस्य पुत्रस्तत्पादानुध्यातः श्रीअप्सरोदेव्यामुत्पन्नः परमादित्यभक्तोमहाराजश्रीमदादित्यवर्धनस्तस्य पुत्रस्तत्पादानुध्यातः श्रीमहा-

३ सेनगुप्तादेव्यामुत्पन्नश्चतुःसमुद्रातिक्रान्तकीर्तिः प्रतापानुरागोपनतान्यराजोवर्णाश्रमव्यवस्थापनप्रवृत्तचक्र एकचक्ररथइव प्रजानामार्तिहरः

४ परमादित्यभक्तः परमभट्टारकमहाराजाधिराजश्रीप्रभाकरवर्धनस्तस्य पुत्रस्तत्पादानुध्यातः सितयशःप्रतानविच्छुरितसकलभुवनमण्डलः परिगृहीत

५ धनदवरुणेन्द्रप्रभृतिलोकपालतेजाः सत्पथोपार्जितानेकद्रविणभूमिप्रदानसंप्रीणितार्थिहृदयोतिशयितपूर्वराजचरितो देव्याममलयशोमत्यां

६ श्रीयशोमत्यामुत्पन्नः परमसौगतः सुगत इव परहितैकरतः परमभट्टारकमहाराजाधिराजश्रीराज्यवर्धनः(।) राजानो युधि दुष्टवाजिन इव श्रीदेव

७ गुप्तादयः

कृत्वा येन कशाप्रहारविमुखा[ः] सर्वे समं संयताः [॥
उत्खाय द्विषतो विजित्य वसुधां कृत्वा प्रजानां प्रियं
प्राणानुज्झितवानरातिभवने सत्यानुरोधेन यः [॥ तस्यानुज–

८ स्तत्पादानुध्यातः परममाहेश्वरो महेश्वर इव सर्वसत्वानुकंपी परम-
भट्टारकमहाराजाधिराजश्रीहर्षः श्रावस्तीभुक्तौ कुण्डधानीवैषयिक-
सोमकुण्डिकाग्रामे

९ समुपगतां महासामन्तमहाराजदौस्साधसाधनिकप्रमातारराजस्था-
नीयकुमारामात्योपरिकविषयपतिभटचाटसेवकादीन्प्रतिवासिजन-
पदांश्च समा

१० ज्ञापयत्यस्तु वः सम्विदितमयं सोमकुण्डकाग्रामो ब्राह्मणवामर-
थ्येन कूटशासनेन भुक्तक इति विचार्य यतस्तच्छासनं भङ्क्त्वा तस्मा-
दाक्षिप्य च स्वसीमा–

११ पर्यन्तः सोद्रङ्गः सर्वराजकुलाभाव्यप्रत्यायसमेतः सर्वपरिहृतपरि-
हारो विषयादुद्धृतपिण्डः पुत्रपौत्रानुगः चन्द्रार्कक्षितिसमकालीनो
१२ भूमिच्छिद्रन्यायेन[1] मया पितुः परमभट्टारकमहाराधिराजश्रीप्रभा-
करवर्धनदेवस्य मातुः परमभट्टारिकामहादेवीराज्ञीश्रीयशोमतीदेव्या
१३ ज्येष्ठभ्रातृपरमभट्टारकमहाराजाधिराजश्रीराज्यवर्धनदेवपादानां च
पुण्ययशोभिवृद्धये, सावर्णिसगोत्रच्छन्दोगसब्रह्मचारीभट्टवातस्वा-
मि—


१४ विष्णुवृद्धसगोत्रबह्वृचसब्रह्मचारिशिवदेवस्वामिभ्यां प्रतिग्रहधर्मे-
णाग्रहारत्वेन प्रतिपादितः विदित्वा भवद्भिः समनुमन्तव्यः प्रति—
१५ वासिजनपदैरप्याज्ञाश्रवणविधेयैर्भूत्वा यथासमुचिततुल्यमेयभाग
भोगकराहिरण्यादिप्रत्यायाः अनयोरेवोपनेयाः सेवोपस्थानं च
करणीयमित्यपि च ॥

१६ अस्मत्कुलक्रममुदारमुदाहरद्भिरन्यैश्च दानमिदमभ्यनुमोदनीयम् [।]
लक्ष्म्यास्तडित्सलिलबुद्बुदचंचलायाः दानं फलं परयशः परिपालनंच
कर्मणा मनसा वाचा कर्तव्यं प्राणिनेहितं (।)
हर्षेणैतत्समाख्यातं धर्मार्ज्जनमनुत्तमं ॥

---

1 भूमिछिद्रं कृष्ययोग्या ।— वैजयंती, वैश्याध्याय.

दूतकोत्रमहाप्रमातारमहासामन्तश्रीस्कन्दगुप्तः महाक्षपटलाधिकरणाधिकृतसामन्तमहाराजेश्वरगुप्तसमादेशाच्चोत्कीर्णं गुर्जरेण संवत् २०+५ मार्गशीर्ष वदि ६



स्वहस्तो मम महाराजाधिराजश्रीहर्षस्य.

मधुबनताम्रपत्रलेखाचें मराठी भाषांतर.

ओम् स्वस्ति! ज्यामध्यें नौका, हत्ती आणि अश्व आहेत अशा **पिंथिका** (स्थलाचें नांव असावें) येथील विजयी सैन्यस्थलापासून महाराज **श्रीनरवर्धन** याचा पुत्र पितृचरणसेवारत **श्रीवज्रिणी**राणीच्या उदरीं जन्मास आलेला, निःसीम सूर्यभक्त असा महाराज **श्रीराज्यवर्धन** (हा होय); याचा पुत्र तातपादांचें चिंतन करणारा, श्री **अप्सरा**राणीचा पुत्र, सूर्याचा निःसीम भक्त महाराज **श्रीआदित्यवर्धन** (होय); त्याचा पुत्र पितृपदाचें चिंतन करणारा **श्रीमहासेनगुप्ता**राणीच्या उदरीं जन्मलेला, ज्याची कीर्ति चतुःसमुद्रापलीकडे पसरली आहे असा, ज्याच्या प्रतापाच्या अनुरागानें इतर राजे ज्याच्या अंकित झाले आहेत असा, वर्ण (ब्राह्मणादि) आश्रम (ब्रह्मचर्यादि) यांची यथायोग्य व्यवस्था करणारा, एकचक्ररथा-(सूर्या) प्रमाणें, प्रजेची पीडा दूर करणारा परम सूर्यभक्त, महाराजाधिराज **श्रीप्रभाकरवर्धन** (होय). त्याचा पुत्र परमपितृभक्त, ज्यानें आपल्या शुभ्रयशोरूप छतानें सर्व भूमंडल आच्छादून टाकिलें असा, कुबेर, वरुण, इंद्र इत्यादि लोकपालांप्रमाणें ज्याचें सामर्थ्य आहे असा, ज्यानें सन्मार्गानें भूमिदानादि अनेक दानांनीं याचक संतुष्ट केले आहेत असा, पूर्वराजांना अतिक्रमण करणारें आहे चरित्र ज्याचें असा, निष्कलंक कीर्तीनें युक्त अशा **श्रीयशोमती**राणीच्या उदरापासून जन्मलेला, परमसौगत, (बौद्धधर्मी) बुद्धाप्रमाणें परहित करण्यांत तत्पर असा, महाराजाधिराज **श्रीराज्यवर्धन** (होय); "ज्यानें युद्ध करून आपल्या चाबकाच्या तडाक्यानें नाठाळ घोड्याप्रमाणें—**देवगुप्तादि** राजांना वठणीस आणिलें असा, ज्यानें शत्रूंचें निर्मूलन करून पृथ्वी जिंकून व प्रजेचें हित करून सत्याच्या (विश्वासाच्या) अनुरोधानें शत्रूच्या घरीं प्राणत्याग केला असा, ज्याचा वडील बंधु **राज्यवर्धन** हा होय. त्याचा कनिष्ठ बंधु ज्येष्ठभ्रातृचरणसेवक परममाहेश्वर (शिवभक्त), महेश्वराप्रमाणें सर्व भूतांवर दया करणारा

असा—महाराजाधिराज **श्रीहर्ष** हा, मांडलिक राजे, संस्थानिक, अधिकारी वगैरे सर्व अधिकाऱ्यांना आज्ञा करतो कीं, **श्रावस्ती**संबंधी **सोमकुंडिका** येथें जमलेल्या सर्वांनां व आसपासच्या प्रांताधिकाऱ्यांनां माहीत व्हावें कीं, **वामरथ्य** नांवाच्या ब्राह्मणानें कृत्रिम लेखानें **सोमकुंडिका**गांवाचा उपभोग घेतल्याचें आढळून आल्यामुळें त्याचा तो लेख खोटा ठरून त्या गांवची मालकी त्याजकडून काढून घेऊन त्या गांवच्या मर्यादेसुद्धां, व राजघराण्याला द्यावयाचे उत्पन्नासुद्धां व (इतर) सर्व हक्कांसुद्धां....चंद्र, सूर्य आणि पृथ्वी आहे तोंपर्यंत पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें हा गांव (माझा) पिता महाराजाधिराज **प्रभाकरवर्धन**, (माझी) माता **श्रीयशोमती**, (माझा) वडील बंधु महाराजाधिराज **राज्यवर्धन** या (सर्वांचें) पुण्य व यश वृद्धिंगत व्हावें ह्मणून सावर्णि शाखेचा व छंदोग (सामवेदी) ब्राह्मण **भट्टवातस्वामी** याला आणि विष्णुवृद्धगोत्रोत्पन्न आणि बव्हृच (ऋग्-वेदी) **शिवदेवस्वामी** या दोघांनां अग्रहार ह्मणून **सोमकुंडिका** हा गांव दिला आहे. हें जाणून तुम्हीं माझ्या आज्ञेप्रमाणें त्या दोघांनां सर्व उप-भोगाचे पदार्थ वगैरे व कर—सुवर्णादि जें द्यावयाचें तें आणून देत जावें व त्यांची सेवा करावी.

तसेंच “ आमच्या कुलाचा उदार कुलक्रम लक्षांत आणून याबद्दल अभिमान बाळगणाऱ्यांनीं आणि इतरांनीं या देणगीस आपलें अनुमोदन द्यावें. दान आणि यशःपालन हीं संपत्तीवर अवलंबून आहेत, व संपत्ति ही विद्युत् अथवा जलतरंगाप्रमाणें अस्थिर आहे. याकरितां चित्तांत, वाणींत व कृतींत एकरूपता ठेवून मनुष्यानें आपलें कर्तव्य (पुण्य) करावें; असें **हर्षा**नें प्रसिद्ध केलें आहे. ”

ह्या देणगीचें आज्ञापत्र घेऊन आलेला दूत सरदार महाराज **स्कंदगुप्त** हा होय आणि हा हुकूम नोंदणारा मुख्य अधिकारी महाराज **ईश्वरदास** होय. यांचे हुकुमावरून संवत् २५ मार्गशीर्ष कृष्ण षष्ठीचे दिवशीं **गुर्जर** यानें हा लेख ताम्रपत्रावर खोदला असे.

स्वहस्तो मम महाराजाधिराजश्रीहर्षस्य.

हा ताम्रपत्रलेख **मधुबन** येथें सांपडला म्हणून यास **मधुबनताम्रपट** असें म्हणतात. **मधुबन** हें **'आझमगड'** जिल्ह्यांत ईशान्येस **नथुपुर** परगण्यांत तालुका **सग्री** यांत आहे. यांत संवत् २५ मार्गशीर्ष वदि ६ असें आहे. हा **हर्षा**चा संवत् आहे. **हर्ष** गादीवर बसल्यापासून त्याचा संवत् सुरू झाला असावा. यावरून या अग्रहाराच्या वेळेस **हर्षराजा** राज्यावर बसल्यापासून पंचवीस वर्षें झालीं असावीं, असें उघड होतें. हा ताम्रपत्रलेख (काव्यमाला ६४) **'प्राचीनलेखमाला'** हींतहि दिला आहे.

हर्षाचे वंशजांस देवताप्रसाद, त्यांची सत्कुलीनता, सदाचारसंपन्नता व विद्वन्मान्य विद्वत्ता.

हर्षराजा हा **पुष्पभूति**राजाच्या सत्कुलांत उत्पन्न झाला होता. **पुष्पभूति** हा राजा मोठा पराक्रमी व पुण्यवान् होऊन गेला. त्याचा लहानपणापासून शिवभक्तीकडेच स्वाभाविक कल होता व तो शिवपूजन करीत असे. यामुळें त्याच्या राज्यांत घरोघर शिवपूजन होत असे[1] ' 'गृहे गृहेऽपूज्यत खंडपरशुः' असें त्याचे वर्णनांत आहे. यावरून 'राजा कालस्य कारणम्' ह्मणजे राजाच्या कलाप्रमाणेंच आचार विचार चालू

---

१ पृथुना गौरियं कृतेति यः स्पर्धमान इव महीं महिषीं चकार । निसर्गस्वैरिणी स्वरुच्यनुरोधिनी च भवति हि महतां मतिः। यतस्तस्य केनचिदनुपदिष्टा सहजैव शैशवादारभ्यान्यदेवताविमुखी भगवति, भक्तिसुलभे, भुवनभूति, भूतभावने, भवच्छिदि, भवे भूयसी भक्तिरभूत् । अकृतवृषभध्वजपूजाविधिर्न स्वप्नेऽप्याहारमकरोत् । अजम्, अजरम्, अमरगुरुम्, असुरपुरारिपुम्, अपरिमितगणपतिम्, अचलदुहितृपतिम्, अखिलभुवनकृतचरणनातिम्, पशुपातिं प्रपन्नोऽन्यदेवताशून्यममन्यत त्रैलोक्यम् । भर्तृचित्तानुवर्तिन्यश्चानुजीविनां प्रकृतयः । तथा हि। गृहे गृहे भगवानपूज्यत खण्डपरशुः । इ०

राहतो या महाभारतांतील वाक्याचें स्मरण होतें. **पुष्पभूतिराजानें** परमशैव दाक्षिणात्य **भैरवाचार्य** यास गुरु केलें होतें. **भैरवाचार्य** परलोक-साधन करीत असतां त्यांच्याकरितां ह्या राजानें मोठा पराक्रम केला, त्यामुळें साक्षात् लक्ष्मी प्रसन्न होऊन तिनें ह्या राजास, 'तुझ्या वंशांत थोर व पराक्रमी पुरुष उत्पन्न होतील ' असा वर दिला. **बाणाच्या** वंशजांस जसा **सरस्वती**चा वर होता, तसा **पुष्पभूती**च्या वंशजांस **लक्ष्मी**चा वर मिळाला होता. पुढें त्या वंशांत **हर्षा**चा बाप **प्रतापवर्धन** नांवाचा महापराक्रमी राजा झाला. हा राजा दानशूर व शिवभक्त होता. हा संततिप्राप्तीकरितां रोज अर्घ्यप्रदान व आदित्यहृदयमंत्र यांचा पाठ करीत असे.

त्याचा पुत्र **हर्ष** हा, मोठा धर्मशील, पुण्यश्लोक व महापराक्रमी राजा झाला. **हर्ष** हा आपल्या पूर्वजांप्रमाणें शिवभक्त होता. तो दिग्विजयास निघाला तेव्हां श्रीशंकराचें पूजन करून, होमहवन करून व ब्राह्मणांना दानधर्म करून निघाला असल्याचें वर्णन आहे.

बाणकवीच्या बंधूंनीं **बाणास हर्षचरित** सांगण्याविषयीं प्रार्थना केली आहे, तींत पुण्यश्लोक **हर्ष**राजाच्या चरित्रश्रवणानें हा आपला **भार्गववंश** अत्यंत पवित्र होईल ! असें म्हटलें आहे. यावरून हर्षराजाचे पूर्वज व **हर्ष** हे पुण्यश्लोक राजांत गणण्यासारखे थोर होते असें उघड दिसतें. **हर्ष**राजा हा **बाणा**सारख्या विद्वानांच्या सहवासानें मोठा विद्वान् व ग्रंथकार झाला व हाहि आपल्या कविश्रेष्ठ **बाण**कवीच्या सहवासानें उत्तम कवींत गणण्या-

---

१ निसर्गत एव च स नृपतिरादित्यभक्तोबभूव । प्रतिदिनमुदये दिनकृतः स्नातः सितदुकूलधारी कर्पटप्रावृत्तशिराः प्राङ्मुखः क्षितौ जानुभ्यां स्थित्वा कुंकुमपंकानुलिप्ते मण्डलके पवित्रपद्मरागपात्रीनिहितेन स्वहृदयेनेव सूर्यानुरक्तेन रक्तकमलषण्डेनार्घं ददौ । अजपच्च जप्यं सुचरितः प्रत्युषासि मध्यंदिने दिनान्ते चापत्यहेतोः प्राध्वं प्रयतेन मनसा जञ्जपूको मन्त्रमादित्यहृदयम् ।

२ भवतु भार्गवोऽयं वंशः शुचिनानेन राजर्षिचरितश्रवणेन सुतरां शुचितरः ।

सारखा झाला. **जयदेवकवीनें** यास '**हर्षो हर्षः**' असें म्हणून श्रेष्ठकविरत्नांच्या पंक्तींत बसविलें आहे, तेव्हां त्या पंक्तींतून उठवून यास दुसऱ्या पंक्तींत बसविण्यास कोण समर्थ होणार आहे?

श्रीहर्षाचा बंधू सज्जनकृष्णराज याच्या द्वारें श्रीहर्ष व बाणादिकवि यांचा समागम.

उत्तरहिंदुस्थानांत श्रीहर्ष नांवाचा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. तो स्वतः विद्वान् असून विद्वज्जनप्रियहि होता. त्यानें आपल्या पदरीं **बाण, मयूर** इत्यादि विद्वान् कवि बाळगिले होते. **बाणादिककवींचें** राहणें त्याच्या राज्यांतच होतें. सर्व ठिकाणीं व सर्व कालीं सज्जन व दुर्जन यांचा संयोग असतोच, त्याप्रमाणें त्यावेळीं येथेंहि होताच. **बाण**कवींचें वर्चस्व असह्य होऊन कांहीं दुर्जनांनीं अधिकउणें व खोटेंनाटें सांगून **हर्षराजा**चे मनांत **बाण**कवींविषयीं वाईट ग्रह उत्पन्न केला होता. '**पिशुनजनं खलु बिभ्रति क्षितीन्द्राः**' राजाजवळ चहाडखोर लोक असल्याचें पंडित **जगन्नाथराय** यांच्याहि वर्णनांत आलें आहे. यावरून राजदरबारीं चहाडखोरांचा सुळसुळाट सर्वकालीं चालू असल्याचें आढळून येतें! चहाडांचें साम्राज्य चालूं न देणारे खरे सज्जन व विद्वान् यांच्या पक्षाचा सज्जन **कृष्णराज** असल्यामुळें त्यानें **बाण**कवींविषयीं **हर्षराजा**च्या मनांत विघ्नसंतोषी लोकांनीं भरविलेला दुर्ग्रह काढून टाकला! ठीकच आहे, **कृष्णराजा**सारखे परोपकारी व चतुर पुरुष असतात, ते थोराजवळ समयोचित बोलून कार्य साधून घेतात! '**कालप्रयुक्ता खलु कार्यविद्भिर्विज्ञापना भर्तृषु सिद्धिमेति**।' यथाकालीं स्वामीजवळ विनंति केली असतां ती सिद्धीस जाते! ही कविकुलगुरूची उक्ति किती यथार्थ आहे! असो, **कृष्णराजा**नें **बाणास हर्षराजा**चे भेटीस येण्याविषयीं जासुदाबरोबर पत्र पाठवून मोठ्या अगत्यानें बोलावलें आहे.

उन्हाळ्यांत एके दिवशीं **बाण**कवि हा भोजन करून दुपारीं आपल्या घरीं बसला असतां **बाणाचा चंद्रसेन** नांवाचा बंधु घाईघाईनें येऊन ह्मणाला, 'राजाधिराज **हर्षराजा**चा बंधु **कृष्णराज** याजकडून दूत आला आहे,' तेव्हां 'त्याला लवकर घेऊन ये,' असें **बाणानें** सांगितलें.त्याप्रमाणें **चंद्रसेनानें** त्याला आणून **बाणास** भेटविलें. तेव्हां त्यानें नमन करून **बाणास** एक पत्र दिलें. त्यांत '**मेखलक** तोंडीं सांगतां सर्व कळून येईल. आपण कालक्षेप न करतां लवकर महाराजाकडे निघून यावें,' असें होतें. मग **मेखलकानें कृष्णराजा**चा निरोप—जो सांगावयाचा तोहि त्यास सांगितला. त्यांत त्याची **बाणकवी**विषयीं फारच कळकळ दिसून आली. तो ह्मणाला,'एक गोत्र, एक जात, एकत्र वाढणें, एकत्र सहवास, वारंवार भेटणें, एकमेकांवर प्रेम करणें, उपकार करणें, समानशील असणें, इत्यादि गोष्टी स्नेह होण्यास कारण होतात; परंतु जवळ असलेल्या बंधूप्रमाणें तुमच्यावर कारणावाचून मला प्रेम करावेंसें वाटतें! दुर्जनांनीं तुमच्या लहानपणच्या स्वच्छंद वर्तनाबद्दल महाराजांच्या मनांत भलतेंच भरवून त्यांचें मन कलुषित केलें होतें. परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. ज्याला शत्रु व मित्र नाहींत, असा जगांत कोण आहे? महाराजाकडे तरी याचा काय बोल आहे? आह्मीं या गोष्टींची पक्की चौकशी केली व तुमच्यासाठीं राजाधिराजाजवळ विनंति करून त्यांच्या मनांतला किंतू काढून टाकला. पूर्ववयांत सर्वांकडून कांहीं प्रमाद घडतात, ही गोष्ट महाराजासहि मान्य आहे. तर आतां कालक्षेप न करतां राजदर्शनास येण्याचें करावें. राजाधिराजाचें दर्शन न घेतां निष्फल (वांझ) वृक्षाप्रमाणें आपल्या घरीं बंधुजनांत राहून आपण काल व्यर्थ घालवावा,

---

१ तथाभूते च तस्मिन्नत्युग्रे ग्रीष्मसमये कदाचिदस्य स्वगृहावस्थितस्य भुक्तवतोऽपराह्णसमये भ्राता पारशवश्चन्द्रसेननामा प्रविश्याकथयत्। 'एष खलु देवस्य चतुःसमुद्राधिपतेः सकलराजचक्रचूडामणिश्रेणीशाणकोणकषणानिर्मलीकृतचरणनखमणेः सर्वचक्रवर्तिनां धौरेयस्य महाराजाधिराजपरमेश्वरश्रीहर्षदेवस्य भ्रात्रा कृष्णनाम्ना भवतामन्तिकं प्रज्ञाततमो दीर्घाध्वगः प्रहितो द्वारमध्यास्त इति। सोऽब्रवीत्—'आयुष्मन्, अविलंबितं प्रवेशयैनम्' इति।

हें मला प्रशस्त वाटत नाहीं. परवशतेबद्दल किंवा राजाधिराजाजवळ गेलों असतां कसें होईल, याबद्दल काळजी बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. राजसेवा कठिण तर खरीच-कारण–" **राजसेवा मनुष्याणामसिधारावलेहनम् । पञ्चाननपरिष्वंगो व्यालीवदनचुम्बनम्** " असें राजसेवा कठिण असल्याचें वर्णन आहे खरें! तथापि ते राजे निराळे! ह्या राजाची सर कोणाला येणार आहे! पदरीं पुष्कळ पुण्य असल्याखेरीज ह्या राजाचा सौख्यकारक आश्रय कोणाला मिळणार आहे?*

पत्र घेऊन आलेल्या दूतास बाणानें '**भद्रमशेषभुवननिष्कारणबंधोस्तत्रभवतः कृष्णस्य**' असें म्हणून निष्कारणबंधु **कृष्णराजाचें** कुशल विचारलें आहे; व त्या सज्जनास[2] उद्देशूनच—

---

१ नास्यात्पपुण्यैरवाप्येत सर्वातिशायिसुखरसप्रसूतिः पादपल्लवच्छाया ।

* **सज्जनकृष्णराजाचें** उदात्तशील व परोपकारकर्तृत्व पाहून येथें **पंडितरायाच्या** पद्याचें स्मरण होतें. तें पद्य हें होयः—

> " **परार्थव्यासङ्गादुपजहदथ स्वार्थपरता-**
> **मभेदैकत्वं यो वहति गुणभूतेषु सततम् ।**
> **स्वभावाद्यस्यान्तः स्फुरति ललितोदात्तमहिमा**
> **समर्थो यो नित्यं स जयतितरां कोऽपि पुरुषः** " ॥

परोपकारी सज्जनाचें नैसर्गिक चरित्र यांत किती खुबीदार व भारदस्त रीतीनें वर्णिलें आहे?

कृष्णरायाच्या मनांतला हेतु तरी हाच असला पाहिजे कीं,—'**वंशभवो गुणवानपि संगविशेषेण पूज्यते लोकः**' मनुष्य कुलीन व विद्वान् असला तरी थोरा मोठ्यांच्या सुसमागमानें तो पूज्य होतो!

२ सज्जनाच्या संबंधानें '**प्रायेणाकारणमित्राण्यतिकरुणार्द्राणि च सदा खलु भवन्ति सतां चेतांसि!**' असें **कादंबरींतहि बाणानें हारीत** ऋषीच्या संबंधानें शुकशावकाच्या मुखांत घातलें आहे.

" अतिगंभीरे भूपे कूप इव जनस्य निरवतारस्य ।
दधति समीहितसिद्धिं गुणवन्तः पार्थिवा घटकाः ॥ "
" रागिणि नलिने लक्ष्मीं दिवसो निदधाति दिनकरप्रभवाम् ।
अनपेक्षितगुणदोषः परोपकारः सतां व्यसनम् ॥ "

ज्याच्यांत उतरण्यास पायऱ्या नाहींत अशा खोल व गंभीर कूपांत मनुष्याला उदक प्राप्त करून देण्यास दोरी लावलेले घट जसे साधक आहेत; तसे थोर राजापर्यंत जाऊन पोंहचण्यास ज्यांनां मार्ग नाहीं, अशा लोकांचें इच्छित कार्य गुणवान् राजपुरुष हे घडवून आणतात !

जसा दिवस सूर्योदयानें प्रकट झालेली लक्ष्मी कमलांचे ठायीं अर्पण करतो, त्याप्रमाणें गुणदोषांकडे लक्ष न देतां परोपकार करणें हें सज्जनाचें व्यसन होय.

असे उद्गार **बाणानें** काढिले आहेत ते अगदीं यथार्थ आहेत. यापूर्वी [1]हर्षराजाचे दरबारीं **बाणाचें** येणेंजाणें नव्हतें, व त्याच्या पूर्वजांचेंहि नव्हतें; तेथें त्याचा कोणाशीं परिचयहि नव्हता; ह्या वर्णनांत त्या ठिकाणीं विद्येचें फारसें कौतुकहि नाहीं असेंहि **बाणानें** ह्मटलें आहे. यामुळें **बाणास** प्रथमतः **हर्षराजाकडे** जाण्यास मोठी काळजी वाटली होती. तथापि '**फलप्रतिबंधी धीमद्भिरपहरणीयः कालातिपातः**' 'व्यर्थ काल घालविणें ठीक नाहीं.' या **कृष्णराजाच्या** लेखावर भिस्त ठेवून व श्रीशंकरावर भरंवसा ठेवून त्यानें जाण्याचा निश्चय केला.

हर्षराजाकडे निघण्याच्या दिवशीं **बाणानें** प्रातःस्नान व संध्यादि कर्में केल्यावर प्रथम शंकराचें दुग्धाभिषेकपूर्वक पूजन केलें. नंतर होमहवन करून ब्राह्मणांनां दानधर्म केला व गाईला प्रदक्षिणा केली. त्याची आत **मालती** इनें त्याचें प्रस्थानमंगल केलें. त्यानें तिला व इतर गुरुजनानां

---

१ 'किं करोमि अन्यथा संभावितोऽस्मि राज्ञा । निर्मिमित्तबंधुना च संदिष्टमेवं कृष्णेन । अतिगंभीरं महाद्राजकुलम् । नच तत्र मे पूर्वज प्रवर्तिता प्रीतिः। न राजवल्लभपरिचयः । न विद्यातिशयकुतूहलम् । अवश्यं गतव्यम् । सर्वथा भगवान् पुरारातिर्भुवनगुरुर्गतस्य मे सर्वं सांप्रतमाचरिष्यति' इत्यवधार्य गमनाय मतिमकरोत् ॥

नमस्कार केले. त्यांनींहि त्याला शुभाशीर्वाद दिले. मग तो **प्रीतिकूट** गांवाहून निघून व **चंडिकावन** उल्लंघून **मल्लकूट** ह्या गांवीं गेला. तेथें त्याचा आप्त **जगत्पति** यानें **बाणाचें** चांगलें आदरातिथ्य केलें. दुसरे दिवशीं **भागीरथी** उतरून तो **यष्टिग्रह**नांवाच्या गांवीं रात्रीं राहिला व दुसरे दिवशीं जवळच हर्षराजाची छावणी होती तेथें गेला.

त्या ठिकाणीं विश्रांति घेतल्यावर प्रहरदिवस राहिला तेव्हां तो **मेखलका**बरोबर **हर्षराजास** भेटण्याकरितां निघाला. वाटेनें मांडलिक राजांचीं शिबिरें, व बाहेरून आंत व आंतून बाहेर येणारे जाणारे हजारों हत्ती, घोडे व उंट, इत्यादिकांची मौज पहात तो चालला असतां **हर्षराजाच्या** छावणींतील असंख्य प्राणी दृष्टीस पडल्यावर **बाणास** आश्चर्य वाटून त्याच्या मनांत आलें कीं, सृष्टिकर्त्यानें इतके प्राणी निर्माण केले असतां पंचमहाभूतांचा क्षय, परमाणूंचा अभाव, कालाचा शेवट, आयुष्याचा नाश, आणि आकारांचा अंत कसा झाला नाहीं ?[1]

मग **बाणाबरोबर** असलेला **मेखलक**[2] तेथील पाहरेकऱ्यांनीं ओळखिला. तेव्हां तो **बाणास** ह्मणाला, 'आपण येथेंच थांबावें, मी आंत वरदी देऊन येतों.' असें ह्मणून तो गेला व कांहीं वेळानें मुख्य चोपदारास बरोबर घेऊन आला, आणि ह्मणाला "हा[3] राजाधिराजाचा मुख्य चोपदार आहे; याचें नांव **पारियात्र.**" तितक्यांत **पारियात्र** बाणास मुजरा करून

---

१ अभवश्चास्य जातविस्मयस्य मनासि-' कथमिवेदमियत्प्रमाणं प्राणिजातं जनयतां प्रजासृजां नासीन्महाभूतानां वा परिक्षयः, परमाणूनां वा परिच्छेदः कालस्य वान्तः, आयुषो वा व्युपरमः, आकृतीनां वा परिसमाप्तिः ' इति ।

२ मेखलकस्तु दूरादेव द्वारपाललोकेन प्रत्यभिज्ञायमानः ' तिष्ठतु ' तावत्क्षणमात्रमत्रैव पुण्यभागिति तमभिधायाप्रतिहतः प्राविशत् ।

३ एष खलु 'महाप्रतीहाराणामनन्तरश्चक्षुष्यो देवस्य पारियात्रनामा दौवारिकः। समनुगृह्णात्वेनमनुरूपया प्रतिपत्त्या कल्याणाभिनिवेशी ' इति । 'दौवारिकः समुपसृत्य कृतप्रणामो मधुरया गिरा सविनयमभाषत-आगच्छत । प्रविशत दर्शनाय । कृत-प्रसादो देव ' इति ।

ह्मणाला, "महाराज प्रसन्न आहेत व ते आपली भेट घेण्यास उत्सुक आहेत, तरी दर्शनास चलावें." तें ऐकून **बाणा**ला फार आनंद वाटला. कारण '**स्वामी प्रसादोन्मुखः**' हा ईश्वरीप्रसाद (शुभशकून) मानून तो त्याजबरोबर गेला. वाटेनें **हर्षा**चा बसण्याचा पर्वतासारखा **दर्पशात** नांवाचा हत्ती होता. त्याची त्यानें बराच वेळ गंमत पाहिली; मग तो **हर्षराजा**कडे गेला. **हर्षा**ला पाहतांच **बाणास** फारच हर्ष झाला. व त्या आनंदाच्या भरांत त्याच्या मुखावाटे उद्गार निघाले ते फारच खुबीदार व मार्मिक आहेत. त्यांतील श्लेष **हर्षराजा** केवळ सद्गुणांचा पुतळाच असल्याची साक्ष देत आहेत ! त्या वर्णनांत **बाणानें हर्षाचें** '**अत्यमरं राजत्वम्**' 'देवत्वाहून अधिक राजपण' वर्णिलें आहे. मग द्वारपालानें **बाण**कवि आल्याचें राजास कळविलें. तेव्हां 'हाच काय तो **बाण** ?' असें **हर्षराजानें** ह्मटलें. यावर 'हेच ते, महाराज !' असें त्यानें सांगितलें.

हर्षाचा बंधु **कृष्णराज** यानें आपल्याकडून राजाच्या मनांतला वाईट ग्रह काढून टाकण्याचा प्रयत्न केला होता, तरी **बाणा**ची भेट झाल्यावर **हर्षराजा** हा आपल्याजवळ बसलेल्या **मालवराज**पुत्राजवळ 'हा मोठा दुर्वृत्त आहे !' असें **बाणास** अनुलक्षून बोलला. तें ऐकून **बाणानें**हि राजाची भीड न धरतां ह्मटलें, 'राजाधिराज ! अज्ञानासारखें व

---

१ 'महानयं भुजंगः ।' असें हर्षानें ह्मटलें. यावर बाणकवीनें 'का मे भुजंगता' असें खुबीनें उत्तर दिलें. ह्मणजे कोणता माझा दुर्वृत्तपणा ? किंवा 'कामे भुजं गता' कोणती (स्त्री) माझ्या हातीं आली ? किंवा 'कामे भुजंगता' ह्मणजे मदनाचे ठायीं भुजंगता ह्मणजे दुर्वृत्तपणा आहे, माझे ठायीं नाहीं ! असे खुबीनें श्लेषचमत्कार केले !

२ देव अविज्ञाततत्व इव अश्रद्धधान इव नेय इव अविदितलोकवृत्तान्त इव कस्मादेवमाज्ञापयासि । स्वैरिणो विचित्राश्च लोकस्य स्वभावाः प्रवादाश्च । महद्भिस्तु यथार्थदर्शिभिर्भवितव्यम् । नार्हसि मामन्यथा संभावयितुमविशिष्टमिव । ब्राह्मणोऽस्मि । जातः सोमपायिनां वंशे वात्स्यायनानाम् । यथाकालमुपनयनादयः कृताः संस्काराः । सम्यक्पठितः सांगो वेदः । श्रुतानि यथाशक्ति शास्त्राणि । दारपरिग्रहादभ्यागारिकोऽस्मि । का मे भुजंगता । लोकद्वयाविरोधिभिस्तु चापलैः

कांहीं एक लोकचरित माहीत नसल्यासारखें काय बोलतोस? लोक चमत्कारिक असतात; ते पाहिजे तें बोलतात, परंतु थोरांनीं यथार्थ असेल तेंच लक्षांत घेतलें पाहिजे. ह्या असल्या भाषणानें मला फारच वाईट वाटतें. मी कोणी असा तसा नव्हे! सर्वत्र प्रसिद्ध व अतिपवित्र अशा **वात्स्यायनकुलां**त जन्मलों. यथाकालीं माझे सर्व संस्कार होऊन उपनयनानंतर मी सांग वेदाध्ययन[1] व शास्त्राध्ययन केलें आहे. माझा विवाह होऊन मी गृहस्थाश्रमी झालों आहें. इहलोक व परलोक याला घातक असें मजकडून कांहींएक वर्तन घडलें नाहीं. यांत मी कांहीं एक छपवीत नाहीं. सांप्रत **बुद्धा**सारखा शांत, **मनू**सारखा वर्णाश्रमांची व्यवस्था करणारा व **यमधर्मा**सारखा तूं शास्ता असतां भलत्यासलत्या गोष्टी करण्याविषयीं कोणाच्या मनांत तरी येणार आहे? फार काय सांगावें? पशुपक्षी देखील तुला भिऊन वागतात. मग मनुष्याची काय कथा? आतां मी कसा आहें तें सहवासानें कळून येईल. यावर 'आह्मी[2] असें ऐकिलें ह्मणून ह्मटलें!' असें बोलून **हर्षा**नें **बाणा**चा सन्मान न करतां केवळ प्रसन्नतेचें मात्र चिन्ह दाखविलें व तो उठून गेला. **बाण**कवीच्या अशा भाषणानें **हर्षा**स राग आला नाहीं यावरून—

'पुरुषाः सुलभा लोके सततं प्रियवादिनः।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः॥'

'गोड बोलणारे पुष्कळ असतात, परंतु अप्रिय पण हितकर बोलणारा व ऐकणाराहि विरळा!'

शैशवमशून्यमासीत्। अत्रानपलापोऽसि गृहीतविप्रतीसारमिव मे हृदयम्। इदानीं तु सुगत इव शान्तमनसि मनाविव कर्तरि वर्णाश्रमव्यवस्थानां समवर्तिनीव च साक्षाद्दण्डभृति देवे शासति सप्ताम्बुराशिरशनामशेषद्वीपमालिनीं महीं क इवाविशङ्कः सर्वव्यसनबन्धोरविनयस्य मनसाप्यभिनयं कल्पयिष्यति।

१ सांग वेदाध्ययनाचें मोठें फल सांगितलें आहे. 'तस्मात्सांगमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते।' सायणकृतोपोद्घात.

२ भूपतिरपि 'एवमस्माभिः श्रुतम्' इत्यभिधाय तूष्णीमेवाभवत्।

ह्या आद्यकवीच्या वचनाचें स्मरण होऊन वक्ता व श्रोता हे दोघेहि स्तुतीस पात्र आहेत, असें लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं! ह्या वेळीं हर्ष-राजानें **बाण**कवीचा सन्मान जरी केला नाहीं, तरी किंचित् प्रसन्न मुद्रेनें आपलें प्रेम व्यक्त केलेंच.

संध्याकाळीं **बाण** आपल्या बिऱ्हाडीं जाण्यास निघाला तेव्हां त्याच्या मनांत[2] आलें, हर्ष राजा हा उदारमनाचा व दयाळु खराच! लहानपणच्या स्वच्छंद वर्तनामुळें मजवर लोकापवाद होते तरी त्याचें मजवर प्रेम दिसलें. त्याचा मजवर खरोखरीच रोष असता तर त्यानें आपली प्रसन्नता दर्शविली नसती! मी आपली वर्तणूक सुधारावी व अधिक गुणवान् व्हावें, असा मात्र त्याचा रोख दिसला! आश्रितांनीं अधिक गुणवान् व्हावें, असें इच्छिणें ठीकच आहे! थोर असतात ते न बोलतां सवरतां आश्रितजनांस कृतीनेंच सद्गुणांचें शिक्षण देतात! धिक्कार असो मला कीं अशा गुणवान् राजा-विषयीं मीं भलतीच कल्पना केली होती! तर आतां माझें खरें स्वरूप त्याच्या ध्यानांत येईल अशी मी वर्तणूक ठेवीन. असा विचार करून तो राजशिबिरापासून निघून आपल्या आप्ताच्या घरीं जाऊन राहिला.

---

१ हें **हर्षा**चें वर्तन पाहून पंडितवर्य **जगन्नाथराय** याच्या वचनाचें येथें स्मरण होतें तें वचन हें होय:—

> **"विश्वाभिरामगुणगौरवगुम्फितानां**
> **रोषोऽपि निर्मलधियां रमणीय एव।**
> **लोकंपृणैः परिमलैः परिपूरितस्य**
> **काश्मीरजस्य कटुतापि नितान्तरम्या "॥**

गुणवान् थोर पुरुषाचा रोष देखील गमतीचाच असतो! ह्मणजे त्यापासून कोणाचा तोटा न होतां तो हितपर्यवसायीच होतो! आपल्या सुगंधानें लोकांना तृप्त करणाऱ्या केशराचा कडूपणा देखील मजेदारच वाटतो!

हें पद्य व यांतील उपमानोपमेयें तरी किती खुबीदार आहेत!

२ 'अकरोच्च चेतस्यातिदक्षिणः खलु देवो हर्षः–। 'यदेवमनेकबालचरितचापलोचितकौलीनकोपितोऽपि मनसा स्निह्यत्येव मयि। यद्यहमक्षिगतः स्यां न मे दर्शनेन प्रसादं कुर्यात्। इच्छति तु मां गुणवन्तं। उपदिशन्ति हि विनयमनुरूपप्रतिपत्युपपादनेन वाचा विनापि भर्तव्यानां स्वामिनः। अपि च धिङ् मां स्वदोषान्धमांस

यानंतर थोडक्याच दिवसांत **हर्ष**राजा व **बाण**कवि यांचा संयोग होऊन **बाण**कवीची छाप **हर्ष**राजावर बसून संतुष्ट झालेल्या **श्रीहर्षानें** **बाण**कवीस सन्मान, प्रेम, वित्त, विश्वास इत्यादिकांच्या परमावधीस नेऊन पोहोंचविलें. **"परमप्रीतेन प्रसादजन्मनो मानस्य प्रेम्णो विश्रम्भस्य नर्मणः प्रभावस्य च परां कोटिमानीयत नरेन्द्रेण"** इति

"अलब्धशाणोत्कषणा नृपाणां न जातु मौलौ मणयो वसन्ति।"

घर्षण झाल्याखेरीज रत्नें देखील राजाच्या मस्तकावर बसण्यास योग्य होत नाहींत! त्याप्रमाणें विद्वद्रत्न **बाण** याचें घर्षण केल्यावर हर्षराजानें त्यास आपल्या मस्तकावर बसविलें तें ठीकच! **हर्षानें बाणास व बाणानें हर्षास** अत्यंत महत्वाची देणगी दिल्याबद्दल पुढील श्लोकावरून कळून येण्यासारखें आहेः—

"हेम्नो भार[1]शतानि वा मदमुचां वृन्दानि वा दन्तिनां
श्रीहर्षेण समर्पितानि कवये बाणाय कुत्राद्य तत्।
या बाणेन तु तस्य सूक्तिनिकरैरुट्टंकिताः कीर्तय-
स्ताः कल्पप्रलयेऽपि यान्ति न मनाङ्मन्ये परिम्लानताम्॥"

श्रीहर्षराजानें **बाण**कवीस सुवर्णभारांचीं शतें दिलीं व अपरिमित गजेन्द्रसंपत्ति दिली तरी ती आतां कोठें राहिली आहे? परंतु **बाणानें** त्याच्या सत्कीर्ति (**हर्षचरित** वगैरे यांत) कोरून ठेवल्या आहेत, त्या प्रलयकालींहि नष्ट ह्मणून व्हावयाच्या नाहींत!

मनादरपीडितमेवमातिगुणवति राजन्यन्यथा चान्यथा च चिन्तयन्तम्। सर्वथा करोमि तथा, यथा, यथावास्थितं जानाति मामयं कालेन।' इत्येवमवधार्य चापरेद्युर्निष्क्रम्य कटकात्सुहृदां बांधवानां च भवनेषु तावदतिष्ठत्। यावदस्य स्वयमेव गृहीतस्वभावः पृथिवीपतिः प्रसादवानभूत्। अविशच्च पुनरपि नरपतिभवनम्। स्वल्पैरेवचाहोभिः परमप्रीतेन प्रसादजन्मनो मानस्य प्रेम्णो विश्रम्भस्य द्रविणस्य नर्मणः प्रभावस्य च परां कोटिमानीयत नरेन्द्रेणेति।" ह.च.उ.२.

1 भार ह्मणजे सुमारें आठहजार तोळे होतात.

श्रीहर्ष आणि बाण, मयूर व दिवाकर इत्यादि विद्वानांचा संयोग.

" सचित्रवर्णविच्छित्तिहारिणोरवनीश्वरः ।
श्रीहर्ष इव संघट्टं चक्रे बाणमयूरयोः ॥ "

नवसाहसांकचरित.

यावरून श्रीहर्षराजा आणि **बाण** व **मयूर** यांचें संमेलन झालें होतें असें उघड होतें.

" अहो प्रभावो वाग्देव्या यन्मातङ्गदिवाकरः ।
श्रीहर्षस्याभवत्सभ्यः समो बाणमयूरयोः ॥ "

राजशेखर.

ह्या **राजशेखराच्या** पद्यावरून **बाण, मयूर** व **मातंगदिवाकर** ह्या विद्वानांचा व **श्रीहर्षराजाचा** संयोग झाला होता, असें सप्रमाण आढळतें.

बाणकवि व **मयूर**कवि हे प्रसिद्धच आहेत. **बाणाचें हर्षचरित, कादंबरी** वगैरे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. **मयूर**कवीचें **सूर्यशतक** प्रसिद्ध आहे. त्यानें **सूर्यशतक** करून आपला रोग घालविला, यामुळेंच ' **आदित्यादेर्मयूरादीनामिवानर्थनिवारणम्** ' असें **काव्यप्रकाशांत** काव्यरचनेच्या फलांपैकीं एक फल सांगितलें आहे.

मातंगदिवाकर किंवा **दिवाकर** याच्या ग्रंथाची कोठें प्रसिद्धि नाहीं. **राजशेखरानें** वरील पद्यांत ' काय हो विद्यादेवीचा प्रभाव वर्णावा ! **श्रीहर्षाच्या** येथें **बाण** व **मयूर** यांच्यासारखाच **मातंग** (चांडाल?) **दिवाकर** हाहि सभासद होता असें ह्मणून आश्चर्य प्रदर्शित केलें आहे ! यावरून ***मातंग** हा हलक्या जातीचा असावा असें उघड दिसतें ! व **मातंग**

---

* पूर्वी **मातंग** या नांवाचा चांडाल होऊन गेला. त्यानें आपल्या शुद्धाचरणानें मोठें यश संपादिलें, असें बौद्धग्रंथांत आहे. **सुत्तनीपाठ.**

याचा अर्थ तसाच आहे. **राजशेखरानें** त्याचा आणि **बाण** व **मयूर** यांचा एकत्र संयोग पाहिल्यामुळेंच त्यास आश्चर्य वाटलें, असें उघड दिसतें! कोणी '**मातंगदिवाकर**' असें सबंध नांव ह्मणतात, परंतु त्यांत 'अहो' ह्या आश्चर्यकारक अव्ययाचें कांहीं स्वारस्य वाटत नाहीं! आतां विद्वान् **बौद्ध दिवाकरमित्र** याचें व **हर्षाचें** संमेलन झालें आहे, व त्यास त्यानें आपल्या बहिणीच्या दुःखाचें सांत्वन करण्याकरितां कांहीं कालपर्यंत मोठ्या मिनतवारीनें स्वारींत आपल्याबरोबर घेतलें असल्याचें **हर्षचरिताच्या** शेवटीं वर्णन आहे. बौद्धधर्मी लोकांस 'बाह्य' (धर्मबाह्य) हलक्या प्रतीचें ह्मटलें असल्याचें पूर्वींच्या ग्रंथांत आढळतें. राजा **भर्तृहरि**[1] हा **बौद्ध** होता व त्यास **वाचस्पतिमिश्रानें** '**तत्वबिंदु**' नांवाच्या ग्रंथांत 'बाह्य' (धर्मबाह्य—हलका) असें ह्मटलें आहे. यावरून **दिवाकरमित्रास मातंग** हें पद लावलें असेल तर कोण जाणे! हा **श्रीहर्षाच्या** सभेंत असण्याचा संभव आहे व हा मोठा विद्वान्‌हि होता असें त्याचे वर्णनांत आहे. असो, एकंदरींत **श्रीहर्षराजा** हा विद्याव्यसनी व विचारी असल्यामुळें धर्म व जाती यांकडे न पाहणारा व विद्वानांचा चाहता होता, असें सिद्ध होतें, व यावरून सुधारणेकडे त्याचें चांगलेंच लक्ष होतें, असेंहि ध्यानांत येण्यासारखें आहे. तसेंच **श्रीहर्षाचें** विद्या, कला यांच्या उत्तेजनाकडे व धर्मशाळा व दानधर्म यांजकडेहि चांगलें लक्ष होतें. असें हुएनसँग याच्या वर्णनांत आहे.

बाणकवि शरद्दतूंत **हर्षराजाकडून** आपल्या घरीं आल्याचें वर्णन आहे. तेव्हां तो **विजयादशमीचा** संमेलन-प्रसंग झाल्यावर आला असावा.

१ **भर्तृहरि** हा **उज्जयनीचा** राजा **विक्रमादित्य** याचा वडील भाऊ होता. त्याची स्त्री दुष्ट निघाल्यामुळें खिन्न होऊन त्यानें राज्यलक्ष्मीचा त्याग करून वैराग्य स्वीकारलें होतें. हा महावैय्याकरण होता. यानें व्याकरणमहाभाष्यावर '**सार**' नांवाची उत्तम व्याख्या केली. '**वाक्यपदीय**' नांवाचा ग्रंथ केला व **शतकत्रय** केलें. **भर्तृहरिच्या सारटीकेच्या** आधारेंच महावैयाकरण **कैय्यट** यानें भाष्यावर प्रदीप केला. **भर्तृहरि** हा इसवी सन ६५० त मरण पावला. असें **इद्दासिंग** यानें म्हटलें आहे.

हर्षराजाच्या परमादरास पात्र झालेल्या **बाण**कवीस शरदृतूच्या आरंभीं असलेल्या **विजयादशमी**चा संमेलनोत्सव झाल्यावरच हर्षराजाकडून घरीं जाण्यास परवानगी मिळाली असावी असें ध्यानांत येतें !

हर्षाच्या पराक्रमादि गुणांचें वर्णन.

श्रीहर्षराजानें **बाण**कवीचा मोठा सन्मान केला ह्मणून त्याच्या आप्त-मित्रांस फारच आनंद झाला. मग त्यांनीं त्यास **हर्षचरित** सांगण्या-विषयीं **बाणा**चा धाकटा चुलतभाऊ **श्यामल** यास खुणावलें. तेव्हां तो **बाणास** ह्मणाला, " **पुरूरवा**राजा हा ब्राह्मणधनाच्या लोभानें नाश पावला. **नुहुष**राजास इंद्रपद प्राप्त झालें तेव्हां **इंद्रायणी**ची कामना धरून त्यानें आपली पालखी वाहण्यास ऋषींस लावलें त्यामुळें **अगस्ति**ऋषीनें त्यास शाप दिला, त्या योगानें त्यास सर्पयोनी प्राप्त झाली. **ययाति**राजानें ब्राह्मणकन्या **देवयानी** इचें पाणिग्रहण केल्यामुळें तो पतित झाला. **सुद्युम्न**राजा मृगया करण्यास गेला असतां **शिवशापानें** स्त्रीरूपी झाला. **सोमक** राजानें आपला पुत्र **जंतु** याचा अनेकपुत्रप्राप्तीसाठीं निर्दय-पणानें वध केला. राजा **मांधाता** यानें पृथ्वी जिंकून तो स्वर्ग जिंकावयास गेला असतां इंद्रानें त्यास पाताल जिंकून ये ह्मणजे मीं तुझें दास्य करीन असें सांगितलें, तेव्हां तो पाताळीं गेला असतां तेथें **लवणासुरानें श्री-शंकराच्या** वरामुळें त्यास पुत्रपौत्रांसह मारिलें. **पुरुकुत्स**राजा हा **नर्मदा-**तटाकीं तप करीत असतां परस्त्रीसक्त झाल्यामुळें नाश पावला. **कुव-लयाश्व**राजा पाताळीं गेल्यामुळें त्याला अश्वतरकन्येबरोबर विवाह करावा लागला. **पृथु**राजानें स्वपराक्रमानें पृथ्वीस जर्जर केलें. **नृग**राजानें ब्राह्मणाला दिलेली गाय पुन्हा दुसऱ्यास दिल्यामुळें तो वर्णसंकर होऊन सरड्याच्या जन्मास गेला. **सौदास**राजानें **शक्र**नांवाच्या ब्राह्मणास चाबूक मारल्यामुळें त्याच्या शापानें तो मनुष्यभक्षक राक्षस झाला. **नल**राजानें द्यूतव्यसनामुळें पराभव पावून राज्य गमावलें. **संवरण**राजा **मित्र** (सूर्य)

कन्या **तपती** इजवर आसक्त झाल्यानें दुःख पावला. **दशरथ**राजा मृगया व्यसनामुळें शाप पावून प्रियपुत्रविरहानें परलोकास गेला. **कार्तवीर्य**राजानें **जमदग्नि**ऋषीस पीडल्यामुळें **जामदग्न्यरामा**नें त्यास मारिलें. **मरुत्त**राजानें यज्ञांत बहुत द्रव्य दिलें तरी देवब्राह्मणांना तो मान्य झाला नाहीं. **शंतनु**-राजा हा **गंगे**च्या वियोगानें अत्यंत शोकाकुल झाला. **पांडु**राजानें स्त्रीसंभोगाची अपेक्षा केल्यामुळें ऋषिशापामुळें तो परलोकवासी झाला. **धर्म**-राजानें **गुरुद्रोणा**च्या भीतीमुळें समरांगणांत सत्य सोडलें. असा प्रत्येक राजांत दोष दृष्टीस पडतो तसा **हर्ष**राजांत आढळत नाहीं. **हर्ष**राजाचे गुण अवर्णनीय आहेत. **हर्ष**राजानें पुष्कळ राजांस जिंकून त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं, कांहीं राजांवर क्षमा केली, **सिंधु**राजाचा पराभव करून त्याची राज्यलक्ष्मी हरण केली, **कुमार** (गुप्त ?) राजास **दर्पशातगजेंद्रा**नें धरलें असतां खड्गानें त्यास सोडविलें ! **कुमारा**स (**भास्करवर्मा** यास) राज्यावर बसविलें, **हिमालया**जवळच्या प्रदेशांतील उद्धट राजांस जिंकून कर घेतले, जागजागीं प्रजापालन करणारे अधिकारी नेमले, आपलें सर्व द्रव्य ब्राह्मणांनां व श्रमणांनां दिलें ! अशीं अनेक आश्चर्यकारक महत्कृत्यें त्यानें केल्याचें ऐकिलें. याकरितां **महाभारता**सारखें त्याचें प्रशंसनीय चरित्र ऐकण्यास कोणाला कौतुक वाटणार नाहीं ? तरी त्या राजर्षीचें चरित्र सांगून हा **भार्गववंश** अत्यंत पवित्र करावा ! " यावर **बाण** ह्मणाला, " स्वार्थदृष्टि असतात त्यांच्या ध्यानांत शक्याशक्य गोष्टींचा विचार येत नसतो ! **हर्षचरित** केवढें तरी मोठें आहे ! व तें सर्व सांगणें मजकडून अशक्य आहे, तथापि तें मी तुमच्या आग्रहावरून यथामति सांगेन.आज आतां संध्याकाल झाला आहे " असें बोलून **बाण शोण**नदावर सायंसंध्येस गेला. दुसरे दिवशीं प्रातःसंध्यादि कर्मे आटोपल्यावर सर्व मंडळी त्याजवळ येऊन बसली. तेव्हां त्यानें **हर्षचरित** सांगण्यास आरंभ केला.

बाणकविवर्णित संक्षिप्त-हर्षचरित व त्यांतील कांहीं महत्वाच्या गोष्टींबद्दल उल्लेख.

बाणकविवर्णित संक्षिप्त-**हर्षचरित** व त्यांतील कांहीं महत्वाच्या गोष्टींबद्दल विवेचन—**हर्षचरितां**त कालानिर्णयाचा अभाव—**हुएनसँग**वर्णित-**हर्षचरित**—**बाणा**च्या वर्णनाशीं **हुएनसँग**वर्णित बऱ्याच गोष्टींचा मेळ आणि **हर्ष** व **बाण** यांचा कालनिर्णय. **हर्षा**चा प्रतिस्पर्धी दुसरा **सत्याश्रयपुलकेशी** याचें प्रसंगानें संक्षिप्त चरित्र-**हर्षा**चें दानशूरत्व-व त्याचें सप्रमाण ग्रंथकर्तृत्व. प्रसंगानें डॉ. **हॉल** याच्या मताचें निराकरण व **हर्षा**चा **बौद्ध**धर्माकडे कल—**हर्षा**ची राजधानी, राज्यविस्तार व त्याचा मृत्युकाल.

हर्षाच्या पूर्वजांचें स्थान.

श्रीकंठदेशांत **स्थाण्वीश्वर** (**स्थानेश्वर** किंवा **ठाणेश्वर,** यास **कुरुक्षेत्र** असेंहि नांव आहे.) येथें **श्रीहर्षा**च्या पूर्वजांचें व त्यांच्या राजधानीचें ठिकाण होतें. तें पुढें **हर्ष** राजानें **कान्यकुब्ज** (**कनोज**) येथें नेलें. त्याच्या वंशाचा मूळपुरुष **पुष्पभूति**नांवाचा मोठा विख्यात राजा होऊन गेला. त्याचे वंशांत बऱ्याच कालानंतर **हर्षा**चा बाप **प्रभाकरवर्धन** किंवा **प्रताप-शील** हा मोठा पराक्रमी राजा झाला. हा राजा मोठा सूर्यभक्त होता. हा **हूण**रूपहरिणांनां सिंहासारखा, **सिंधु**राजाला ज्वरासारखा, **गुर्जर**राजांनां निद्रा येऊं न देणारा, **गांधार**राजरूपमत्तगजाची मस्ती

हर्षाचे पूर्वज व मातापितर.

---

१ हर्षाच्या बापाचें नांव **प्रभाकरवर्धन** व आईचें **यशोमती**; आजाचें नांव **आदित्यवर्धन** व आजीचें **महासेनगुप्ता**; पणजाचें नांव **राज्यवर्धन** व पणजीचें **अप्सरादेवी**; निपणजाचें नांव **नरवर्धन** व निपणजीचें **वज्रिणीदेवी**; असें होतें. **हर्षा**चा बाप, आजा, पणजा, हे तिघेहि सूर्यभक्त होते. परंतु **हर्षा**चा वडील भाऊ **राज्यवर्धन** हा बौद्ध होता, असें **ताम्रपत्रां**तील '**परमसौगतः**' या पदावरून कळतें. **हर्ष** हा शिवभक्त होता. हें **हर्षचरिता**वरून व **ताम्रपत्रां**तील '**परममाहेश्वर**' या पदावरूनहि स्पष्ट होतें. परंतु पुढें तोहि **बौद्ध** झाला असावा असें लक्षांत येतें. हा मजकूर आरंभीं दिलेल्या **ताम्रपत्रां**तून घेतला आहे.

जिरविणारा, **लाटराजाचा** उच्छेद करणारा, **मालवराजाच्या** लक्ष्मीरूप-लतेस केवळ परशुच ! असा होता. **प्रभाकराच्या** स्त्रीचें नांव **यशोवती** असें होतें.

हर्षाचीं भावंडें.

प्रभाकरवर्धनानें अनेक पराक्रम केले, त्यामुळें त्याला **प्रतापशील** असें नांव पडलें. त्यानें पुष्कळ सूर्याराधना केल्या वर त्यास प्रथम पुत्र झाला. त्याचें नांव **राज्यवर्धन** असें ठेवलें. तो पांच वर्षांचा झाल्यावर राजास दुसरा मुलगा झाला त्याचें नांव **हर्ष** असें ठेवलें. **हर्षा**च्या पाठीवर तीन वर्षांनीं मुलगी झाली; तिचें नांव **राज्यश्री** असें ठेवलें. ह्या मुलांच्या सहवासास **यशोवती**च्या भावानें आपला मुलगा **भंडी** यास आणून ठेवलें. **भंडी** हा राजपुत्रास सोबती होऊन तोहि त्याजबरोबर शस्त्रास्त्रांत प्रवीण झाला. राजकन्या **राज्यश्री** हीहि तीव्रबुद्धीची होती. ती नृत्यगीतकलांत प्रवीण झाली. यावरून पूर्वकालीं राजेलोकांत तरी मुलीस नृत्यगीत शिकविण्याची चाल होती, असें उघड होतें. राजपुत्र तारुण्यांत आल्यावर **प्रतापवर्धनानें** त्यांच्या तैनातीस अत्यंत विश्वासूक व प्रामाणिक असे **मालवराजपुत्र-कुमारगुप्त** व **माधवगुप्त**-यांस दिलें. राजाजवळ सेवकजन अकृत्रिम स्नेह करणारे, विश्वासूक व जिवास जीव देणारे असल्याचे **बाणाचे** वर्णनावरूनहि कळून येतें.

हर्षाचे सोबती.

प्रतापवर्धनानें आपली मुलगी **राज्यश्री** ही **ग्रहवर्म्यास** दिली त्यावेळीं मुख्य कुल-शील पाहण्याविषयीं त्यानें वर्णिलें आहे. पुष्कळ मागण्या आल्या होत्या तरी '**मौखरी**' घराण्याचा मोठा लौकिक असल्यामुळें **प्रतापवर्धनानें** **अवंती-वर्म्याचा** मुलगा **ग्रहवर्मा** यास आपली मुलगी दिली. **राज्यश्री** थोडे दिवसांनीं आपल्या पतीबरोबर सासरीं गेली.

कुल-शील पाहून शरीरसंबंध करण्या-विषयीं **प्रतापवर्धनाचें** मत.

सर्व मुलें तारुण्यांत आलेली पाहून राजास फार आनंद झाला. त्यांत वडील पुत्र **राज्यवर्धन** हा (कवचहर) पराक्रमाचीं कृत्यें करण्यासारखा

' **विक्रमरसानुरोधिनि वयसि वर्तमानः ।**' झालेला पाहून उत्तरेकडे **हूण**लोक पुंडाई करूं लागल्यामुळें **प्रभाकरवर्धनानें राज्यवर्धना**स त्यांवर पाठविलें. **हर्ष**हि भावाच्या स्वारीबरोबर निघाला होता, परंतु तो **हिमालया**च्या झाडींत शिकार करण्याकरितां राहिला.

राज्यवर्धनाची हूणावर स्वारी.

इकडे राजा विषमज्वरानें आजारी पडला, हें वर्तमान कळविण्याकरितां जासूद राजपुत्राकडे धावले. **हर्षा**स आपला पिता अस्वस्थ असल्याचें कळतांच तो भूक तहान न जुमानतां आपल्या पित्याकडे आला. पितापुत्रांची प्रेमालिंगनपूर्वक भेट झाली. पुढें राजाचें दुखणें कमी न होतां अधिक होत चाललें. त्यामुळें **हर्ष** फारच दुःखीकष्टी झाला. **प्रभाकरवर्धनानें** पुत्राचें पुष्कळ प्रकारें सांत्वन केलें, त्यांत उदात्त तत्व भरलेलें आहे राजानें पुत्रास मुख्य प्रजारंजनाचा उपदेश केला आहे.

प्रतापवर्धनास विषमज्वर व त्याचा **हर्षा**स उपदेश.

" प्रजारंजनाच्या योगानेंच राजे बंधुमान् होतात, स्वज्ञातीच्या योगानें होत नाहींत "—असा त्यानें उत्तम प्रकारचा उपदेश केला आहे.

यशोवती सौभाग्य घेऊन पतीच्या आधीं परलोकीं जाण्यास सिद्ध झाली. तिनें तसें करूं नये ह्मणून **हर्षानें** आपली पराकाष्ठा केली परंतु ती निश्चयी, शूर बायको ह्मणाली— "मी ' वीरकन्या ' 'वीरपत्नी' व 'वीरमाता ' आहें. मला मरणाची काय भीति आहे?" असें म्हणून तिनें अग्निप्रवेश केला. पुढें **राज्यवर्धन**हि घरीं आला व मातृपितृवियोगानें तो विरक्त होऊन व राज्य **हर्षा**च्या स्वाधीन करून वनवासास जाण्यास सिद्ध झाला.

यशोवतीचें पतीच्या आधीं परलोकीं जाणें व राजाचा मृत्यु.

राज्यवर्धनाची विरक्तता.

'**मालवलक्ष्मीलतापरशु**' **प्रतापवर्धन** वारल्यामुळें **मालवानें ग्रहवर्म्या**स मारून **राज्यश्री**स बंदींत टाकल्याची बातमी आली. त्यामुळें **राज्यवर्धना**ची विरक्तता जाऊन त्यानें दहाहजार घोडेस्वारांनिशी

याची विरक्तता जाऊन शत्रूवर स्वारी.

भंडीस[१] बरोबर घेऊन मालवावर स्वारी केली. राज्यवर्धनानें मालवास तेव्हांच जिंकलें. परंतु गौडराजा शशांक (यास कर्णसुवर्णचा राजा असेंहि हुएनसँग याचे पुस्तकांत आहे.) यानें राज्यवर्धनास फसवून मारिलें. त्यावेळीं हर्ष पुढील कर्तव्याविषयीं गोंधळून गेला होता. तेव्हां सिंहनादसेनापतीनें पराक्रम करण्याबद्दल व पृथ्वी जिंकण्याबद्दल हर्षास उपदेश करून उत्तेजन दिलें आहे.

तींत त्याचा अंत.

हस्तिसेनापति-स्कंदगुप्त-याचा हर्षास उपदेश.

गजसेनापति स्कंदगुप्त यानेंहि पूर्वेतिहासांतील उदाहरणें सांगून हर्षास सावधगिरीचा उपदेश केला आहे. तोहि समयोचित असल्यामुळें येथें दिला आहे.

" पद्मावतींत नागसेनाची मसलत सारिकेच्या उच्चारण्यानें समजल्यामुळें त्याचें राज्य गेलें. मृत्तिकावतींत सुवर्णचूड झोपेंत बरळल्यामुळें त्याची मसलत फुटून त्याच्या नाशास कारण झाली. यवनेश्वर गुप्त पत्र वाचीत असतां त्यांतील अक्षरें त्याच्या चूडामणींत प्रतिबिंबित झाल्यामुळें शत्रूकडून आलेल्या दासीस तीं दिसून त्याचा नाश झाला. अतिलोभी मथुरेचा राजा बृहद्रथ हा कृष्णपक्षांतील रात्रीं निधि खणीत असतां विदूरथाच्या सैनिकांनीं खड्गांनीं त्याचा वध केला. उज्जयनीचा राजा महासेन याचे सैनिकांनीं गजवनांत हत्तीस धरण्याच्या नादीं लावून कृत्रिम गजेंद्रांतून निघून वत्सराजास पकडलें. मित्रदेवानें नृत्यप्रिय अग्निमित्राचा मुलगा सुमित्र याचा नटांत बसून शिरच्छेद केला. अश्मकेश्वर शरभ हा वीणावाद्यप्रिय

---

१ ' अयमेको भण्डिरयुतमात्रेण तुरङ्गमाणामनुयातु माम् '। ' इत्यभिधाय चानन्तरमेव प्रयाणपटहमादिदेश । ' ह. च. उ०

२ ' तथाहि तेन शशांकेन विश्वासार्थं दूतमुखेन कन्याप्रदानमुक्त्वा प्रलोभितो राज्यवर्धनः स्वगेहे सानुचरो भुञ्जान एव छद्मना व्यापादितः । '

शशांक नांवाच्या गौडराजास राज्यवर्धनाचा उत्कर्ष सहन न होऊन त्यानें ' मी आपली कन्या तुम्हांस देतों ' असें सांगून त्यास आपले घरीं मेजवानीस बोलाबून कपटानें मारलें ! ' असें टीकेंत आहे.

असल्यामुळें शत्रूंनीं तंबुऱ्यांत तलवारी ठेवून गवयांचे वेष घेऊन त्यास मारलें. नीच अशा सेनापति **पुष्पमित्रानें** निर्बुद्ध **मौर्यबृहद्रथा**स सैन्य दाखविण्याच्या मिषानें नेऊन मारलें. चमत्कार पाहणाऱ्या **चंडिपतीस** यवनानें आकाशगामी विमानानें भलतीकडेच नेलें. **शिशुनागा**चा मुलगा **काकवर्ण** यास शत्रूंनीं नादीं लावून स्वदेशीं नेऊन मारलें. अमात्य **वसुदेव** यानें दासीस राणीचा वेष देऊन अतिस्त्रीलंपट **शुंगास** मारिलें. **विंध्यराजा**च्या मंत्र्यांनीं स्त्रीनूपुरांचा झणत्कार असलेल्या **गोधन**पर्वताच्या विवरानें **मगधराजास स्वदेशीं नेलें. तालजंघवेतालानें** मांसविक्रयांत वाद करणाऱ्या **प्रद्योता**चा कनिष्ठ कुमार **कुमारसेन** यास **महाकाला**च्या उत्सवांत मारिलें. पुष्कळांस औषधें देऊन प्रसिद्ध झालेल्या वैद्यछद्मी लोकांनीं **जनकराजपुत्र गणपति** यास क्षय उत्पन्न केला. महाराणीच्या गृहांत भिंतींत लपून राहिलेला तिचा भाऊ **वीरसेन** यानें **कलिंग** राजाचा वध केला. पलंगाखालीं लपून बसून दुसऱ्या मुलाला राज्यावर बसविणाऱ्या **करूषाधिपति दध्रा**चा वध केला. **शूद्रक**राजाच्या दूतानें एकांतीं मसलत करण्याच्या निमित्तानें **चकोर**-देशचा राजा ससचिव **चंद्रकेतु** यास मारलें. **चंपाधिपतीच्या** सैनिकांनीं उंच वाढलेल्या देवनळ तृणाच्या कुरणांत छपून बसून मृगयासक्त होऊन गेंड्याच्या पाठीस लागलेल्या **चामुंडीपति-पुष्करा**चे प्राण घेतले. शत्रूंनीं पाठविलेल्या **मंख**लोकांनीं स्तुतिप्रिय **मौखरी**कुलांतला मूर्ख **क्षत्रवर्मा** याची जयजयकारपूर्वक स्तुति करतां करतां नाश केला. **चंद्रगुप्ता**ची भावजय **ध्रुवदेवी** हिची कामना करणाऱ्या **शक**राजाचा स्त्रीवेषानें गुप्त अशा **चंद्रगुप्तानें** शिरच्छेद केला. मधुर व सुवासिक लाह्यांत विष घालून पुत्रास राज्य मिळावें म्हणून **सुप्रभेनें काशी**राजास मारिलें. कामसंचाराच्या मिषानें **रत्नावतीनें अयोध्येचा** राजा **जारूथ** यास—ज्याच्या सभोंवती वस्तऱ्यासारखी तीक्ष्ण धार केली आहे अशा आरशानें—मारलें. दिराशीं लागू असलेल्या **देवकीनें सुह्म**देशचा राजा **देवसेन** यास विषानें माखलेल्या कानावरच्या कमलानें फेंकून मारिलें. सवतीच्या रागानें **वल्लभेनें** अभिचाराच्या योगानें भारलेल्या रत्नाच्या पादभूषणानें **वैरंती**नगरीच्या **रंतिदेवाला** मारिलें. वेणींत गुप्त शस्त्र

ठेवून **बिंदुमतीनें** विदूरथवृष्णीला मारिलें. **हंसवतीनें** विषलिप्त मेखलामणीनें **सुवीरदेशचा** राजा **वीरसेन** यास मारिलें. **पौरवाच्या** राणीनें न दिसणाऱ्या औषधानें मुख लेपून सविष गंडूषपानानें **पौरवेश्वर सोमकास** मारिलें. असे अनेक कामांध पुरुषांचे स्त्रियांनीं व इतर प्रकारांनीं केलेले घात महाराजांच्या कानीं आले असतीलच." असें बोलून **स्कंदगुप्तानें** हर्षराजास सावध राहण्याविषयीं सूचना करून हस्तिसैन्य सज्ज करण्यास तो निघून गेला.

हर्षाची प्रतिज्ञा.

त्यावेळीं हर्षानें +प्रतिज्ञा केली आहे कीं, थोड्या दिवसांत **गौडाधमाचा** नाश करणार नाहीं, तर अग्निकाष्ठेंच भक्षण करीन व त्याप्रमाणें तो शत्रूचा समूळ उच्छेद करण्यास प्रतिज्ञा करून निघाला आहे.

बाणाच्या नेहमींच्या वर्णनपद्धतीवरून पाहिलें असतां सहाव्या व सातव्या उच्छ्वासाच्या आरंभीं पुढील गोष्टींचीं सूचक पद्यें त्यानें घातलीं आहेत. त्यांवरून हर्षानें केलेली प्रतिज्ञा शेवटास गेल्याखेरीज राहिली नसावी. तीं पद्यें हीं होत:—

" विश्रब्धघातदोषः स्ववधाय खलस्य वीरकोपकरः।
नवतरुभंगध्वनिरिव हरिनिद्रातस्करः करिणः ॥ "

याचा अर्थ असा कीं, " जसा हत्तीनें मोडलेल्या वृक्षाचा आवाज सिंहाच्या निद्राभंगाला कारण होऊन तो हत्तीच्या नाशासच कारण

+ 'यदि परिमितैरेव दिवसैर्निर्गौडां न करोमि मेदिनीं ततस्तनूनपाति पीतसर्पिषि पतंग इव पातकी पातयाम्यात्मानम् ।'

हर्षानें बंधुघातकी वैऱ्यास शासन केल्याखेरीज अन्नग्रहण करावयाचें नाहीं अशी प्रतिज्ञा केल्याबद्दल ' **हुएनसँग** ' याच्या प्रवासवर्णनांतहि मजकूर आहे:- " The enemies of my brother are unpunished as yet, the neighbouring countries not brought to submission; while this is so, my right hand shall never lift food to my mouth." Huen Thsang. Vol. I p. 213.

होतो, त्याप्रमाणें विश्वासलेल्याचा (**राज्यवर्धना**चा) घात करून वीर पुरुषाच्या (**हर्षा**च्या) कोपाला कारण होऊन तो दुष्ट (**गौड**) स्वतः-च्याच नाशास कारण झाला. ”

“ अंगनवेदी वसुधा कुल्या जलधिः स्थलीच पातालम् ।
वल्मीकश्च सुमेरुः कृतप्रतिज्ञस्य धीरस्य ॥ ”

‘ प्रतिज्ञा केलेल्या **हर्षा**सारख्या शूर पुरुषाला अंगणासारखी पृथ्वी, अल्पनदीसारखा समुद्र, भूतलासारखें पाताळ आणि वारुळासारखा **मेरु** वाटतो !’ आणखी—

“ धृतधनुषि बाहुशालिनि शैला न नमंति यत्तदाश्चर्यं ।
रिपुसंज्ञकेषु गणना कैव वराकेषु काकेषु ॥ ”

‘ पराक्रमी **हर्षा**सारख्या पुरुषानें धनुष्य धारण केलें असतां पर्वत नम्र होत नाहींत, हेंच आश्चर्य होय ! मग क्षुद्र शत्रूंची कथा ती किती !’ अशा प्रकारचे पुढील जयसूचक उद्गार **बाणानें हर्षा**च्या जैत्रयात्रेच्या आरंभीं घालून ठेवले आहेत ते उगीच नसावे. **बाणानें ‘ अग्रजवधकलंकप्रक्षा-लनाकुलः** ’ असेंहि विशेषण **हर्षा**स दिलें आहे.

हर्षानें प्रथम पूर्वदिशेकडे **गौडा**वर आपल्या स्वारीचा रोख धरला असल्यामुळें संध्याकाल वर्णनांत ‘ **गौडा**पराधाच्या शंकेनेंच पूर्वदिशा काळी पडली ! ’ ‘ अन्य राजांचे प्रतापाग्नि विझविल्यामुळेंच पृथ्वी कृष्णवर्ण दिसूं लागली ! ’ ‘ **गौडा**बरोबर असें युद्ध करावयाचें, तसें करावयाचें ’ इत्यादि वर्णनावरून व **हर्षा**च्या निकराच्या प्रतिज्ञेवरून **गौडशशांक** याचा **हर्षा**च्या हातून वध किंवा अगदीं पराभव तरी झालाच असावा यांत संशय नाहीं.

हर्षाचें प्रयाण.

हर्षाचें दुर्निमित्ताकडे दुर्लक्ष व **हर्ष** व **ड्यूक वुइल्यम** यांचें विचारसाम्य.

---

१ ‘गौडापराधशंकिनीव श्यामतां प्रपेदे दिक्प्राची । प्रचिततिमिरनिवहा निर्वाणान्यनृपप्रतापानलकलापेव कालिमानमतानीन्मेदिनी । कदाचिदेकांतप्रवृत्ताश्ववारचक्रचर्व्यमाणगौडविग्रहम् ॥ ’ ह. च. उ. ७

हर्ष दिग्विजयास निघाला तेव्हां त्यास शुभ शकुन व त्याच्या शत्रूंनां अपशकुन झाल्याचें **बाणानें** वर्णिलें आहे. ज्या ज्या वेळेस **हर्षास** अनुकूल किंवा प्रतिकूल गोष्टी घडून आल्याचें **बाणानें** वर्णन केलें आहे, त्या त्या वेळेस शुभ किंवा अशुभ शकुन झाल्याचें त्यानें वर्णन केलें आहे. प्रयाण-कालीं '**अहमहमिकया सेवकैरिव सुनिमित्तैरग्रतो भवद्भिः**' सेवका-प्रमाणें शुभशकुन जसे काय मी मी म्हणत **हर्षापुढें** धांवूनच येत होते! असें वर्णन आहे.

हर्ष शत्रूवर चाल करण्यास निघाला तेव्हां तो ***सरस्वतीनदीच्या** काठीं प्रथम प्रस्थानाकरितां तृणमय राजमंदिर तयार केलें होतें तेथें तो गेल्यावर त्या ठिकाणच्या कुलकरणीसहित पाटलानें **नंदीच्या** शिक्क्याची नवी सुवर्णमुद्रा **हर्षास** नजर केली. ती तो बोटांत घालीत असतां, मऊ मृत्ति-

---

* 'नातिदूरे च नगरादुपसरस्वति निर्मिते महति तृणमये, समुत्तम्भिततुङ्ग-तोरणे, वेदीविनिहितपल्लवललामहेमकलशे, बद्धवनमालादाम्नि, धवलध्वज-मालिनि, भ्रमच्छुक्लवाससि, पठद्विजन्मनि, मन्दिरे प्रस्थानमकरोत्। तत्रस्थस्य चास्य ग्रामाक्षपटलिकः सकलकरणिपरिकरः 'करोतु देवो दिवसग्रहणमद्यैवावन्ध्यशासनः शासनानाम्' इत्यभिधाय वृषाङ्कामभिनवघटितां हाटकमयीं मुद्रामुपनिन्ये। जग्राह च तां राजा। समुपस्थापिते च प्रथमत एव मृत्पिण्डे परिभ्रश्य करकमलादधोमुखी महीतले पपात मुद्रा। मन्दाश्यानपङ्कपटले मृदुमृदि सरस्वती-तीरे स्फुटं व्यराजन्त राजयो वर्णानाम्। अमङ्गलाशंकिनि च विषीदति परिजने नरपतिरकरोन्मनस्येतत्–' अतत्त्वदर्शिन्यो हि भवन्त्यविदग्धानां धियः। तथाहि। एकशासनमुद्राङ्का भूर्भवतो भविष्यतीति निवेदितमपि निमित्तेनान्यथा गृह्णन्ति ग्राम्याः।' इत्यभिनन्द्य मनसा महानिमित्तं तत्सीरसहस्रसंमितसीम्नां ग्रामाणां शत-मदाद्द्विजेभ्यः निनाय च तत्र तं दिवसम्। प्रतिपन्नायां शर्वर्यां संमानितसर्वराज-लोकः सुष्वाप।

अथ गलति तृतीये यामे सुप्तसमस्तसत्वनिःशब्दे दिक्कुञ्जरजृम्भमाणगम्भीर-ध्वनिरताड्यत प्रयाणपटहः। अग्रतः स्थित्वा च मुहूर्तमिव पुनः प्रयाणक्रोशसंख्या-पकाः स्पष्टमष्टावदीयन्त प्रहाराः पटहे पटीयांसः।' ह. च. उ. ७.

* वरील गोष्टीवरून पाटील व कुलकरणी यांची वृत्ति दीडहजार वर्षांपूर्वी-पासून चालत आलेली आहे असेंहि उघड होतें!

केवर पडली. तेव्हां बरोबरचे लोक हा अपशकुन झाला ह्मणून चिंताक्रांत झाले. तें पाहून ह्या अविचारी लोकांचा भलताच ग्रह होईल म्हणून **हर्षानें** आनंदानें 'ही पृथ्वी माझ्या मुद्रांकित* झाली.' असें बोलून ब्राह्मणांनां शंभर गांव दिले व त्या दिवशीं तेथें राहून उत्तररात्रीं तो तेथून पुढें चालता झाला! तथापि धर्मानें अशुभ नाहींसें होतें, ही समजूत त्या काळीं दृढ होती असें दिसतें! यावरून राजेलोक तरी शकुनादिकांवर× भरवसा ठेवूनच सर्वकाल चालत होते असें दिसत नाहीं!

ब्रह्मदेशचा राजा कुमार भास्करवर्मा याचा हर्षाबरोबर तह.

वाटेनें तो राजे जिंकीत चालला असतां **प्राग्ज्योतिष** (**ब्रह्मदेश** किंवा **असाम**) चा राजा **कुमार भास्करवर्मा** यानें हर्षराजाबरोबर तह करण्याकरितां त्याजकडे रत्नखचित छत्र वगैरे पुष्कळ वस्तूंचा नजराणा पाठविला आहे; तेव्हां हा शुभ शकुन झाला असें त्यानें मानलें आहे.

---

* ह्या **हर्षाच्या** उक्तींत व कृतींत आणि **ड्यूक वुइल्यम** याच्या उक्तींत व कृतींत साम्य जमून आलें आहे, तें खालीं दिलें आहे.

" Duke William (William the Conqueror) in landing (in the year 1066.) fell forward on the sand ! His train, filled with the superstition of the times, thought the omen bad, until with ready wit he cried, " See, my lords, I have taken possession of England with both my hands. " The Royal History of England.

×याचप्रमाणें **कादंबरींत चंद्रापीड वैशंपायनास** आणण्याकरितां घरून निघाला त्यावेळेस त्यानें ज्योतिष्यांस बोलावून आणून सांगितलें कीं, "माझें येथून जसें लवकर निघणें होईल तसें पित्यास किंवा **शुकनास**प्रधानास सांगावें." यावर त्यांनीं विनंति केली "हल्लींच्या ग्रहांवरून आमच्या मतें येथून जाणेंच युक्त नाहीं! दुसरें, राजेच्छेप्रमाणेंच काल अनुसरतो, **'राजा कालस्य कारणम्'** ज्या वेळेस राजाच्या मनांत येईल तोच मुहूर्त!" तो म्हणाला, 'वडिलांची आज्ञा असल्यामुळें मी सांगितलें, नाहींतर कार्यपरतंत्रांना प्रतिक्षणीं अनेक कामें करावयाचीं

हर्षाची भंडी, दिवाकरमित्र व राज्यश्री यांजबरोबर भेट.

हर्षाची व **भंडी**ची वाटेनें गांठ पडली. तेव्हां दोघांनीं **राज्यवर्धना**विषयीं फार शोक केला. **राज्यश्री** ही अटकेंतून सुटून **विंध्याटवींत** गेली, असें **भंडी**च्या सांगण्यावरून समजतांच **हर्षानें** भंडीस '¹ तूं सैन्य घेऊन **गौडा**वर जा' असें सांगून तो आपल्या बहिणीचा शोध करण्यास गेला.

विंध्याटवींत हर्षाची व **दिवाकरमित्र बौद्ध**भिक्षूची भेट झाली. हा आपला मेव्हणा **ग्रहवर्मा** याचा बालमित्र असल्याचें **हर्षा**स माहीत होतें. तेथील अरण्यांत त्याची बहीण जीव देण्यास सिद्ध झाली होती, तिचीहि गांठ पडली. पुढें **दिवाकरमित्रानें** उभयतांचें सांत्वन केलें. मग **राज्यश्री** ही विरक्ततेनें बौद्धदीक्षा घेण्यास सिद्ध झाली असतां 'माझें कर्तव्य उरकल्यावर मी व ही बरोबरच बौद्धदीक्षा घेऊं' असें **हर्षानें बौद्धगुरूस** सांगितलें, त्यानेंहि त्याप्रमाणेंच आपलें अनुमोदन दिलें. **दिवाकरमित्रा**ची विद्वत्ता, दयालुता व सदाचारता हीं लक्षांत आणून **हर्षानें**, कांहीं दिवस आपल्याबरोबर राहून त्यानें आपल्या बहिणीचें दुःख कमी करावें म्हणून **दिवाकरमित्रा**ची प्रार्थना केली, ती त्यानें मान्य केली. मग आपल्या

असतात, तेव्हां त्यांनीं कोठवर मुहूर्तावर अवलंबून रहावें! याकरितां उद्यांच दिवस बरा असल्याचें सांगावें.' असें **चंद्रापीडा**चें भाषण ऐकून त्यांनीं त्याचे पित्यास त्याप्रमाणें सांगण्याचें कबूल केलें. असें **कादंबरींत**हि वर्णिलें आहे. यावरूनहि त्यावेळीं राजेलोक कार्यानुरोधानें वागत असल्याचें दिसतें!

'तत्र चापनीतसमायोगो गमनायोत्ताम्यता हृदयेन गणकानाहूय रहस्याज्ञापितवान्। यथा विना परिविलंबेन मे गमनं भवति तथा भवद्भिरार्यशुकनासाय पृच्छते ताताय वा दिनमानवेदनीयम्। इत्येवमादिष्टास्ते व्यज्ञापयन्। देव यथा सर्व एव ग्रहाः स्थितास्तथास्मन्मतेन देवस्य गमनमेव वर्तमाने न शस्यते। अपरमपि कर्मानुरोधाद्राजेच्छैव कालः। तत्रापि न कार्यमेवाहर्निरूपणया। 'राजा कालस्य कारणम्' यस्यामेव वेलायां चित्तवृत्तिः सैव वेला सर्वकार्येषु। इति विज्ञापिते मौहूर्तिकैः पुनस्तानब्रवीत्। तातेनैवमादिष्टमिति ब्रवीमि। अन्यदात्ययिकेषु कार्येषु कार्यपराणां प्रतिक्षणोत्पादिषु च दिवसनिरूपणैव कीदृशी। तत्तथाकथयिष्यत यथा श्व एव गमनं भवेदिति।' कादं० २९४.

१ 'भवानपि कटकमादाय प्रवर्ततां गौडाभिमुखम्।' ह. च. उ. ७.

बहिणीस घेऊन हर्षराजा **दिवाकरमित्रा**सह आपल्या सैन्याचा तळ **गंगा**तटाकीं पडला होता तिकडे गेला. या गोष्टींचेंच सविस्तर वर्णन **हर्षचरितां**त केलें आहे.

हर्षचरितांत कालनिर्णयाचा अभाव.

हर्षचरितावरून पाहतां **बाण**कवीचे आईबाप, त्याचे इतर वंशज, आप्तमित्र, राहण्याचें ठिकाण, स्वभाव, विद्या, आचारविचार इत्यादिकांचा आणि त्याचा आश्रयदाता **श्रीहर्ष** याचा व त्याचे घराण्यांतील इतर पुरुष यांचाहि बराच इतिहास सापडतो. **बाणा**चे ग्रंथांत जितकें ऐतिहासिक वृत्त सांपडतें, तितकें देखील (**राजतरंगणी**खेरीज) इतर संस्कृत कवींच्या ग्रंथांतून सापडत नाहीं. तेव्हां या संबंधानें **बाणा**ची योग्यता अधिक समजली पाहिजे. परंतु आपल्या याहि कवीच्या ग्रंथांत एक मोठी उणीव आहेच. ती कोणती ह्मणाल तर कालनिर्देशाची. **बाणा**च्या व **हर्षा**च्या जीवितकालाचा निर्णय त्याच्या कोणत्याच ग्रंथावरून करतां येत नाहीं. या गोष्टीच्या संबंधानें याच ठिकाणीं अशी अडचण आली आहे असें नाहीं; तर आपल्या सर्व ग्रंथांतून प्राय: अशीच शोचनीय स्थिति आढळते! यामुळें आपली जी हानि झाली आहे, ती कधींहि भरून यावयाची नाहीं! यावरून कालनिर्देशाचें महत्व पूर्वकालीं समजत नव्हते असें दिसतें. मग याचें कारण काय असेल याविषयीं कांहीं तर्क चालत नाहीं! **ज्योतिष** व **जैन**ग्रंथांतून मात्र बहुतकरून कालनिर्देश केलेला आढळतो. **हर्षा**चा कालनिर्णय **हुएनसँग**चें प्रवासवृत्त व इतर प्रमाणें यांवरून स्पष्ट करण्यांत आला आहे. तो पुढें समजून येईल.

हुएनसँग-वर्णित हर्षचरित.

कान्यकुब्ज (**कनोज**) हें शहर **गंगे**च्या पश्चिम तीरावर आहे. ह्या शहराची लांबी तीन मैल व रुंदी एक मैल आहे. ह्या प्रांतासहि हेंच नांव आहे. ह्याचा विस्तार ६७० मैल आहे. मुख्य शहराच्या सभोंवती तटबंदी असून खोल व रुंद खंदकहि आहे. शहरांत सुंदर मंदिरें असून आंत आणि बाहेर बागबगीचे व तलाव आहेत. त्यांचें पाणी स्वच्छ स्फटिकाप्रमाणें

आहे. देशांत फलपुष्पांची समृद्धि आहे. परदेशांतून आलेल्या मालांचे ढिगाशीं ढीग लागलेले असतात. प्रांतांतील लोक रेशमी कपडे वापरतात. ते विद्याव्यसनी व सचोटीनें वागणारे आहेत. यांपैकीं सुमारें निम्मे **बौद्ध**-धर्मी व निम्मे **पाखंडी** (इतर धर्मी) आहेत. ह्या ठिकाणीं पुष्कळ मठ आहेत. त्यांत दहा हजार **बौद्ध**भिक्षु असून त्यांचें **हीनयान** व **महायान** यांचें अध्ययन व अध्यापन चालू असतें. नास्तिक (इतर धर्मी) लोकांचीं दोनशें देवालयें आहेत.

पूर्वी या शहरास **कुसुमपुर** असें नांव होतें; व येथें **ब्रह्मदत्त**नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला सर्व राजे भीत असत. त्याला पुष्कळ पुत्र व सुंदर कन्या होत्या. या ठिकाणाजवळच **गंगा**तटाकीं एक ऋषि तप करीत होता व त्याच्या अंगाभोंवतीं (**वाल्मीकी**प्रमाणें) झाडेंझुडपेंहि उगवलेलीं होतीं. यामुळें यास **महावृक्षर्षि** ह्मणत ! याची बहुतकालची तपश्चर्या संपून समाधि उतरल्यावर तो **गंगा**स्नानास गेला असतां त्यास तेथें सुंदर राजकन्या दृष्टीस पडल्या. मग त्यानें त्यांच्या मागोमाग राजाकडे जाऊन विवाहार्थ मुलीची याचना केली. **'संमोहनमस्त्रमेव पुष्पेषोः।'** तरुण स्त्री हें मदनाचें मोहक अस्त्रच आहे असें **बाणानें** ह्मटलें आहे तें खोटें नाहीं! राजाला ऋषीची याचना अमान्य करवेना, परंतु त्याजबरोबर लग्न करण्यास राजकन्यांपैकीं कोणीहि तयार होईना. ठीकच आहे. **'कामिन्या रुचये हि नैव भवति प्रायो जरन्मानवः'** कामिनीस वृद्ध पति आवडत नाहीं हें कांहीं खोटें नाहीं ! तें पाहून राजा चिंताग्रस्त झाला. तेव्हां धाकट्या मुलीनें ' मी ऋषीबरोबर लग्न करण्यास तयार आहें, तुह्मी काळजी करूं नका, ' असें बापास सांगितलें. यामुळें राजास बरें वाटून तो त्या मुलीसह त्याजकडे गेला. परंतु ती मुलगी रूपानें साधारण असल्यामुळें त्याच्या मनांत आलें कीं, ही वाईट मुलगी राजानें बुध्याच मजकडे आणिली. मग तो रागानें ह्मणाला "राजा! असली मुलगी देऊन माझी समजूत करतोस काय ?" राजा नम्रतेनें ह्मणाला, "महाराज, एवढीच कन्या आपणास वरण्यास कबूल झाली म्हणून

तिला आपणाकडे आणिलें आहे." तेव्हां रागाच्या झपाट्यांत त्यानें "इतर कन्या कुब्जा होतील व त्यांस कोणी वरणार नाहीं" असा शाप दिला व त्याप्रमाणें गोष्ट घडली. ह्मणून त्या शहराचें **कान्यकुब्ज** असें नांव पडलें.यासारखी कथा **वाल्मीकिरामायण**[1] व **महाभारत** यांतहि आहे.

"**कान्यकुब्ज** (कनोज) येथें **प्रभाकरवर्धन** व त्याचे मुलगे–**राज्यवर्धन** व **हर्षवर्धन** ह्या तिघांनीं राज्य केलें. "[2] **प्रतापवर्धनाच्या** मागें त्याचा वडील मुलगा **राज्यवर्धन**[3] हा राजा असतां पूर्वेकडील

---

१ **कुशनाभ**राजास शंभर कन्या होत्या. त्या **गंगा**तीरीं बागेंत खेळत असतां **वायूचें** मन त्यांवर गेलें व त्यानें त्यांनां आपणास वरण्यास सांगितलें असतां त्यांनीं पित्याच्या संमतिशिवाय तसें करतां येत नाहीं असें सांगितलें। तेव्हां **वायूनें** त्यांस **वक्रांग** केलें. पुढें राजानें त्यांस **ब्रह्मदत्त**ऋषीस दिलें व त्याच्या स्पर्शानें त्या सरळ झाल्या. **वा. रा.** बालकांड सर्ग ३२,**महाभारत** वनपर्व अ. ८०.

२ **कान्यकुब्ज** येथें **प्रभाकरवर्धन**,**राज्यवर्धन** व **हर्षवर्धन** अशा तिघांनीं राज्य केलें, असें **हुएनसँग**च्या वर्णनांत आहे. परंतु ही चूक आहे. **प्रभाकरवर्धन** यानें **स्थानेश्वर** येथेंच राज्य केलें व तो तेथेंच वारला असें **हर्षचरितां**तील मजकुरावरून स्पष्ट होतें. **प्रभाकरवर्धनानें राज्यवर्धनास हूणां**वर पाठविलें होतें तो बाप वारल्यावर **स्थानेश्वर** येथें परत आला व बाप वारल्याचें ऐकून विरक्त होऊन तो सिंहासनावर बसला नाहीं. **राज्यश्री**चा पति **ग्रहवर्मा** यास **मालव**राजानें मारल्याचें ऐकून तो तसाच क्रोधानें शत्रूचें पारिपत्य करण्याकरितां गेला असतां तिकडे शत्रूनें त्याचा घात केला. तो राज्यसिंहासनावर मुदलींच बसला नाहीं असें **हर्षचरितावरून** स्पष्ट ध्यानांत येतें. असें असून '**कनोज** येथें तिघांनीं राज्य केलें' असें **हुएनसँगनें** ह्मटलें आहे तें बरोबर नाहीं. **हर्षानें मालव** व **गौड** यांचा पराजय केल्यावर पुढें **कान्यकुब्ज** घेतलें व तेथें राजधानीचें ठिकाण केलें, असें **हर्षचरितां**तील संदर्भावरून लक्षांत येतें. अशीं **हुएनसँग**चीं कांहीं वर्णनें **बाणा**च्या वर्णनाशीं जमत नाहींत.

३ **हुएनसँग**च्या लेखांत याबद्दल उल्लेख आहे तो असाः–"Râjavardhan came to the throne as the elder brother, and ruled with virtue. At this time the king of Karṇasuvarṇa–a kingdom of Eastern India–whose name was Sâsânka frequently addressed his ministers in these words 'If a frontier

कर्णसुवर्णपुरचा राजा **शशांक** हा आपल्या प्रधानादिकांस ह्मणत असे कीं, " जवळचा राजा गुणवान् असणें, हें कांहीं ठीक नाहीं." नंतर त्यानें कपटानें **राज्यवर्धनास** अगत्यानें आपले घरीं बोलावून विश्वासघातानें त्याचा वध केला. त्यामुळें देशांत अंदाधुंदी माजली. तेव्हां **भानी** नांवाचा मुख्य प्रधान होता तो इतर अधिकाऱ्यांस ह्मणाला, " ही मोठी आणीबाणीची वेळ आहे, वडील राजपुत्राचा घात झाला; धाकटा **हर्षवर्धन** हा परोपकारी, दयाळु व प्रजापालन करण्यास समर्थ आहे. याकरितां त्यास गादीवर बसण्यास विनंति करावी, असें मला वाटतें. तरी तुमचा विचार कसा काय आहे तो सांगावा. " तेव्हां सर्वांनीं **हर्षाची** प्रशंसा केली. मग ते त्यास म्हणाले, " थोरल्या महाराजांनीं पराक्रमानें राज्य करून पुण्य व कीर्ति संपादिली. पुढें त्यांचे वडील चिरंजीव आपल्या पित्याप्रमाणेंच फार दिवस राज्य करतील अशी सर्वांस आशा होती. परंतु आमच्या चुकीमुळें ते शत्रूंच्या तावडींत सापडून त्यांचा घात झाला, यामुळें सर्वांस कलंक लागला आहे. तरी आपण राज्यसूत्रें हातीं घेऊन शत्रूंचा सूड उगवून राज्यकारभार चालवावा, अशी आमची विनंति आहे. " " तेव्हां राज्य चालविणें कठिण आहे, तथापि तुमचा सर्वांचा आग्रह आहे, त्याअर्थीं मला तुमचें ह्मणणें मान्य करणें भाग आहे. परंतु त्यापूर्वीं **गंगेच्या**

---

country has a virtuous ruler, this is the unhappiness of the (mother) kingdom.' On this they asked the king to a conference and murdered him. "

Huen Thsang Vol. I. P. 210.

This was Sásânka-Narendragupta-king of Gauda or Bengal.

बंगाल्यांत ओरिसा(उडिया) जवळ **गंजाम**प्रांतांत सांपडलेल्या **ताम्रपत्रांत 'महाराजाधिराज शशांक'** याचा मांडलिक **महासामन्त** (सावत) यानें ब्राह्मणास गौताब्द ३०० (इ. स. ६१९) यावर्षीं अग्रहार दिल्याबद्दल सापडलेल्या **ताम्रपत्रांत 'शशांक'**राजाचा उल्लेख आहे. त्याच शतकांतील व त्याच देशांतील हा लेख असल्यामुळें हाच तो **शशांक** असावा.

काठीं **अवलोकितेश्वर** बोधिसत्वाचें स्थान आहे, तेथें जाऊन मी त्याचा दृष्टांत पहातों." मग तो उपोषण करून तेथें गेला व त्याची प्रार्थना करीत बसला. हर्षाची खरी निष्ठा पाहून तो प्रसन्न झाला. तेव्हां **हर्ष** ह्मणाला, " माझा पिता व बंधु वारल्यामुळें राज्यकारभार चालविण्याचा भार मजवर पडला आहे. मी राज्य चालवावें असा सर्वांचा आग्रह आहे. तेव्हां आपली संमति असेल तर मी या भानगडींत पडतों." **बोधिसत्व** ह्मणाला, " पूर्वजन्मीं तूं **बौद्धभिक्षु** होतास व पुष्कळ तपश्चर्या केली आहेस, त्या योगानें तूं राजा झाला आहेस. **शशांकराजानें** बौद्धधर्माचा उच्छेद मांडला आहे, याकरितां त्याचा प्रतीकार करणें तुझें कर्तव्य आहे. तूं माझ्या आज्ञेप्रमाणें वागलास तर तुझें वैभव वाढत जाईल. तूं सिंहासनावर बसूं नकोस व आपणास महाराज म्हणवून घेऊं नकोस." त्याप्रमाणें पुढें **हर्ष** आपणास **कुमारराज**[२] ह्मणवूं लागला, व त्यानें आपणास **शिलादित्य**[२] असें नांव धारण केलें. पुढें तो आपल्या सरदारांस ह्मणाला " भावाचा घात करणाऱ्या वैऱ्याचा सूड उगविल्याखेरीज अन्न ग्रहण करणें मला बरें वाटत नाहीं. याकरितां तुह्मीं सर्वांनीं मला मदत करावी."

मग पांच हजार हत्ती, वीस हजार स्वार व पन्नास हजार पायदळ इतकें सैन्य सज्ज करून तो शत्रूवर चाल करून गेला. लढाईत रथ उपयोगी नाहींत, असें त्याचें मत होतें. सुमारें सहा वर्षेपर्यंत स्वाऱ्या करून त्यानें **पंचनंदावर** (पंजाब ?) आपला अम्मल बसविला. पुढें त्यानें ६०००० हत्ती व १००००० घोडेस्वार इतकें सैन्य वाढवून शत्रूवर जय मिळविले. याप्रमाणें त्यानें तीस बत्तीस वर्षें लढाया केल्या व पूर्वेपासून[३] पश्चिमेपर्यंत

---

१ 'परमसौगतमप्यवलोकितेश्वरम्' असा **हर्षचरितांत अवलोकितेश्वराचा** उल्लेख आहे.

२ ' He called himself the king's son (Kumârarâja) his title was S'ilâditya.' H. Tsiang p. 213.

३ " He went from east to west subduing all who were not obedient, the elephants were not unharnessed nor the soldiers unhelmeted," H. Tsiang.

देश काबीज केले. तोंपर्यंत त्यानें हत्तीवरच्या झुली व घोड्यावरचीं खोगिरें काढिलीं नाहींत. त्यानें बहुतेक देश जिंकले. त्यानें इ. स ६४३ त **गंजाम**-प्रांतावर शेवटची स्वारी केली. सर्व **हिंदुस्थान** एका छत्राखालीं आण-ण्याचा त्याचा विचार होता. **कामरूप(आसाम)**चा राजा **भास्करवर्मा** व अगदीं पश्चिमेकडील **वलभी**चा राजा **ध्रुवसेन** हे व दुसरे कांहीं राजे लढाईत त्याजबरोबर जिवास जीव देणारे असून त्याच्या मर्जीतले होते. याप्रमाणें शत्रु जिंकण्याचें काम आटोपल्यावर त्यानें आपल्या राज्यांत चांगली व्यवस्था केली. आपली प्रजा सुखी रहावी म्हणून तो फार झटत असे. तो षष्ठांश कर घेत असे. त्यानें आपल्या राज्यांत अन्नसत्रें, धर्मशाळा व दवाखाने स्थापिले होते. तो दर पांच वर्षांनीं मोठी **धर्मपरिषद** भरवून आपल्या सर्व संपत्तीचा धर्म करी. परंतु तो आपलीं शस्त्रें मात्र कोणास देत नसे !

तो भूमिदानें करीत असे, आणि विद्वान् व गुणवान् लोकांनां चांगलीं बक्षिसें देई. तो बहुतेक संपत्तीचा विनियोग दानधर्माकडे करी. त्याच्या राज्यांत कर बेताचे होते व मजुरी देऊन सार्वजनिक कामें करण्याची चाल होती. विद्येविषयीं त्यास फार अभिरुचि असे. तो बौद्धांचे व ब्राह्मणांचे वादविवाद ऐकत असे, व त्यांचा चांगला परामर्शहि घेत असे. तो स्वतः सर्व राज्यांत फिरून प्रजेची स्थिति पहात असे व अपराध्यांस अपराधा-नुरूप शिक्षा देत असे. त्याचें दरबारीं लहान गुन्ह्यांबद्दल बेताचे दंडहि असत. उदक, अग्नि आणि विष यांच्या योगानें सत्य ठरविण्याची चाल असे. तो आठ महिने फिरतीवरच राही. पावसाळ्यांत मात्र त्याचें ठाणें एकाच ठिकाणीं असे. प्रवासांत गवती[२] किंवा झाडपाल्यांचीं राजमंदिरें तयार करवून त्यांत तो रहात असे. त्यानें आपल्या राज्यांत मांसाहारा-करितां प्राणिवधाची मनाई केली होती व बौद्धधर्मास अनुसरून **गंगा**तीरीं

१ 'Bringing all India under one umbrella.'

२ " तृणमयप्राकारमंदिरसंबाधामावासभूमिमवापनरपतिः । " असें **बाणाच्या** वर्णनांतहि आहे.

मठ व स्तूप बांधिले होत व तेथें बौद्धधर्मी जती ठेवले होते. शेवटीं त्याचा बौद्धधर्माकडेच कल झाल्याबद्दल त्यानें वर्णिलें आहे.

इ. स. ६२९ त **हुएनसँग हिंदुस्थानां**त आला. तो इ. स. ६३३–३४ त **नांलंद** येथें आल्यावर तेथें राहिला. **हर्षानें** शीलभद्रराजास **नालंद**-मठांतील बौद्ध प्रवासी **हुएनसँग** यास भेटीस घेऊन येण्यासाठीं हुकूम केला. **हर्षानें** त्याला आपल्या बरोबर इ. स. ६४३–४४ त **कनोज** व **प्रयाग** येथें **मोक्षपरिषदेस** नेलें होतें. **हर्षानें** तीन महिने **गंगा**तीरीं **बुद्धा**चा महोत्सव केला. त्यांत तो **इंद्रा**चा पोषाक करून छत्र धरीत असे. या उत्सवांत राजे, सरदार, भिक्षु, ब्राह्मण वगैरे अनेक लोक आले होते. हा मोठा थाटाचा उत्सव झाला. यांत सतत अन्नसंतर्पण चालू असे. उत्सवमूर्ति सोन्याची होती. शेवटीं मिरवणूक निघाली, तेव्हां तींत दोनहजार शृंगारलेले हत्ती चालविले होते. मूर्तीपुढें सुवर्णाचीं फुलें व मोत्यें यांचा वर्षाव होत असे. ह्या उत्सवांत विद्वानांस व गोरगरिबांस द्रव्य, पोषाक व अलंकार यांच्या देणग्या चालू होत्या. याप्रमाणें हा उत्सव सुमारें तीन महिने चालू होता. शेवटच्या दिवशीं आग लागून देऊळ जळूं लागलें. तेव्हां 'माझ्या पुण्यानें अग्नि शांत होवो' असें **हर्षानें** ह्मणतांच अग्नि विझाला; असें त्याच्या पुस्तकांत आहे. अशा अमूल्य इमारतीचा थोड्या वेळांत बराच नाश झाला, यामुळें ह्या लोकचें ऐश्वर्य किती क्षणभंगुर आहे! असें **हर्षास** वाटून त्याची द्रव्यादिकांविषयीं आसक्ति राहिली नाहीं. तो दर पांच वर्षांनीं आपल्या खजिन्यांतील सर्वस्व दान करीत असे. त्यांनें आपल्या अंगावरचे वस्त्रालंकार देखील दिले, व आपली बहीण **राज्यश्री** इजपासून जुना पोशाक मागून घेऊन धारण केला.

---

१ हें बौद्धधर्मी लोकांचें स्थान **गयेजवळ बुद्धगये**पासून ५० मैल आहे.

२ "All being given away, he begged from his sister (Râjasri) an ordinary second-hand garment and having put it on he paid worship to the 'Budhas of the ten regions' and regoiced that his treasure had been bestowed in the field of religious merit." p. 296-7.

ह्या उत्सवांत एक मनुष्य कट्यार उपसून हर्षाच्या अंगावर धावून गेला असतां हर्ष मागें सरला. पुढें त्या मनुष्यास तेव्हांच पकडलें; इतर राजे व सरदार त्याचा प्राणच घेणार होते, परंतु हर्षानें त्यांचें निवारण केलें. त्यामुळें 'ज्ञानमगर्वं क्षमान्वितं शौर्यम्' हीं थोरांचीं लक्षणें हर्षाचे ठायीं दिसून आलीं!

पुढें बौद्धधर्माप्रमाणें जागजागीं स्तूप (खांब), मठ व सर्वत्र हजारों **बौद्ध** जती असल्याबद्दल त्यानें वर्णन केलें आहे. एकंदरींत **बौद्ध**धर्माची महती त्यानें अतिशयोक्तीनें वर्णिली आहे.

हर्षाची बहीण **राज्यश्री** ही त्याच्याजवळ वसत असे विद्वज्जनांचें संभाषण ऐकून तिला करमणूक होत असे, असेंहि वर्णन केलेलें आहे.

बाणाच्या वर्णनाशीं हुएनसँगवर्णित बऱ्याच गोष्टींचा मेळ आणि हर्ष व बाण यांचा कालनिर्णय.

हुएनसँगनें दिलेलीं नांवें, ह्मणजे उत्तरहिंदुस्थानचा राजा **हर्षवर्धन,** त्याचा बाप **प्रभाकरवर्धन,** भाऊ **राज्यवर्धन**, बहीण **राज्यश्री,** प्रधान **भानी,** (यास **हर्षचरितांत भंडी** असें ह्मटलें आहे) तो युद्धांत हस्ति-

१ Hiuen Tsiang. Vol. I. p. 209—13.
(Translated by S. Beal.)

२ हस्तिसैन्य बरोबर घेऊन हर्ष युद्धास जात असे, असें **हर्षचरितां**तील निरनिराळ्या ठिकाणच्या वर्णनावरून व **शिलालेखां**वरून लक्षांत येतें:—

'असावकथयत् एष खलु देवस्यौपवाह्यो बाह्यं हृदयं, जात्यंतरित आत्मा, बहिश्वराः प्राणाः, विक्रमक्रीडासुहृद्दर्पशात इति यथार्थनामा वारणपतिः'।

'प्रभातायां च शर्वर्यां प्रातरेव प्रतीहारमादिदेश । अशेषगजसाधनाधिकृतं स्कंदगुप्तं द्रष्टुमिच्छामीति'।

'अतः शीघ्रं प्रवेश्यंतां प्रचारनिर्गतानि गजसाधनानि नक्षाम्यत्यतिस्वल्पमप्यार्यपरिभवपीडापावकः प्रयाणविलंबम्'।

'करेणुकयोह्यमानो दिग्विजयाय निर्जगाम महीपतिः'।

सैन्याचा उपयोग करीत असे;त्याचा भाऊ **राज्यवर्धन** यास शत्रूनें विश्वास-घातानें मारिलें, म्हणून तो शत्रूचा सूड उगविण्याकरितां व दिग्विजय करण्याकरितां निघाला. **हर्ष** व **कुमार भास्करवर्मा** (**आसाम**चा राजा) यांची मैत्री होती. **सत्याश्रयपुलकेशी**बरोबर **हर्षा**चा संग्राम झाला. इत्यादि प्रकारचीं नांवें व गोष्टी **हर्षचरितां**तील नांवाशीं व गोष्टींशीं जमतात. यांवरून **बाण**कवीनें वर्णन केलेला **हर्ष** व **हुएनसँग**नें वर्णन केलेला **हर्षवर्धन** हा एकच असें सिद्ध होतें, व सातव्या शतकांत **हर्षराजा** असल्याबद्दल खात्री होते; यावरून **हर्षा**च्या पदरीं असलेल्या **बाण** व **मयूर** इत्यादिकांचाहि हाच जीवनकाल ठरतो.

कालनिर्णयास आणखी ताम्रपट व शिलालेख यांचीं प्रमाणें.

हर्ष आणि पुलकेशी यांजमधील युद्धाचा उल्लेख.

या गोष्टीच्या (कालनिर्णयाच्या) पुष्टिकरणार्थ आणखीहि प्रमाणें सांपडलीं आहेत. **हर्ष** हा पराक्रमी राजा होता व त्यानें पुष्कळ राजे पादाक्रांत केले होते. तथापि **नर्मदे**च्या दक्षिणेस राज्य वाढविण्याचा जेव्हां त्यानें प्रयत्न केला, तेव्हां **वातापी** उर्फ **बदामीपुरी**चा **चालुक्य**वंशांतला राजा दुसरा **सत्याश्रयपुलकेशी** यानें **हर्षा**स **नर्मदे**च्या आलीकडे येऊं दिलें नाहीं, अशाविषयीं व त्यांच्यामध्यें युद्ध झाल्याविषयीं **शिलालेखां**तील प्रमाणें खालीं दिलीं आहेत:—

"समरसंसक्तसकलोत्तरापथेश्वरश्रीहर्षवर्धनपराजयोपलब्धपरमेश्वरापरनामधेयः सत्याश्रयः श्रीपृथ्वीवल्लभमहाराजाधिराजः" इ०.

"शूरे विदुषि च विभजन्दानं मानं च युगपदेकत्र ।
अविहितयाथासंख्यः स जयति सत्याश्रयः सुचिरम् ॥
अपरिमितविभूतिस्फीतसामन्तसेना-
मुकुटमणिमयूखाक्रान्तपादारविंदः ।

---

१ Indian Antiquary Vol. VI and VII 1878.

युधि पतितगजेंद्रानीकबीभत्सभूतो
भयविगलितहर्षो येन चाकारि हर्षः ॥
यस्यांबुधित्रयनिवारितशासनस्य
सत्याश्रयस्य परमाप्तवता प्रसादम् ।
शैलं जिनेंद्रभवनं भवनं महिम्नाम्
निर्मापितं मतिमता रविकीर्तिनेदम् ॥
येनायोजि न वेश्म स्थिरमर्थविधौ विवेकिनाजिनवेश्म ।
स विजयतां रविकीर्तिः कविताश्रितकालिदासभारविकीर्तिः॥
पंचाशत्सु कलौ काले षट्सु पंचाशतेषु च ।
समासु समतीतासु शकानामपि भूभुजाम् ॥"

शके ५५६ ह्मणजे इ. स. ६३४–३५ ह्या वर्षी **रविकीर्तीनें** बांधलेल्या देवालयावरील लेखांत[१] **सत्याश्रयपुलकेशीनें** हर्षराजाचा पराभव केल्याबद्दल, धर्मादि पुरुषार्थ साधण्याकरितां देवालय बांधल्याबद्दल आणि **कालिदास**[२] व **भारवि** यांच्या समान आपण असल्याबद्दलहि त्यांत उल्लेख केला आहे. **रविकीर्ति** हा **जैन**धर्मी कवि होता; व **सत्याश्रयपुलकेशी** हा वैदिकधर्मानुसारी क्षात्रिय होता तथापि तो इतर धर्मानुयायी गुणिजनांसहि आश्रय देणारा होता; असें यावरून स्पष्ट होतें.

हुएनसँगच्या लेखांतहि[३]–**हर्षा**नें आपल्या सैन्याची कडेकोट तयारी

---

१ हा **शिलालेख** समग्र पाहणें असल्यास प्राचीनलेखमाला भाग १ किंवा पुढील पुस्तकांत पहावा. Indian Antiquary, Vol. VIII 1879; S'aka 556. (A. D. 634–35.)

२ यावरून '**कालिदास**' व '**भारवि**' हे ह्या कालाच्या पूर्वी होऊन **गेले** हेंहि सिद्ध झालें. **कालिदासा**ची प्रशंसा पुष्कळांनीं केलीच आहे, व **बाणभट्टा**नेंहि पुढें दिलेल्या कविप्रशंसेंत ती फारच चांगल्या रीतीनें केली आहे. **त्रिविक्रमभट्ट** यानें '**भारवि**' व '**माघ**' यांची प्रशंसा एका पद्यांत केली आहे. तें पद्य सरस वाटल्यावरून येथें दिलें आहे.

"कृत्स्नप्रबोधकृद्वाणी भा रवेरिव भारवेः ।
माघेनेवच माघेन कम्पः कस्य न जायते ! " ॥

३ " At present the great king S'iláditya (Harshavardhana) carries his victorious arms from the east to the west; he subdues

करून सत्याश्रयपुलकेशीवर स्वारी केली असतां त्याच्या शूर लोकांपुढें याचें कांहीं चाललें नाहीं असा मजकूर आहेच.

यावरून सुमारें इ. स. ६२० त हर्ष व सत्याश्रयपुलकेशी यांच्यांत युद्धप्रसंग घडून आला असावा असें ठरविण्यांत आलें आहे. तसेंच उत्तरापथेश्वर, हर्षवर्धन, हर्ष इत्यादि नामनिर्देश आणि हुएनसँग याचा प्रवासकाल व त्यानें केलेले नामनिर्देश हीं सर्व जमतात. यावरून हर्षराजा हा सातव्या शतकांत होता हें सिद्ध झालें.

हर्षाचा प्रतिस्पर्धी दुसरा सत्याश्रयपुलकेशी याचें संक्षिप्त चरित्र.

हा दुसरा सत्याश्रयपुलकेशी शके ५३३ म्हणजे इ. स. ६१०–११ त गादीवर बसला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. पुलकेशीनें उत्तरहिंदुस्थानचा पराक्रमी राजा हर्षवर्धन हा नर्मदेच्या दक्षिणेकडे आपलें राज्य वाढविण्याकरितां मोठें हस्तिसैन्य बरोबर घेऊन अनेक देश काबीज करीत आला असतां त्याच्या हस्तिसैन्याचा बराच नाश करून त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. "शौर्यशुल्कः सुलभो दक्षिणापथः।" इतर प्रांताप्रमाणें शौर्यानें दक्षिणप्रांत सुलभ आहे! अशी हर्षाच्या वीरांनीं जयघोषांत बढाई मारल्याचें बाणाचे वर्णनांत आहे. परंतु तो तसा सुलभ झाला नाहीं! ह्या महत्कृत्यामुळें (हर्षाप्रमाणें) पुलकेशीसहि लोक परमेश्वर म्हणूं लागले. महापराक्रमी हर्षराजास अटकाव करण्याकरितां पुलकेशीनें आपलें पुष्कळ शूर सैन्य नर्मदेच्या कांठीं नेहमीं सज्ज ठेवलें होतें.

---

distant peoples and makes the neighbouring nations fear him; but the people of this kingdom alone have not submitted Although he be often at the head of all the troops of the five Indies, though he has summoned the bravest generals of all the kingdoms and though he has marched himself to punish them, he has not yet been able to vanquish their opposition. From this we may judge of their warlike habits and manners." II. Ind. Ant.; Vol. VII., P. 291.

पश्चिमेकडील **वलभीचा** राजा दुसरा **ध्रुवसेन** यानें **हर्षा**पासून आपला बचाव करण्याकरितां **भडोच**च्या राजाचा आश्रय केला व **भडोच**च्या राजानें **महाराष्ट्रां**तील पराक्रमी राजा दुसरा **पुलकेशी** याजपासून स्वसंरक्षणास मदत मागितली व ती त्यानें त्यास दिली. हेंहि एक कारण **हर्ष**राजास **पुलकेशी**वर चालून जाण्यास झालें. **बाण** व **हुएनसँग** यांपैकीं कोणी कोठें याबद्दल कांहीं लिहिलें नाहीं; तथापि **गुजराथें**तील **भडोच**पैकीं **नवसरीच्या शिलालेखांत** याबद्दल उल्लेख आहे. तो असा :—

" **परमेश्वर–श्रीहर्षाभिभूत–वलभीपतिपरित्राणोपजातभ्रमदभ्र-शुभ्रविभ्रमयशोवितानः श्रीदद्दाः** " इत्यादि.

या **शिलालेखांत हर्षानें वलभीच्या** राजाचा पराभव केला असतां **भडोच**चा राजा दद्द (?) यानें त्याचें रक्षण केलें. त्यामुळें त्याची कीर्ति झाली. इत्यादि वर्णन आहे.

हुएनसँग याच्या वर्णनांत **हर्षानें वलभीचा** राजा **ध्रुवसेन** यास आपल्या ताब्यांत आणिलें आणि त्यास पुनः राज्यावर बसवून त्यास आपली नात दिली असें मात्र आहे.

पुलकेशीनें लाट, मालव, गुर्जर हे राजे, व **कोसल, कालिंग** आाणि **कांची** येथील राजे जिंकले. तसेंच **चोल, पांड्य, केरल** या राजांनां आपल्या अंकित केलें. याप्रमाणें श. ५५६ ह्मणजे इ. स. ६३४ पर्यंत तो पराक्रमाचीं कृत्यें करीत होता, इत्यादि गोष्टी **पुलकेशीच्या** संबंधानें **ताम्रपत्रांत** आहेत.

हुएनसँग[२]च्या पुस्तकांत असाहि मजकूर आहे कीं, **पुलकेशीच्या** सरदा-

1 Ind. Anti. Vol. XIII P. 70 The Navasari Inscri.

2 "The inhabitants set a high price on honour and duty and despise death. The king belongs to the warrior (Ksatriya) caste; his tastes are those of a soldier and he places the glory of arms above every other fame. As a consequence his soldiers, both horse and foot, are equipped with the greatest care and throughout his realm military laws and ordinances are known to all and vividly observed.

रांचा युद्धांत पराजय झाला असतां तो त्यांनां स्त्रियांचा पोशाक नेसावयास देत असे. यामुळें त्या सरदारांस यापेक्षां मरण बरें, असें वाटून युद्धांत पराजय झाला असतां ते आत्मघात करून घेत असत. **पुलकेशी**हि हजारों शूर योद्धे व मदोन्मत्त हस्ती बरोबर घेऊन लढाईस जात असे.तो त्यांनां दारू पाजीत असे. त्यामुळें ते लढाईंत नेल्यावर शत्रुसैन्यांत घुसून त्यांचीं दाणादाण करीत असत. अशा प्रकारें युद्धांत नेलेले हत्ती अनावर होऊन कधीं कधीं ते त्याच्या ताब्यांत रहात नसत.

चिनी प्रवासी **हुएनसँग** यानें **सत्याश्रयपुलकेशी**ची गांठ घेतली होती. त्यानें तो राजा महापराक्रमी व परोपकारी असल्याबद्दल, त्याचे लोकहि मोठे कडवे व स्वराजनिष्ठ असल्याबद्दल, व महापराक्रमी हर्ष-राजाचें त्यानें **नर्मदे**च्या अलीकडे कांहीं एक चालूं न दिल्याबद्दल वर्णन केलें आहे.

हर्षाचें दानशूरत्व.

हर्ष हा मोठा धर्मशील राजा होता. हें **बाणा**च्या व **हुएनसँग**च्याहि वर्णनांत आहेच. **बाण**कवीचें वर्णन प्रायः श्लेषादि अलंकारांत असतें. 'हारमौक्तिकांची प्रभा **हर्षाच्या** अंगावर पडल्यामुळें यावज्जीव सर्वस्व दान करण्याचें त्यानें हें दीक्षावल्कलच धारण केलें आहे काय ?' " **जीवि-**

Should the king have sent a general to deliver battle who is beaten and loses his army he does not make him suffer in body but he gives him the garments of a woman to fill his heart with shame. It often happens that his commanders kill themselves to escape this dishonour. The king constantly keeps up a force of several thousands of brave warriors with many hundred savage-elephants. Shortly before going to battle they are filled with wine till drunkenness renders them mad: then the singnal is given and they are launched against foes who need must disband and fly. Proud of those auxiliaries he shows the greatest contempt for neighbouring peoples with whom he is at war. King Kiaija (S'ilâditya) boasts himself of his skill in war and of the valour and renown of his general. He takes the field himself at the head of his army. But these troops he can neither subdue nor hold in check."—vie et, Voyages de Hiouen Thasang P. 203

तावधिगृहीतसर्वस्वमहादानदीक्षाचीरेणेव हारमुक्ताफलानां किरणनिकरेण प्रावृत्तवक्षःस्थलम् ।" अशी बाणानें उत्प्रेक्षा केली आहे. यावरून पृथ्वी जिंकल्यावर त्यानें सर्वस्वदानयज्ञ केले असें दिसतें.

या एका विशेषणावरून देखील प्राचीन कालीं या देशाचें वैभव कसें होतें हें लक्षांत येण्यासारखें आहे ! बाणानें हर्षराजाच्या वर्णनांत"**नास्य धनदस्येव निष्फलाः सन्निधिलाभाः** " हर्षराजाचे निधि (द्रव्यसंचय) कुबेराच्या (नऊ) निधीसारखे निष्फल नाहींत, असें ह्मटलें आहे. ते सफल केव्हां होतात ? हें हर्षानेंच स्वतः शिलालेखांत सांगितलें आहे. तें असें:"**लक्ष्म्यास्तडित्सलिलबुद्बुदचंचलाया दानं फलं परयशःपरिपालनंच**"विद्युल्लता व जलबुद्बुद याप्रमाणें चंचल अशा लक्ष्मीचें दानधर्म करणें व यश संपादणें हेंच फल होय. असें त्यानें स्वतः ह्मटल्याप्रमाणें आपल्या द्रव्याचा दानधर्माकडे व यश संपादण्याकडेच व्यय करून '**वित्तस्य पात्रे व्ययः**' या वचनाप्रमाणें आपल्या राज्यसंपत्तीचें साफल्य केलें, ही खरोखरीच मोठी प्रशंसनीय गोष्ट आहे.

हुएनसँगनेंहि हर्ष हा दर पांच वर्षांनीं आपल्या खजिन्यांत जमलेल्या द्रव्याचा दानधर्म करीत असे, असें ह्मटलें आहे.

१ S'ilâditya's charity–"S'ilâditya held a solemn distribution of his royal treasures every five years. The Chinese pilgrim Hiuen Tsiang describes how, on the plain where the Ganges and the Jumna unite their waters, near Allahabad, all the kings of the empire, and a multitude of people, feasted for seventy-five days. S'ilâditya brought forth the stores of his palace, and gave them always to Brahmans and Buddihsts, monks and heretics without distinction. At the end of the festival he stripped off his jewels and royal raiment, handed them to the by-standers, and like Buddha of old, put on rags of a beggar. By this ceremony the king commemorated the Great Renunciation of Buddha and also practised the highest duty

सकलभुवनकोशश्चाग्रजन्मनां विभक्तः। ' त्याचा सर्व खजिना ब्राह्मण व श्रमण इत्यादिकांस देण्यांतच जात असे, असें हर्षाच्या वर्णनांतहि **बाणानें** म्हटलें आहे. हें त्याचें दातृत्व पाहून " **आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव** " (सज्जनांचा द्रव्यसंग्रह मेघांच्या जलसंचयासारखा परोपकाराकरितांच आहे) ह्या **कविकुलगुरूच्या** उक्तीचें स्मरण होतें. इ० स० ६४४ त त्यानें **गंगायमुनेच्या** संगमाजवळ प्रसिद्ध पुण्यक्षेत्र **प्रयाग** येथें सुमारें तीन महिनेपर्यंत सर्व धर्मांच्या जमलेल्या हजारों लोकांनां अन्नसंतर्पण केलें. अन्नदानाच्या शेवटीं त्यानें " **समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्** " ह्या **भगवद्गीतेंतील** वचनाप्रमाणें मनांत भेद न आणतां ब्राह्मण, बौद्धभिक्षु बैरागी वगैरे जमलेल्या सर्व लोकांस आपल्या खजिन्यांतील सर्व द्रव्य व मौल्यवान् वस्तु, तशींच स्वतःचीं उंचीउंचीं वस्त्रें दान केलीं व बुद्धाप्रमाणेंच आपण निष्कांचन होऊन त्यानें स्वतः अगदीं दीनजनासारखा पोशाक धारण केला ! हर्षाचें हें औदार्य व निष्कांचनत्व पाहून ' **नास्त्यदेयं महात्मनाम्** ' ह्या वचनाचें स्मरण होतें ! आणखी ' **विश्वजित्** ' यज्ञामध्यें अर्थिजनाला सर्वस्व दान करून शरीरमात्रानें अवशिष्ट राहिलेल्या व **कविकुलगुरूनें** त्या वेळच्या स्थितींत वर्णन केलेल्या—"**शरीरमात्रेण नरेन्द्र तिष्ठन्नाभासि तीर्थप्रतिपादितर्द्धिः। अरण्यकोपात्तफलप्रसूतिः स्तम्बेन नीवार इवावशिष्टः॥**" (हे राजा! सत्पात्रीं सर्व संपत्तीचा विनियोग करून शरीरानें मात्र अवशिष्ट राहिला आहेस) अशा—**रघुराजाप्रमाणें** तो दिसला असावा! '**तनिम्ना शोभन्ते गलितविभवाश्चार्थिषु नराः**। ' उदार पुरुष हे याचकांनां सर्वस्व देण्यानें गतवैभव झाले तरी शोभतात ! हें **भर्तृहरीचें** वचन अगदीं यथार्थ आहे. यावरून **हर्षराजा** हा **कर्णासारखा** केवळ रणशूरच होता

---

laid down by the Brahmans, namely, almsgiving."
(A Brief History of the Indian Peoples by W. W Hunter P. 81)

इतकेंच नाहीं, तर तो त्याच्या सारखा दानशूरहि होता, असें लक्षांत येतें![1] हर्षानें शिव व सूर्य यांच्या देवालयाप्रमाणें **बुद्धाचें**हि देवालय बांधलें. असें **हुएनसँग**च्या वर्णनांत आहे.

हर्षाचें सप्रमाण ग्रन्थकर्तृत्व, डॉ. हॉल यांच्या मताचें निराकरण व त्याचा बौद्धधर्माकडे कल.

'**रत्नावली**' या नाटिकेचा कर्ता **श्रीहर्ष** आहे, तथापि त्याचा कर्ता **बाणकवि**च असावा, असें कित्येकांचें मत आहे. **बाण**कवीच्या **हर्षचरितां**तील एका कवितेशीं **रत्नावलीं**तील कविता जमते; तेव्हां **बाणानें**च '**रत्नावली**' रचून **श्रीहर्षास** दिली असावी असें ह्मणून—

"**द्वीपादन्यस्मादपि मध्यादपि जलनिधेर्दिशोप्यन्तात्-**
आनीय झटिति घटयति विधिरभिमतमभिमुखीभूतः ॥"

ही[2] **रत्नावलीं**तील पहिल्या अंकांत असलेली कविता **हर्षचरितां**तील पांचव्या उच्छ्वासांत असलेल्या कवितेशीं अगदीं शब्दशः (word for word) जमते, असें डॉ. हॉलसाहेबांनीं **वासवदत्ते**च्या प्रस्तावनेंत ह्मटलें आहे. परंतु **हर्षचरितां**तील पांचव्या उच्छ्वासांत ह्या कवितेशीं शब्दशः जमणारी कविता मुदलींच नाहीं. त्याच्या पुढच्या ह्मणजे सहाव्या उच्छ्वासांत मात्र पुढें लिहिल्याप्रमाणें एक कविता आहे. ती अशीः—

"**द्वीपोपगीतगुणमपि समुपार्जितरत्नराशिसारमपि।**
पोतं पवन इव विधिः पुरुषमकाण्डे निपातयति ॥"

ही कविता मागें दिलेल्या **रत्नावलीं**तील कवितेशीं शब्दशः जमणारी

---

१ श्रीहर्षानें दानशूरत्वाची कृति **नागानंदां**त जीमूतवाहनपात्राचे आचरणांत चांगली दाखविली आहे.

२ That Bâna was not content with two productions may some day be settled conclusively. But there is already a colour of reason to allot another to him; even so notable a performance as the Ratnàvali, drama. I find, in this play, a stanza quoted, I may mention, as from it,

मुदलींच नाहीं! हींत कायतो 'विधि' शब्द मात्र जमला आहे व 'द्वीप' शब्द तर समासांत अडकलेला आहे. हींत उपमालंकार अधिकच आहे. एकींत अनुकूल दैवचरित आहे तर दुसरींत प्रतिकूल दैवचरित आहे. परंतु यास कोणी 'शब्दशः जमणें' ह्मणणार नाहीं! आर्याछंद मात्र सारखाच आहे. यामुळेंच साहेबांस सारखेपणाचा भास झाला असेल तर कोण जाणे! परंतु एवढ्यावरूनच एककर्तृकत्व सिद्ध होत असेल तर अशीं दोहींत एक दोन किंवा अधिक सारखे शब्द आंत असलेलीं पद्यें (एकाच छन्दांत देखील) व गद्यें पुष्कळांच्या वर्णनांत जमून आलीं आहेत, व याचमुळें एकानें दुसऱ्यास काव्य करून दिलें, असें ह्मणणें, समंजसपणाचें आहे, असें मलातरी वाटत नाही! अगदीं एकच कल्पना देखील भिन्न भिन्न कवींच्या काव्यांतून आढळते, जसें:-

रघुवंशांतः—

त्यजत मानमलं बत विग्रहैर्न पुनरेति गतं चतुरं वयः।
परभृताभिरितीव निवेदिते स्मरमते रमते स्म वधूजनः॥

माघांतः—

प्रियसखीसदृशं प्रतिबोधिताः किमपि काम्यगिरा परपुष्टया।
प्रियतमाय वपुर्गुरुमत्सरच्छिदुरयादुरयाचितमङ्गनाः॥

वरील पद्यांत **कालिदास** व **माघ** या दोघा महाकवींच्या पद्यांत

---

in the Sarasvati-Kanthábharana which occurs word for word, in the fifth chapter of the Harsha Charita also. **द्वीपाद्** &c. See the Ratnavali, P. 3 of the Calcutta edition See Hall's Introduction to Vâsavadatta.

साहेबांच्या हातून अशी चूक व्हावयाचीच नाहीं, म्हणून **काश्मीर, मुंबई** व **कलकत्ता** या ठिकाणीं छापलेल्या **हर्षचरिता**च्या पुस्तकाच्या प्रति वारंवार पाहिल्या व एक लेखी प्रतहि मिळवून पुनः पुनः पाहिली. परंतु साहेबांचे ह्मणण्याप्रमाणें कविता सांपडली नाहीं; तेव्हां त्यांनीं असें कसें लिहिलें तें समजत नाहीं!

१ अशीं आणखीहि पुष्कळ सादृश्यें देतां येण्यासारखीं आहेत.

'परभृता' व 'परपुष्टा' हे शब्द जमून आले असून दोहींत अर्थहि तोच. वृत्तहि तेंच, यमकहि तसेच व कल्पनाहि तीच आहे! इत्यादि वर दाखविलेल्या गोष्टींवरून अमक्यानें तमक्यास काव्य करून दिलें, असें ह्मणणें अविचाराचें व धाडसाचें आहे, असें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे! **रत्नावलीं**तील कवितेशीं **हर्षचरितां**तील कविता शब्दशः तर काय, पण मुदलींच जमणारी नाहीं. त्यांतून पांचव्या उच्छ्वासांतच ती असल्याबद्दल जर साहेब ह्मणताहेत, तर साहेबांचें हें सर्वच विधान चुकीचें आहे, असें **हर्षचरित** पाहिल्यावर कोणाच्याहि लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. साहेबांनीं **रत्नावलीं**तील कवितेबद्दल **कलकत्ता** छापील प्रत पान ३ तीन पाहण्यास जर फर्मावलें आहे, तर **हर्षचरिताच्या** संबंधानेंहि त्यांनां कोणत्या प्रतींत ती शब्दशः (word for word) आढळली त्या प्रतीचाहि उल्लेख करावयास पाहिजे होता तो केलेला नाहीं! "**धावकानें श्रीहर्षास रत्नावली** करून देऊन बहुधन मिळविलें" यावरच साहेबांच्या तर्कानेंहि ही धाव मारली कीं काय कोण जाणें! परंतु साहेबांनीं **धावका**संबंधानें कोठें विवेचन केलेलें आढळण्यांत नाहीं! तेव्हां तसेंहि ह्मणतां येत नाहीं. याकरितां साहेबांचें हें तर्कट उगीच आहे असेंच ह्मणणें भाग पडतें!!

तसाच दुसराहि असाच आणखी साहेबांचा अपूर्व शोध सत्यास सोडून असल्याबद्दल आढळून आला आहे! तो असा कीं, **नैषधचरितकाव्यां**तील बरेच श्लोक **भोजकृत सरस्वतीकंठाभरणां**त घेतले आहेत, असें ह्मणून **नैषधा**चा कर्ता **श्रीहर्ष** हा **भोज**राजाच्या पूर्वींचा आहे, असेंहि डा० **हॉल** साहेबांनीं प्रतिपादन केलें आहे. परंतु **नैषध**काव्यांतील एकहि श्लोक **सरस्वतीकंठाभरणां**त सांपडत नाहीं आणि **भोज**राजा हा तर सुमारें दहाव्या शतकांत **माळवा**प्रांतात राज्य करीत होता! तेव्हां हेंहि साहेबांनीं कसें लिहिलें तेंहि समजत नाहीं! असो.

१ **काव्यप्रकाशा**च्या टीकेंत "श्रीहर्षाख्यस्य राज्ञो नाम्ना रत्नावलीं नाटिकां कृत्वा धावकाख्य कविर्बहुधनं लेभे" असें आहे.

आतां '**रत्नावली**' ही **बाण**कवीनें केली, असें प्रतिपादन करणारांच्या म्हणण्यास सबल आधार आहे असें बिलकूल दिसत नाहीं, **श्रीहर्षा**च्या नांवावर केवळ '**रत्नावली**' एकच नसून या शिवाय '**प्रियदर्शिका**' व '**नागानंद**' अशीं एकंदर तीन नाटकें प्रसिद्ध आहेत, व तिहींतहि '**अद्याहं**' इ० हें गद्य व '**श्रीहर्षो निपुणः कविः**' हें पद्य असल्यामुळें तिहींचा कर्ता एकच असल्याचें सिद्ध होतें. तेव्हां **शातवाहन, भोज, भर्तृहरि, शूद्रक** इत्यादि राजांप्रमाणें **श्रीहर्ष**हि विद्वान् व कवि होता, असें ह्मणण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. **बाणानें**च **हर्षचरितांत हर्षाचें** वर्णन केलें आहे त्यांत त्यानें "**काव्यकथास्वपीतमप्यमृतमुद्वमंतम्**" व तसेंच—"**अपि चास्य प्रज्ञायाः शास्त्राणि । कवित्वस्य वाचः। गुण-गणस्य संख्या । न पर्याप्तो विषयः।**" असें **श्रीहर्षा**च्या संबंधानें ह्मटलें आहे. तसेंच पूर्वींच्या ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत प्राचीन कवींचे वेचे त्यांच्या त्यांच्या नांवावर दिले आहेत; त्यांत '**रत्नावली**' वगैरे ग्रंथांतलीं पद्यें **हर्षा**च्या नांवावरच दिलीं आहेत.

मधुसूदनसरस्वतीनेंहि "**मालवराजस्योज्जयिनीराजधानीकस्य**[1] **कविजनमूर्धन्यस्य रत्नावल्याख्यनाटिकाकर्तुर्महाराजश्रीहर्षस्य**" असें श्रीहर्षराजाला '**कविजनमूर्धन्य**' व '**रत्नावलीनाटिकाकर्ता**' असें ह्मटलें आहे. '**प्रसन्नराघव**' नाटकाचा कर्ता **जयदेव**कवि यानें एका पद्यांत **कविता-रमणी**च्या अवयवांच्या जागीं उत्तम उत्तम प्राचीन कविरत्नांची योजना केली आहे, त्यांत **बाण**कवि हा तिच्या हृदयांत वास करणारा **मदन** आणि **हर्ष** हा तिचा हर्षच कल्पिला आहे! तें पद्य असें:—

'**यस्याश्चोरश्चिकुरनिकुरः कर्णपूरो मयूरो**
भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः ।

---

१ राज्यवर्धनानें **मालवराजाला** मारल्यावर **हर्षानें** त्याचें राज्य खालसा केल्यानंतर मग **उज्जयिनी** येथेंहि **हर्षानें** राजधानीचें ठिकाण केलें असावें, असें वाटतें.

हर्षो हर्षो हृदयवसतिः पंचबाणस्तु बाणः
केषां नैषा भवति कविताकामिनी कौतुकाय! ॥'

इत्यादि प्रमाणांवरून हर्ष हा एक स्वतंत्र राजकवि होता यांत कांहीं संशय नाहीं. हर्षराजानें बौद्धदीक्षा घेतल्यावर त्या धर्मास अनुसरून करुणरसप्रधान **नागानंद** नांवाचें नाटक रचलें असावें, असें दिसतें. यांतील व इतर दोन नाटकांतील सारख्याच प्रस्तावनेवरून व नांदीवरून वगैरे '**रत्नावली**' इत्यादि तिन्ही नाटकांचा कर्ता हाच **श्रीहर्षराजा** असें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. पूर्वींचे पुष्कळ राजे विद्वान् व ग्रंथकार असल्याबद्दल प्रसिद्धि आहेच. **श्रीहर्षाला रत्नावलीच** तेवढी विकत घेण्याचें काय कारण पडलें होतें, तें समजत नाहीं! त्याच्या नांवावर आणखी **प्रियदर्शिका** व **नागानंद** हीं नाटकेंहि प्रसिद्ध आहेत व त्याच्यांतील वर्णनसादृश्यादि संबंधहि जुळतात. इतर दोन ग्रंथांविषयीं कोणीं कोठें असा उल्लेख केलेला आढळत नाहीं. यावरून टीकाकारांचें ह्मणणें बरोबर आहेसें वाटत नाहीं. **बाण**कवीस द्रव्याचा हव्यासच असता तर त्यानें **हर्षचरित** व **कादंबरी** हे ग्रंथ विकले असते तर त्याला पुष्कळ द्रव्य मिळालें असतें! त्यांत **हर्षचरिता**बद्दल तर **हर्षराजा**कडून त्यास पुष्कळच धन मिळालें असतें व **रत्नावली**च्या जागीं **हर्षचरिता**ची तशी प्रसिद्धि चालू राहती. परंतु पुस्तक विकून द्रव्य संपादन करण्याइतकी **बाण**कवीची निकृष्ट स्थिति नव्हती, हें त्याच्या गृहस्थितीवरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. त्यानें **रत्नावली** केली असती तरी त्यास ती विकण्याचें कांहींएक कारण पडलें नसतें असें खचित वाटतें!

श्रीहर्षराजाच्या तिन्ही नाटकांपैकीं '**रत्नावली**' व '**प्रियदर्शिका**' ह्या दोन्ही नाटिकांतील संविधानकांत बराच सारखेपणा आलेला आहे. '**नागानंद**' नाटकांतील संविधानक **बृहत्कथें**त असलेल्या **बौद्धजातकां**तील कथानुसंधानावरून घेतलेलें आहे व तें निराळें आहे. संस्कृत नाटकांत प्रायः शृंगाररसाची झांक कमीजास्त प्रमाणानें असते, तशी ती या तिहींतहि आहेच. **नागानंदां**त शेवटीं **जीमूतवाहन** जिवावर उदार होऊन

तसें वर्तन करतो—हा वीररस यांत चांगला साधला आहे. शिवाय मधून मधून **करुण** व **अद्भुत** हे रसहि आहेत. सर्व नाटकांत प्रसादगुणहि बराच जमला आहे.

हर्ष हा **रत्नावली** व **प्रियदर्शिका** यांतील नांदीच्या पद्यावरून व हर्षचरितांतील लेखावरून प्रथम तो शिवदेवतेचा उपासक होता. परंतु **नागानंद** नाटकाच्या आरंभीं त्यानें बुद्धदेवतेस अनुलक्षून नांदी केली आहे ती अशीः—

"ध्यानव्याजमुपेत्य चिंतयसि कामुन्मील्य चक्षुःक्षणम्
पश्यानंगशरातुरं जनमिमं त्रातापि नो रक्षसि ।
मिथ्या कारुणिकोसि निर्घृणतरस्त्वत्तः कुतोऽन्यः पुमान्
सेर्ष्यं मारवधूभिरित्यभिहितो बुद्धो जिनः पातु वः ॥
कामेनाकृष्यचापं हतपटुपटहं वल्गुभिर्मारवीरै-
र्भ्रूभङ्गोत्क्षेपजृम्भास्मितललितदृशा दिव्यनारीजनेन ।
सिद्धैः प्रह्वोत्तमाङ्गैः पुलकितवपुषा विस्मयाद्वासवेन
ध्यायन् यो योगपीठादचलित इति वः पातु दृष्टो मुनीन्द्रः ॥"

ह्या नांदीवरून व याच नाटकांतील पांचव्या अंकांत गरुडाच्या तोंडीं '**महदपकृत्यं मया कृतं किंबहुना बोधिसत्व एवायं मया व्यापादितः**' म्यां फार वाईट केलें, फार काय ? 'मी हा साक्षात् बोधिसत्व (बुद्धावतार) च मारिला!' असें वाक्य घातलें आहे.

श्रीहर्षानें जीमूतवाहनाच्या तोंडीं जीं गद्यपद्यें घातलीं आहेत, त्यांत बौद्धधर्माचीं तत्वें चांगलींच प्रतिबिंबित झालीं आहेत. त्यांतील थोडीं पद्यें पुढें दिलीं आहेत. दयाळुपणास आणि शरीराच्या नश्वरतेस अनुलक्षून जीमूतवाहन ह्मणतोः—

" आर्तं कण्ठगतप्राणं परित्यक्तं स्वबांधवैः ।
त्राये नैनं यदि तदा कः शरीरेण मे गुणः ॥ "
" सर्वाशुचिनिधानस्य कृतघ्नस्य विनाशिनः ।
शरीरकस्यापि कृते मूढाः पापानि कुर्वते ॥"

पक्ष्यांचा राजा गरुड हा जीमूतवाहनाचें शरीर तोडतोडून खात असतांहि त्याची आनंदित मुद्रा पाहून शंका आल्यावरून तो थांबला असतां जीमूतवाहन त्यास ह्मणतो आहे:—

'शिरामुखैः स्यन्दत एव रक्तमद्यापि देहे मम मांसमस्ति ।
तृप्तिं न पश्यामि तवापि तावत् किं भक्षणात्त्वं विरतो गरुत्मन्॥'
'संरक्षता पन्नगमद्य पुण्यं मयार्जितं यत्स्वशरीरदानात् ।
भवे भवे तेन ममास्तु नित्यं परोपकाराय शरीरलाभः ॥'

हर्ष, राज्यश्री आणि दिवाकरमित्र यांची गांठ पडली आहे, त्यावेळीं "वत्से वन्दस्वात्रभवन्तं भदन्तं एष ते भर्तुर्हृदयं द्वितीयमस्माकं च गुरुः इति"। "वत्से, बौद्धगुरूस वंदन कर, हे तुझ्या भर्त्याचे जीव कीं प्राण (मित्र) व माझे गुरु आहेत," असें हर्षानें आपल्या बहिणीस ह्मटलें आहे. तसेंच त्याची बहीण राज्यश्री ही वैराग्यानें बौद्धदीक्षा घेण्यास सिद्ध झाली असतां "इयं तु ग्रहीष्यति मयैव समं समाप्तकृत्येन काषायाणि" इति। माझें कर्तव्य उरकल्यानंतर ही माझी बहीण मजबरोबरच बौद्धदीक्षा ग्रहण करील, याप्रमाणें दिवाकरमित्राजवळ हर्षानें कबूल केलें असल्याचें हर्षचरितांत आहे. हर्षानें हर्षचरितांत बौद्धगुरूस विनंति केली आहे तींत देखील हर्षाच्या मनोवृत्तींतील बौद्धधर्माचीं तत्वेंच प्रतिबिंबित झालीं असल्याचें दिसून येतें.

"अतो नियुङ्क्तां कियन्तमपि कालमात्मानमार्योऽपि कार्ये मदीये दीयतामतिथये शरीरमिदम् । अद्यप्रभृति यावदयं जनो लघयति प्रतिज्ञाभारमाश्वासयति च तातविनाशदुःखविक्लवाः प्रजाः । तावदिमामत्रभवता कथाभिश्च धर्म्याभिः, कुशलप्रतिबोधविधायिभिरुपदेशैश्चारजोभिः, शीलोपशमदायिनीभिश्च देशनाभिः, क्लेशप्रहाणहेतुभूते-

१ जीमूतवाहनाच्या ह्या परोपकारावरून त्याचें नांव अत्युदारपुरुषरत्नांच्या मालिकेंत गोवलेलें आहे. ती मालिका अशी:—

"कर्णस्त्वचं शिबिर्मांसं जीवं जीमूतवाहनः ।
ददौ दधीचिरस्थीनि नास्त्यदेयं महात्मनाम् "॥

श्च ताथागतैः (बौद्धैः) दर्शनैः, अस्मत्पार्श्वोपयायिनीमेव प्रतिबोध्यमानामिच्छामि। इयं तु ग्रहीष्यति मयैव समं समाप्तकृत्येन काषायाणि। अर्थिजने च किमिव नातिसृजन्ति महान्तः। सुरनाथमात्मास्थिभिरपि यावत्कृतार्थमकरोद्धैर्योदधिर्दधीचः। मुनिनाथो (सुगतः) ऽप्यनपेक्षितात्मास्थितिरनुकम्पेति कृत्वा कृपावानात्मानं बठरसत्वेभ्यः कतिकृत्वो न दत्तवान्। अतःपरं भवन्त एव बहुतरं जानन्ति।" इत्युक्त्वा तूष्णीं बभूव भूपतिः।

हर्षानें **नागानंदां**त तर बौद्धतत्वास अनुसरूनच संविधानक घातलें आहे. आणि चवथ्या व पांचव्या अंकांत हर्षानें बौद्धांचाराचें मुख्य तत्व म्हणजे-परोपकाराकरितां स्वजीविताकडेहि न बघणें-याचें मूर्त तत्व, **जीमूतवाहन-विद्याधर** या पात्रांत दाखविलें आहे, तें खरोखरींच चांगलें वठलें आहे. ह्या **राजकवीनें** हें नाटक रचल्यावर तो त्याचा गीतवाद्यासह प्रयोग मोठ्या हौसेनें करवीत असे. इत्यादि अनेक गोष्टींवरून बौद्धदीक्षा स्वीकारल्यावर त्यानें त्या पंथास अनुसरून हें नाटक रचलें असावें असें उघड होतें. या गोष्टीस चिनीप्रवासी **इट्सिंग** याच्या लेखाचाहि पुरावा मिळतो, तो असाः—

"King [2]Silâditya versified the story of the Bodhisatava, Gimutawahana (ch-cloud-borne) who surrendered himself in place of Nâga. This version was set to music (lit-string and pipe) he had it performed by

१ परोपकार करणें, यास केवळ बौद्धधर्मांतच महत्व आहे असें नाहीं, तर त्यास सर्व धर्मांतहि महत्व आहे. **श्रीमद्भागवतां**तहि ह्याचें महत्व वर्णिलें आहेचः—

"एतावज्जन्मसाफल्यं देहिनामिह देहिषु-
प्राणैरर्थैर्धिया वाचा श्रेय एवाचरेत्सदा"

भागवत, दशमपूर्वार्ध, अ. २२ श्लोक ३५.

२ He called himself king's son (Kumâraràja) his title was Silâditya. Hiuen—Tsiang p. 2-3.

a band accompanied by ' dancing and acting, and thou popularized it in his time. " (Translated by G. Takakusu.) Itsing p. 163.

" राजा **शिलादित्य** (**हर्ष**) यानें **बोधिसत्व जीमूतवाहन**–ज्यानें **शंखचूड**नागाच्या जीवितरक्षणाकरितां आपणास बळी दिलें त्याच्या चरित्राचें **नागानंद** नांवाचें नाटक रचून त्यानें त्याचा आपल्या मंडळीकडून गीतवाद्यसहित प्रयोग करवून तें लोकप्रिय केलें होतें." असें **इट्सिंग** यानें ह्मटलें आहे. ह्या लेखावरूनहि **हर्षास बौद्ध**धर्म अतिप्रिय झाल्यावर त्या धर्मांतील संविधानकाचें नाटक रचून त्याचा तो आवडीनें खेळ करवीत असे असें लक्षांत येतें.

हुएनसँग तर **हर्ष** हा **बौद्ध**धर्मी असल्याचें जागजागीं वर्णन करतो. **हर्षा**चा वडील बंधु **राज्यवर्धन** हा तर **बौद्ध**धर्मी झाला होताच, असें ताम्रपत्रांतील ' **परमसौगतः** ' ह्या पदावरून स्पष्ट होतें. इत्यादि अनेक गोष्टींवरून **हर्ष** व त्याची बहीण **राज्यश्री** यांचा कल **बौद्ध**धर्माकडे असल्याचें व पुढें ते **बौद्ध**धर्मी झाले असावे असें लक्षांत येतें.

हर्षानें **बौद्ध**धर्मास अनुसरून **बुद्धा**चीं–**सुप्रभातस्तोत्र, अष्टमहाश्रीचैत्यस्तोत्र, जातकमाला**–इत्यादि स्तोत्रें केलीं असल्याचें कळतें.

हुएनसँग यानें **हर्षा**नें **बुद्धा**च्या मूर्तीची स्थापना करून देवालयहि बांधल्याचें वर्णन केलें आहे.

बौद्धधर्माचीं तत्वें **हर्षा**च्या मनोवृत्तींत प्रतिबिंबित झालीं असल्याचा व त्याप्रमाणें **प्रयाग** येथील त्याच्या वर्तनाचा चांगला मेळहि दिसून येतो.

ह्या कालीं **वैदिक**धर्माशीं **बौद्ध**धर्माचा एक जीव झाला असल्यामुळें कदाचित् दोन्ही दैवतांकडे **हर्षा**च्या अंतःकरणाचा समान भाव झाला असावा, व असें होणेंहि शक्य वाटतें.

हर्षाची राजधानी, राज्यविस्तार व त्याचा मृत्युकाल.

हर्षाची राजधानी,प्रथम **स्थानेश्वर** व नंतर **कनोज** ही होती. **राज्य-**

१ पुढें बुद्ध होणारा.

वर्धनानें मालवराजास मारल्यानंतर हर्षानें त्याचें माळव्यांतील राज्य खालसा केलें असावें. पुढें त्यानें प्रसिद्ध क्षेत्र उज्जयिनी येथेंहि राजधानीचें ठिकाण केल्याचें मधुसूदनाचे लेखावरून लक्षांत येतें. मयूरशतकाच्या मधुसूदनकृत भावबोधिनी टीकेंत ' मालवराजस्योज्जयिनीराजधानीकस्य कविजनमूर्धन्यस्य रत्नावल्याख्यनाटिकाकर्तुर्महाराज श्रीहर्षस्य " असें आहे. यावरून उज्जयिनी हेंहि त्याच्या राजधानीचें ठिकाण होतें असें कळतें.

हर्षराजाच्या राज्याचा विस्तार—उत्तरेस हिमालयापर्यंत, दक्षिणेस नर्मदेपर्यंत, पश्चिमेस पंजाबपर्यंत, व पूर्वेस बंगालपर्यंत होता. हर्षानें सुमारें ४० वर्षें राज्य केलें व तो इ. स. ६४८—५० या कालावधींत वारला. हर्ष हा शककर्ता राजा झाला त्याचा शक कांहीं कालपर्यंत उत्तर हिंदुस्थानांत चालू होता, याबद्दल शिलालेखांत पुरावा मिळतो.

---

१ जनरल कनिंगह्याम याच्या ' एनशंट जाग्रफी ऑफ इंडिया ' यावरून व ह्युएनसँगच्या लेखावरूनहि हा काळ ठरतो.

रत्नावली.

श्रीहर्षाचे ग्रंथ व त्यांचें यथामति व यथावकाश विवेचन—**रत्नावलीं**तील प्रत्येक अंकासंबंधानें संक्षिप्त कथानक—ह्या नाटिकेंतील कांहीं गोष्टींविषयीं विचार—**रत्नावलीं**तील कांहीं चित्तवेधक स्थलनिर्देश—त्या काळच्या चालीरीती इ०

श्रीहर्षाचे ग्रंथ व त्यांचें यथामति व यथावकाश विवेचन.

श्रीहर्षानें आपल्या ग्रंथांस **गुणाढ्याच्या बृहत्कथें**तून आधार घेतले आहेत. त्याच्या ग्रंथांत दोन नाटिका व एक नाटक आहे. **बृहत्कथा** हा ग्रंथ प्रस्तुत उपलब्ध नाहीं. परंतु त्याचीं दोन संस्कृत भाषांतरें—**कथासरित्सागर** व **बृहत्कथामंजरी**—अशीं प्रसिद्ध आहेत.

श्रीहर्षाची '**रत्नावली**' हें **नाटिकाकाव्य** आहे. हें नाटिकेच्या लक्षणास अनुसरूनच आहे. आरंभीं **शिवदेवतेस** अनुसरून नांदीचीं पद्यें म्हटल्यानंतर सूत्रधार पुढीलप्रमाणें आरंभ करतोः—

" सूत्रधारः—अलमतिप्रसंगेन । अद्याहं वसन्तोत्सवे सबहुमानमाहूय नानादिग्देशागतेन राज्ञः श्रीहर्षदेवस्य पादपद्मोपजीविना राजसमूहेनोक्तः । यथा—'अस्मत्स्वामिना श्रीहर्षदेवेनापूर्ववस्तुरचनालंकृता रत्नावली नाम नाटिका कृतेत्यस्माभिः श्रोत्रपरम्परया श्रुता । न तु प्रयोगतो दृष्टा । तत्तस्यैव राज्ञः सकलजनहृदयाह्लादिनो बहुमानादस्मासु चानुग्रहबुद्ध्या यथावत्प्रयोगेण त्वया नाटयितव्या ' इति । तद्यावदिदानीं नेपथ्यरचनां कृत्वा यथाभिलषितं संपादयामि । अये, आवर्जितानि च मया सकलसामाजिकानां मनांसीति मे निश्चयः । "

श्रीहर्षाच्या दोन्ही नाटिकांत व **नागानंद**नाटकांतहि सूत्रधाराच्या आरंभींच्या भाषणांत असाच मजकूर आहे. फक्त त्या त्या ग्रंथाच्या संबंधानें नामनिर्देश मात्र त्या त्या ठिकाणीं केलेला आहे. '**नानादिग्-**

देशागतेन राज्ञः श्रीहर्षदेवस्य पादपद्मोपजीविना राजसमूहेनोक्तः।' यावरून श्रीहर्षानें अनेक राजे जिंकल्यावर **वसंतऋतूंत (शिमग्याच्या** सणांत) कर्मणुकीकरितां त्यांचे प्रत्यक्ष प्रयोग करविले असावेत असें लक्षांत येतें. त्यानें बराच काल युद्ध करण्यांत घालविल्यामुळेंच त्याजकडून तिन्हीं ग्रंथांत युद्धप्रसंगाचीं वर्णनें आल्याखेरीज राहिलीं नाहींत व म्हणूनच **श्रीहर्षानें वत्सराजाच्या** तोंडांत '**राज्यं निर्जितशत्रु योग्यसचिवे न्यस्तः समस्तोभरः। सम्यक्पालनलालिताः प्रशमिताशेषोपसर्गाः प्रजाः।**' हा स्वानुभवच घातला आहे असें वाटतें.

"श्रीहर्षो निपुणः कविः परिषदप्येषा गुणग्राहिणी
लोके हारि च वत्सराजचरितं नाट्ये च दक्षा वयम्।
वस्त्वेकैकमपीह वाञ्छितफलप्राप्तेः पदं किं पुन-
र्मद्भाग्योपचयादयं समुदितः सर्वो गुणानां गणः॥"

हें पद्य त्याच्या तिन्ही ग्रंथांत आहे, यावरून व आणखी कांहीं पद्यें व मजकूर त्याच्या तिन्ही ग्रंथांत सारखाच आढळत असल्यावरून तिहींचा कर्ता **श्रीहर्ष**च असल्याचें उघड होत आहे.

रत्नावलीच्या आरंभीं सूत्रधारानें खेळास मदत करण्यास नटीस बोलाविलें असतां ती त्यास ह्मणते, ' तुह्मी निश्चिंत अहां, तुम्हाला नाचावयाचें सुचतें आहे, परंतु मला कोठें तें सुचतें आहे? माझी एकुलती एक मुलगी! व तिलाहि तुह्मी दूर देशीं दिलें, त्यामुळें मला बरें वाटत नाहीं, मग नाचणें बागडणें कोठून सुचणार? ' यावर तो ह्मणाला, ' तिला दूर दिलें ह्मणून काय झालें? दैव अनुकूल असलें ह्मणजे सर्व नीट घडून येतें!' हें ह्मणणें **रत्नावली**च्या (नायिकेच्या) चरित्रास अनुलक्षूनच आहे.

" द्वीपादन्यस्मादपि मध्यादपि जलनिधेर्दिशोऽप्यन्तात्।
आनीय झटिति घटयति विधिरभिमतमभिमुखीभूतः॥ "

हें सूत्रधाराच्या मुखांतील वचन किती समर्पक आहे! या ह्मणण्याला **यौगंधरायणानें रत्नावली**चें वहन समुद्रांत भग्न झालें असतां दैवानु-

कूलतेमुळेंच तिचें येथपर्यंत सुखरूप येणें झालें, असें म्हणून सूत्रधाराच्या ह्मणण्यास दुजोरा दिला तोहि समर्पक आहे.

पहिल्या अंकांत **वसंतोत्सवाचें** वर्णन व तो त्यावेळीं लोक कसा साजरा करीत असत हें दाखविलें आहे. **वत्सराज** गच्चीवर चढून शहरांतील उत्सवाची मौज पहात आहे. (हें **मदनोत्सववर्णन** चांगलें आहे.)

प्रत्येक अंकासंबंधानें संक्षिप्त कथानक.

वासवदत्ताराणीच्या दासी येऊन राजास सांगतात कीं, **मकरंदोद्यानांत** रक्ताशोकाच्या खालीं, या उत्सवानिमित्त मांडलेल्या **कुसुमायुधाचें** पूजन कर्तव्य आहे, याकरितां त्यावेळीं तेथें महाराजांनीं हजर असावें, अशी देवीची विनंति आहे. त्याप्रमाणें राजा विदूषकासह तिकडे जातो. उद्यानाचें व त्यांतलि वृक्षांचें वर्णन चित्तवेधक आहे. राणी दासींसह तेथें येते व सर्व पूजासाहित्य सिद्ध असल्याचें विचारते. **सागरिका** सर्व सिद्ध असल्याचें सांगते. तिला पाहून राणी मनांत ह्मणते, काय ही सेवकजनांनीं केवढी चूक केली पहा! महाराजांच्या दृष्टीआड इला ठेवलें असून दासींनीं हिला येथें आणलें! मग राणी तिला ' लवकर परत जाऊन (सारिकेस) सांभाळ ' असें ह्मणून परत पाठविते. परंतु **सागरिका** झाडांआड लपून पूजासमारंभ पहाते. राजा येतो. **मदनपूजा** करून राणी राजाचें पूजन करते. **सागरिका** राजास पहाते व ह्मणते, पित्याच्या येथें चित्रांतील कामदेवाचें पूजन होतें व येथें प्रत्यक्ष मदनाचें होतें! पुढें भाटांच्या ह्मणण्यांत '**दृशामुदयनस्येन्दोः**' असें आल्यावरून पित्यानें ज्याला देऊं केलें तोच हा **उदयन-वत्सराज** होय! असें ह्मणून त्याच्या दर्शनानें आपणास ती धन्य मानते. पुढें संध्याकाल झाल्यामुळें सर्व जातात.

अंक २. यांत सारिकेचा पिंजरा घेऊन **सुसंगता** येते. ती **सागरिकेचा** शोध करते. तिला **निपुणिकेकडून** ती कदली-गृहांत गेल्याचें कळतें. तेथें तिनें

---

१ शा. अं. ६ यांत **वसंतोत्सव** व **कामदेवार्चन** यांचें वर्णन आहे.
२ हा राजा **पांडवांच्या** वंशांतला सातवा पुरुष होता.

चित्रफलकावर राजाचें चित्र काढलें असल्याचें दृष्टीस पडतें. **सागरिका** विरहपीडित होऊन आपल्याशीं बोलत असल्याचें **सुसंगता** ऐकते. दोघींचा संवाद व **सागरिकेच्या** विरहावस्थेचें वर्णन यांत आहे. वानर सुटल्याचा गलबला होतो. दोघी भिऊन पिंजरा तेथेंच टाकून तमालांच्या झाडींत जाऊन लपून बसतात. **सागरिका** चित्रफलकाबद्दल विचारते. **सुसंगता** ह्मणते, ' चित्रफलकाला काय करतेस ? त्या दुष्ट वानरानें सारिकेचा पिंजरा उघडल्यामुळें ती उडून चालली आहे, ती आपलें बोलणें कोणाजवळ सांगेल, ह्मणून तिला धरूं चल. ' दोघी तिच्या मागें जातात. राजा व विदूषक हे येतात. **सागरिका** व **सुसंगता** यांचें विनोदपर भाषण सारिकेच्या मुखा-वाटे त्यांनां कळतें. ते फिरत फिरत कदली-गृहांत जातात. तेथें चित्र-फलक व विरहिणीची कमलशय्या त्यांच्या दृष्टीस पडते. **सागरिका सुसंगते**-सह चित्रफलकाकरितां तेथें येते. राजा **सागरिकेचें** वर्णन करीत असल्याचें त्यांच्या कानीं पडतें. मग **सुसंगता** चित्रफलक आणण्याकरितां कदलीगृहांत जाते व विनोदानें ह्मणते—" चित्रफलकाच्या संबंधानें सर्व मीं ऐकलें, तर आतां जाऊन देवीला सांगतें "? " आह्मी उगीच गमतीनें बोलत होतों. तूं देवीला सांगूं नकोस, " असें राजा तिला ह्मणतो. ती बरें ह्मणून प्रियसखी **सागरिका** हीस प्रसन्न करण्यास (राजाला) सांगते. राजा आनंदानें तिजकडे जातो व तिचा हात धरून स्पर्शसुख मानतो. ती **सुसंगतेवर** रागावते. ' ही दुसरी **वासवदत्ताच** आहे ! ' असें विदूषक विनोदानें म्हणतो तें ऐकून सर्वांस राणी आल्याचा भास होतो ! **सागरिका** घाबरून निघून जाते, इतक्यांत **वासवदत्ता** व **कांचनमाला** येतात व त्या कदलीगृहांत जातात. तेथें विदूषकाच्या हयगयीमुळें त्याच्या काखेंत असलेला चित्रफलक खालीं पडतो व तो राणीच्या हातीं लागतो. राणी चित्रफलकांतील चित्राबद्दल विचा-रपूस करते. राजा व विदूषक उडवाउडवी करतात. राणी रागानें निघून जाते.

मदनिका कांचनमालेचा शोध करीत येते. **कांचनमाला**, 'वसंतकानें सल्लामसलतींत राजाच्या प्रधानावर (अमात्यावर) तान केली ह्मणून शाबासकी देते.' ती ऐकून **मदनिका कांचनमालेस** विचारते. ती **सुसंगतेचा**

व वसंतकाचा झालेला संवाद सांगते. **सुसंगता** म्हणते, चित्रफलक पाहून शंकित झालेल्या देवीनें **सागरिके**स माझ्या हवालीं करतेवेळीं मला पोशाक दिला तोच आपण **सागरिके**स घालून व मी **कांचनमाले**चा पोशाक करून संध्याकाळीं तिला महाराजाकडे नेऊं. तूं संगीतशाळेंत आमची वाट पहात बैस. **मदनिका** अशा करणीनें देवीची वंचना केली असें होईल, म्हणून **सुसंगते**स नांवें ठेवते. दोघी जातात.

राजा **सागरिके**ची काळजी करतो. तिचें कुशल समजण्याकरितां वसंतकास पाठवून त्याची वाट पहातो. तो परत येतो. तो आपल्या मनांत म्हणतो, 'ह्या वर्तमानानें मित्रास **कौशांबी**[1]च्या राज्यप्राप्तीपेक्षां देखील मोठाच आनंद होईल ' असें म्हणत राजाजवळ येतो. राजा त्याला **सागरिके**चें कुशल विचारतो. तो त्याच्या कानांत कांहीं मजकूर सांगतो. राजा सानंद होतो व **विदूषकास** म्हणतो, माधवीलतामंडपांत जाऊन प्रियेची वाट पहात बसूं. ते तेथें जातात. **विदूषक** राजास 'देवीचा वेष धारण करणाऱ्या **सागरिके**स घेऊन येतों ' असें सांगून जातो.

वासवदत्ता व **कांचनमाला** येतात. 'खरोखरीच का माझा वेष धारण करून **सागरिका** महाराजांकडे जाणार आहे ?' असें राणी **कांचनमाले**स विचारते. ती तिला 'खरेंच' म्हणून चित्रशाळेकडे नेते. वसंतकाला **सागरिका** आली असें वाटतें. तो **सागरिका** समजून तिला राजाकडे घेऊन जातो. **सागरिका** आल्याचें वाटून राजा तिचें वर्णन करतो. तें ऐकून राणीस आश्चर्य वाटतें. विदूषक तीस ' राणीच्या कडू भाषणांनीं मित्राचे कान किटले आहेत, तर तूं आपल्या गोड भाषणांनीं आनंदित कर, सुख दे, ' असें म्हणतो. राणी रागावते व बुरखा पलीकडे करून राजास 'खासें ! ' 'चांगलें !' असा टोमणा मारते ! ती **सागरिका** नसून राणी असल्याचें कळून राजा व विदूषक खिन्न होतात. राजा राणीची क्षमा मागतो व पायां पडतो. ती रागानें जाते. पुढें **सागरिका** येते व

१ **कौशांबी** ही **प्रयाग–अलाहाबाद** -याच्या नैऋत्येस सुमारें पंधरा कोसांवर होती. ही **कुशांबु** नांवाच्या राजानें वसविली होती.

म्हणते, राणीचा वेष धारण करून संगीतशाळेंतून मी आलें, परंतु सुदैवानें मला कोणी भेटलें नाहीं. तथापि हें राणीला कळून तिनें **सुसंगते**प्रमाणें दुर्दशा करावी त्यापेक्षां गळफास लावून मरावें हें बरें ! तर आतां अशोक वृक्षाखालीं जाऊन मी आपला हेतु तडीस नेतें. ती तिकडे जाते व गळफास घालते. विदूषक तिला राणी समजून राजास हाका मारतो. तो येऊन तिचा गळफांस काढतो. राजास पाहून **सागरिके**ला आनंद होतो. ती "मला प्राण देऊं द्या, म्हणजे सुटलें एकदाची !" 'तुम्हींहि राणीचे अपराधी होऊं नका.' असें राजास म्हणून पुन्हां ती गळफास लावते. राजा तिला ओळखून तिचें निवारण करतो व स्पर्शसुख मानतो. राजाचा अव्हेर करून गेल्यामुळें राणीस पश्चात्ताप होऊन ती राजाकडे पुनः येते व तेथें राजाचा व **सागरिके**चा संवाद ऐकून फिरून रागावते. विदूषक म्हणतो, 'देवि ! तूंच आली आहेस असें समजून मीं मित्राला येथें आणलें.' 'वेषसादृश्यामुळें मी फसलों.' असें राजाहि म्हणतो. राणी विदूषकास व **सागरिके**स बांधून नेते.

रत्नमाला घेऊन **सुसंगता** रडत येते, व **सागरिकेचें** काय केलें तें समजत नाहीं म्हणून शोक करते. राणीनें सोडून दिल्यामुळें वसंतकहि तेथें येतो. 'ही रत्नमाला तिनें तुला देण्यास सांगितलें आहे,' असें म्हणून **सुसंगता** ती त्याच्या स्वाधीन करते. विदूषक राजाकडे व ती राणीकडे निघून जाते.

राजा येतो व मीं राणीचें शांतवन केलें परंतु **सागरिके**ची काय वाट, म्हणून काळजी करतो.वसंतक राजाकडे येतो व राजा त्यास **सागरिकेचें** कुशल विचारतो तो घोटाळून नीट सांगत नाहीं, यामुळें राजा दुःख करतो. विदूषक हा, तिला **उज्जयिनी**स पाठविल्याचें व **सागरिकेनें** ही रत्नमाला मजकडे पाठविली म्हणून सांगतो. राजा ती घेऊन तिनेंच समाधान मानतो व विदूषकास ती नीट संभाळण्यास सांगतो.

वसुंधरा येते व **विजयवर्मा** आल्याचें सांगते. राजा त्यास आंत घेऊन येण्यास सांगतो. तो येतो व **रुमण्वानानें कोसलदेश** जिंकल्याचें सांगतो.

राजा **विजयवर्म्यास** बक्षीस देण्यास सांगतो. **विजयवर्मा** जातो. **कांचनमाला** येते व राजास सांगते कीं, ' **उज्जयनी**हून गारुडी आला आहे, तर त्याचा खेळ पहावा असें देवीनें सांगितलें आहे. ' राजा त्याला घेऊन येण्यास सांगतो. ती त्यास घेऊन येते. गारुडी कुंचली फिरवून अनेक चमत्कार दाखवितो. राजा राणीला खेळ पाहण्यास बोलावतो. ती येऊन बसते. विदूषक गारुड्यास हळुच ह्मणतो, ' देव, देवांगना दाखवून काय उपयोग ? राजास प्रसन्न करणें असल्यास **सागरिकेस** दाखीव. '

वसुंधरा येते व ' **बाभ्रव्या**सह **वसुभूति**अमात्य आल्याचें व याच वेळेस त्यांची भेट घ्यावी ' अशी आमात्याची विनंती राजास सांगते. 'माहेराहून आमात्य **वसुभूति** आला आहे याकरितां त्याची अगोदर भेट घ्यावी व खेळ सध्यां राहूं द्यावा ' असें राणीहि सांगते. राजा खेळ बंद करण्यास सांगतो. गारुडी माझा आणखी एक खेळ पहावा ह्मणून विनंति करतो. राजा बरें ह्मणून त्यास बक्षीस देण्यास सांगतो. राजा वसंतकाला आमात्य **वसुभूतीस** घेऊन येण्यास सांगतो. तो त्यास व **ब्राभ्रव्यास** घेऊन येतो. वसंतकाच्या गळ्यांतील रत्नमाला पाहून ' ही **सिंहलेश्वरानें रत्नावलीस** प्रयाणकालीं रत्नमाला दिली तीच ही दिसते आहे, असें ते दोघे एकमेकाशीं बोलतात. मग **सिंहलेश्वराचें वत्सराजानें** कुशल विचारलें. तेव्हां **वसुभूतीनें** दुःखानें खालीं तोंड घातलें व " **सिंहलेश्वराच्या** कन्येचें जो कोणी पाणिग्रहण करील तो सार्वभौम होईल असें भविष्य ऐकून **यौगंधरायणानें** ती महाराजांस प्राप्त व्हावी ह्मणून पुष्कळ खटपट केली, परंतु राणीस अवघड वाटूं नये ह्मणून **सिंहलेश्वरानें** ती महाराजांस देण्याविषयीं अनमान केला. परंतु ' **लावाणक** ' येथील अग्नींत राणी दग्ध झाल्याची बातमी उठवून पुन्हां **यौगंधरायणानें** त्याजपाशीं मागणी केली ती त्यानें मान्य करून तिला आमच्याबरोबर पाठविलें, परंतु ती समुद्रांत जहाज फुटून बुडाली ! " असें सांगून शोक करतो. **वत्सराज** व **वासवदत्ता**हि शोक करतात. इतक्यांत

अंतःपुरास आग लागल्याचा गलबला होतो. **सागरिकेस** बिड्या घालून ठेवलेल्या ठिकाणास आग लागली, असें पाहून राणी घाबरून राजास तें वर्तमान सांगते. सर्व नको ह्मणत असतां राजा आगींत जाऊन **सागरिकेला** घेऊन येतो. अग्नि शांत होतो. हें गारुड्याचें गारूड असावें, ह्मणून सर्वांस चमत्कार वाटतो. **वसुभूती व बाभ्रव्य** हे **रत्नावलीस** ओळखतात. राणीस आपल्या करणीची लज्जा व खेद वाटतो. **यौगंधरायण** येतो व व्यापाऱ्यानें **रत्नावलीस** मजजवळ आणून पोंहचती केल्यावर मी तीस राणीचे हवालीं केलें व ती येथें केव्हांतरी महाराजाच्या दृष्टीस पडून ते तिचा स्वीकार करतील ह्मणून असें केलें असें सांगतो. **वासवदत्ता** आनंदानें **रत्नावलीस** वस्त्रेंभूषणें घालून राजास अर्पण करते!

ह्या नाटिकेंतील कांहीं गोष्टींविषयीं विचार.

ह्या नाटिकेंत (**रत्नावलींत**) **सिंहलेश्वराची** कन्या **रत्नावली (सागरिका)**ही **वत्सराजाचे** दृष्टीस पडण्याकरितां व उभयतांचें प्रेम जडण्याकरितां कवीनें अनेक प्रसंग योजले आहेत. **वसंतोत्सवांतील मदनमहोत्सवांत** **कामदेवपूजनाकरितां** आलेल्या **वासवदत्ताराणीबरोबर** **सागरिकेस** आणलें आहे. हा मूळ पाया कवीनें घातला आहे. बागेंत **कामदेवाजवळ** राणी जाऊन पोंचली, तेव्हां तिनें पूजासाहित्याबद्दल दासींस विचारलें असतां 'सर्व साहित्य सिद्ध असल्याचें' **सागरिकेनें** सांगितलें. तिला पाहून 'परिजनानें हिला येथें येऊं दिलें ही मोठी चूक केली,' असें ह्मणून तिनें तिला परत जाण्यास सांगितलें. परंतु येथें कवीनें राणीकडून जशी खबरदारी घ्यावयास पाहिजे होती तशी खबरदारी घेववली नाहीं. राणीनें राजाला तेथें **कामदेवपूजनाच्या** वेळीं हजर राहण्यास सांगितलें होतें तर **सागरिका** परत जातांना कदाचित् तिची व राजाची भेट होईल कीं काय ही शंका राणीच्या मनांत यावयास पाहिजे होती. तिला बागेंतून राजवाड्याकडे एकटी पाठविणें ठीक नव्हतें. तिला तिच्या जागीं पोंचविण्यास शंकेखोर राणीनें आपली एकादी विश्वासूक दासी बरोबर देऊन पोंचवा-

वयास पाहिजे होती. परंतु तसें केलें नाहीं. यावरून कवीनें बुध्याच तशी सवड ठेवली असें लक्षांत येतें !

तिला एकटीला परत जाण्यास सांगितल्यामुळें तेथील पूजासमारंभ पाहण्याची तिला इच्छा होऊन झाडांच्या आड उभी राहण्यास संधी सांपडली. तितक्यांत राजा तेथें आला. राणीनें त्याचा सन्मान करून त्याचें पूजन केलें. तें **सागरिकेच्या** दृष्टीस पडलें ! मदनमूर्ती राजावर तिचें प्रेम बसलें. भाटाच्या वर्णनांत '**उदयनस्येंदोरिव**' असें येऊन 'माझ्या पित्यानें ज्याला देऊं केलें तोच हा **उदयन-वत्सराज** होय' असें म्हणून त्याचें दर्शन झाल्यामुळें तिनें आपल्याला धन्य मानलें !

ह्या अंकांत ह्या रीतीनें **सागरिकेस** तेथें आणून कवीनें **वत्सराजास सागरिकेच्या** दृष्टीस पाडून प्रेमबंधनास सुरवात केली आहे. असें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येण्यासारखें आहे.

अंक दुसरा.—यांत **सुसंगतेनें** सारिकेचा पिंजरा घेऊन **सागरिकेचा** शोध करीत येणें, कदलीगृहांत जाणें, तेथें **सागरिकेनें** चित्रपटावर काढलेलें राजाचें चित्र तिच्या दृष्टीस पडणें, एकटें चित्र सुनें दिसतें म्हणून **सुसंगतेनें** त्याच्या शेजारीं **सागरिकेचें** चित्र काढणें, दोघींचें विनोदपर भाषण होणें, साखळदंड तोडून वानर येत असल्याचें कळणें, यामुळें पिंजरा तेथेंच टाकून दोघींनीं लपून बसणें, वानर येऊन त्यानें पिंजऱ्याचें दार उघडें टाकणें, सारिकेनें उडून जाणें, तिच्या मुखानें **सागरिका** व **सुसंगता** यांचें संभाषण राजास कळणें, राजाचें कदलीगृहांत जाणें, तेथें चित्रफलक दृष्टीस पडणें, चित्रफलकाकरितां **सागरिका** व **सुसंगता** यांचें तेथें येणें, ह्या सर्व गोष्टी राजाची व **सागरिकेची** भेट होण्याकरितांच योजलेल्या आहेत. त्या ठिकाणीं **सुसंगता** राजाला ह्मणते :—"**एष एव मे गुरुः प्रसादः । यत्किमिति त्वयात्र चित्रफलक आलिखितेति कुपिता मे प्रियसखी सागरिका वर्तते । तद्गत्वा प्रसाद्यताम्**"। यावर राजा ह्मणतो:—'दर्शय दर्शय । क्वासौ ।' असें ह्मणून

तो सुसंगतेबरोबर जातो. पुढें तो तिचें वर्णन करतो. सागरिका सुसंगतेवर रागावते व तेथून जाऊं लागते. सुसंगता राजास ह्मणते, 'भर्तः अतिकोपना खल्वेषा । तदग्रहस्ते गृहीत्वा प्रसादयैनाम् !' असें तिचें भाषण ऐकून राजा बरें आहे ह्मणून आनंदानें तिला धरतो व स्पर्शसुख मानतो.

या ठिकाणीं पूर्वी सागरिकेबद्दल राजाला कांहींएक माहिती नसतां व ही कोण याबद्दल राजानें कांहींएक चौकशी न करतां एकाएकीं जाऊन तिचा हात धरणें उचीत वाटत नाहीं ! शांकुतलांत 'ग्रहीतुमिच्छन्पुनरात्मानं निगृह्य'। 'अनुयास्यन्मुनितनयां सहसा विनयेन वारितप्रसरः । स्थानादनुच्चलन्नपि गत्वेव पुनः प्रतिनिवृत्तः ॥'

असा राजाचा मनोनिग्रह किंवा विनय जसा शोभा देतो, तसें हें धाष्टर्य शोभत नाहीं ! त्यांतून तसा दाट परिचय झाल्यावरची गोष्ट निराळी! मग कालिदासास देखील विनय राखतां आला नाहीं ! शाकुंतलांत दुष्यंत सोडीत नाहीं असें पाहून शकुंतला त्यास ह्मणते, पुनः एकदां मी सख्यांचा सल्ला विचारतें,तर मला सोडा. यावर राजा ह्मणाला, बरें सोडीन! ती ह्मणाली केव्हां? राजा ह्मणालाः—

"अपरिक्षतकोमलस्य तावत्कुसुमस्येव नवस्य षट्पदेन ।
अधरस्य पिपासता मया ते सदयं सुन्दरि गृह्यते रसोऽस्य ॥"

तितका दाट परिचय झाल्यावर विनय किंवा मर्यादा नष्ट होणें हें स्वाभाविकच आहे !

राजाची व सागरिकेची भेट झाल्यावर तिनें बळेंच सखीवर रागावणें वगैरे शृंगारचेष्टा चालू असतां सागरिकेच्या रुसण्यास अनुलक्षून विदूषकाकडून 'एषा खल्वपरा वासवदत्ता !' असें वदवून राजा व सागरिका यांनां राणी आल्याचें भासवून सागरिकेनें राणीच्या भयानें तेथून जाणें, पुढें वासवदत्तेनें राजाकडे येणें, विदूषकाच्या हयगयीमुळें

त्याच्या काखेंतून चित्रफलक खालीं पडणें, तो राणीच्या दृष्टीस पडणें, तिनें रागावून परत जाणें हे सर्व प्रकार कवीनें संविधानक वाढविण्याकरितांच केले असावे असें वाटतें. चित्रफलक व त्यावर राजाचें व त्याचे शेजारीं **सागरिके**चें चित्र दृष्टीस पडल्यावर कोण्याहि स्त्रीस असली गोष्ट सहन होणें संभवत नाहीं, व तिच्या हातून होण्यासारखा असल्यास ती त्याबद्दल ताबडतोब प्रतीकार केल्याखेरीजहि कधीं राहणार नाहीं! असें असून राणीनें यावेळीं जेव्हां याबद्दल खबरदारी घेतली नाहीं, त्याअर्थीं कवीनेंच अशी ढिलाई केली असल्याचें लक्षांत येतें व असें करणें उचित आहे किंवा कसें याबद्दल मतांतर होणें शक्य आहे!

अंक तिसरा.—यांत **सुसंगते**च्या भाषणांत देवीनें **सागरिके**ला माझ्या हवालीं करतांना मला आपला पोशाक बक्षीस दिला तोच **सागरिके**स घालून व मी **कांचनमाले**चा पोशाक करून प्रदोषकालीं तिला महाराजाकडे नेईन, तूं चित्रशाळेंत माझी वाट पहात बैस,' असें **सुसंगतेनें** वसंतकास म्हटलेलें **कांचनमालेनें** ऐकलें, तें तिनें **मदनिके**स सांगितलें; तेव्हां ती म्हणाली:—

"**सुसंगते, हतासि खलु त्वं यद्येवं परिजनवत्सलां देवीं वञ्चयसि ।**"

आतां राणीनें **सुसंगतेस** पोशाक देण्याचें काय कारण असेल तें कळत नाहीं. तथापि राणीनें सेवकास देणगी देणें संभवनीय आहे. तरी याचें कारण व्यक्त असतें तर बरें होतें. आतां राणीच्या वेषानें **सागरिकेस** राजाकडे नेण्याचें काय कारण होतें? तें समजत नाहीं. या उपायानें दोघांचा समागम करून देणें, असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण कदलीगृहांत दोघांची पूर्वींच भेट होऊन एकमेकांवर प्रीति जडलेली होतीच; तेव्हां अशा वेषानें नेण्याचें कारण काय असावें? अशा करण्यांत **वासवदत्ते**ची तरी वंचना कशी झाली? दासी म्हणून समजलेल्या **सागरिकेस** राणीचा पोशाक नेसावयास देणें, हीच वंचना समजावयाची कीं काय? परंतु तसेंहि म्हणतां येत नाहीं. कारण, दासी असलेल्या **सुसंगतेस** राणीनें तो पोशाक बक्षीसच जर दिला होता तर तसेंहि म्हणतां येत नाहीं. **सुसंगतेनें सागरिकेस** राणीचा पोशाक नेसविण्याचें कारण इतकेंच

दिसतें कीं, चांगल्या पोशाकानें सजवून तिला राजाकडे नेणें एवढेंच असावें. या पोशाकावरून **सागरिका** ही **वासवदत्ताच** आहे अशी विदूषकाची समजूत होण्यास हें कारण झालें आहे. तसेंच वेषसादृश्यामुळें मी फसलों असें राजास ह्मणण्यासहि सापडलें आहे. परंतु तें राणीस खरें वाटलें नाहीं. राणीच्या पोशाकानें राजाकडे नेणें हीच वंचना असावी असें वाटतें, किंवा असल्या कर्मास सहाय्य करणारीण **सुसंगता** आहे. ह्मणून वंचना असेल तर कोण जाणे !

वासवदत्ता राणीस राजाचें व **सागरिकेचें** चित्र एकेठिकाणीं पाहून संशय आला होता व आपला पोशाक घालून **सागरिका राजाकडे** जाणार असल्याचें **कांचनमालेकडून** तीस कळलें होतें व चित्रशालेच्या द्वारांत संकेताप्रमाणें वसंतक **सागरिकेची** वाट पहात बसला होता, हेंहि तिच्या दृष्टीस पडलें होतें. तर तेथेंच **सागरिकेस** व वसंतकास तिला पकडतां आलें असतें व ती पकडण्याची योग्य वेळहि होती. परंतु तसें केलें असतें तर पुढील ग्रंथ लांबवितां आला नसता. याकरितांच कवीनें तसें करण्याचें टाळलें असें दिसतें!

अंक चौथा.—यांत **सुसंगता** ह्मणते "**इयं च रत्नमालापि जीवितनिराशयया तया कस्यापि ब्राह्मणस्य हस्ते प्रतिपादयेत्युक्त्वा मम हस्ते समर्पिता । तद्यावत्कमपि ब्राह्मणमन्वेषयामि ।** " असें ती एकदां ह्मणते. पुढें तीच वसंतकाची गांठ पडली तेव्हां ह्मणते–,-‘ **एषा रत्नमाला तया जीवितनिराशययार्यवसंतकस्य हस्ते प्रतिपादयेत्युक्त्वा मम हस्ते समर्पिता । तन्नुगृह्णात्वार्य एताम्** ’ । यावरून ही दासी प्रसंग पडेल तशी वागणारी व बोलणारी होती, असें लक्षांत येतें. **सागरिकेस** राजाकडे नेण्याच्या कामांत तिला मदत करणारीण हीच. ही अगदीं राणीच्या भरवशांतली म्हणून राणीनें **सागरिकेस** इच्या हवालीं केलें व हिला आपला पोशाकहि बक्षीस दिला. परंतु राणीच्या मर्जीप्रमाणें ही वागली नाहीं. दिलेल्या पोशाकाचा उपयोग तिनें **सागरिकेस** सजवून राजाकडे नेण्यांत केला. यामुळें **सुसंगता** ही राणीस गुन्हेगार

वाटून राणीनें तिला शिक्षा केली असावी, असें तिसऱ्या अंकांत **साग-रिकेच्या** बोलण्यांत आल्यावरून कळतें. " **वरमिदानीं स्वयमेवात्मानमुद्बध्योपरता भविष्ये । येन न पुर्वविदितवृत्तान्ततया देव्या सुसंगतेव परिभूतास्मि ।** " अभिसारिकावेषानें **सुसंगतेच्या** मदतीनें **सागरिका** राजाकडे जाणार हें राणीस कळल्यावर तिनें **सुसंगतेस** शिक्षा केली असल्याचें ध्यानांत येतें, तसेंच तिनें त्यावेळीं **सागरिकेस** कां केली नाहीं? तिला आणखी गुन्हे करण्यास सवड कशाकरितां दिली ? यावरून कवीनेंच संविधानक लांबविण्याकरितां असें केलें असावें असें वाटतें. परंतु संविधानकाचा मिलाफ कोणाच्या मनांत व्यंग न येतां झाला असता तर बरें झालें असतें!

गारुड्याचा खेळ चालू असतां मध्येंच दासी **वसुंधरा** येऊन राजास **अमात्याचा** निरोप सांगते. येथें विषयांतरासारखें वाटून मनास विसंगतता वाटतें. या अंकांतच पुढें **बाभ्रव्य** व **वसुभूती** हे **वत्सराजाकडे** आले, त्यावेळीं राजास **सागरिकेची** विस्मृति पडली. मुख्य गोष्टीची (अंगीची) विस्मृति, हा **काव्यप्रकाशांत** दोष सांगितला आहे व त्याचें हेंच उदाहरण त्यांत दिलें आहे.

---

१ 'अङ्गिनोऽननुसंधानम्, यथा, रत्नावल्यां चतुर्थेऽङ्के बाभ्रव्यागमने सागरिकाया विस्मृतिः ॥'

रत्नावलींतील कांहीं चित्तवेधक स्थलनिर्देश.

वसंतोत्सवांतील मदनमहोत्सवाचें वर्णनः—

विदूषकः—(सहर्षम्।) भो वयस्य, एवं न्विदम् । अहं पुनर्जानामि न भवतो न कामदेवस्य ममैवैकस्य ब्राह्मणबटुकस्यायं मदनमहोत्सवः। यस्य कृते प्रियवयस्येनैवं मन्त्र्यते। (विलोक्य) तत्किमनेन। प्रेक्षस्व प्रेक्षस्व तावदस्य मधुमत्तकामिनीजनस्वयंग्राहगृहीतशृङ्गकजलप्रहारनृत्यन्नागरजनजनितकौतूहलस्य समन्ततः स्वच्छन्दमर्दलोद्दामचर्चरीशब्दमुखररथ्यामुखशोभिनः प्रकीर्णपटवासपुञ्जपिञ्जरितदिशदिङ्मुखस्य सश्रीकतां मदनमहोत्सवस्य।

राजाः—(सहर्षं समन्तादवलोक्य।) अहो, परां कोटिमधिरोहति प्रमोदः पौराणाम्। तथाहि।

धारायन्त्रविमुक्तसंततपयःपूरप्लुते सर्वतः-
सद्यः सान्द्रविमर्दकर्दमकृतक्रीडे क्षणं प्राङ्गणे।
उद्दामप्रमदाकपोलनिपतत्सिन्दूररागारुणैः
सैन्दूरीक्रियते जनेन चरणन्यासैः पुरः कुट्टिमम्।

हा वसंतऋतूंतील उत्सव बहुतकरून शिमग्याचा सणच असावा. यांतच नाटकें वगैरे व बीभत्स खेळ करण्याची चाल पडलेली असावी असें लक्षांत येतें.

या उत्सवामध्यें पतिपत्नी हीं जोडप्यानें मदनाच्या प्रतिमेची पूजा करीत असत. रत्नावलींत मदनाची मूर्ति रक्ताशोकवृक्षाच्या बुंध्याशीं ठेवून राजा व राणी पूजा करीत आहेत असें दाखविलें आहे. प्रणयिजनामध्यें प्रेमकलह होऊं नयेत म्हणून कामदेवाची पूजा करण्याची चाल असावी असें दिसतें. कारण मधुमास हा विशेषेंकरून प्रणयिजनांचीं हृदयें व्यथित करतो, आणि म्हणूनच तो त्यांनां असह्य होतो.

इह प्रथमं मधुमासो जनस्य हृदयानि करोति मृदुलानि।
पश्चाद्विध्यति कामो लब्धप्रसरैः कुसुमबाणैः॥

बाणकवीच्या **कादंबरीं**तहि **जरद्द्रविडा**च्या वर्णनांत '**वसन्तक्रीडिनाजनेनोत्क्षिप्तखण्डखट्वारोपितवृद्धदासीविवाहप्राप्तविडम्बनेन** ' असें आहे. यावरून **वसंतऋतूं**त असे खेळ **हर्ष** व **बाण** यांच्या काळाच्या पूर्वीपासून **शिमग्या**च्या सणांतच होत आलेले असावेत असें वाटतें. **वसंतऋतूं**त अशा प्रकारच्या या खेळाखेरीज पांच सहा दिवसांचा दुसरा सणच नाहीं!

राजा **मकरंदोद्याना**त जाऊन तेथील वनश्रीचें वर्णन करीत असल्याचें दाखविलें आहे. त्यांतील एकच पद्य पुढें दिलें आहे. यावरून कवीचें स्वाभाविक वर्णनचातुर्य कळून येण्यासारखें आहे.

यांत वृक्ष हे मधु (वसंत-मद्य) प्रसंगानें मद्यप्यासारखे उन्मत्त झाल्याचें वर्णन आहे—

उद्यद्विद्रुमकान्तिभिः किसलयैस्ताम्रां त्विषं बिभ्रतो
भृङ्गालीविरुतैः कलैरविशदव्याहारलीलाभृतः ।
घूर्णन्तो मलयानिलाहतिचलैः शाखासमूहैर्मुहु-
र्भ्रान्तिं प्राप्य मधुप्रसङ्गमधुना मत्ता इवामी द्रुमाः ॥

सागरिकेला पाहून राणीच्या मनांत शंका येते व ती राजाच्या दृष्टीस पडूं नये ह्मणून "ह्या उत्सवांत सारिकेजवळ कोणी नसतां तिला टाकून तूं येथें कशी आलीस ? " असें ह्मणून तिला परत जाण्यास सांगते:—

वासवदत्ता—(निरूप्यात्मगतम्) **अहो प्रमादः परिजनस्य । यस्यैव दर्शनपथात्प्रयत्नेन रक्ष्यते तस्यैव दृष्टिगोचरे पतिताभवेदियम् । भवतु । एतत्तावद्भणिष्यामि । हञ्जे सागरिके, किमिति त्वमद्य मदनमहोत्सवपरिहीने परिजने सारिकामुज्झित्वेहागता । तस्मात्तत्रैव लघु गच्छ ।**

राजा—राणीस उद्देशून ह्मणतो आहे:—

देवि त्वन्मुखपङ्कजेन शशिनः शोभातिरस्कारिणा
पश्याब्जानि विनिर्जितानि सहसा गच्छन्ति विच्छायताम् ।
श्रुत्वा ते परिवारवारवनितागीतानि भृङ्गाङ्गना-
लीयन्ते मुकुलान्तरेषु शनकैः संजातलज्जा इव ॥

सागरिका हृदयास ह्मणते, दुर्लभजनाचा अनुराग धरून कां उगीच मला कष्ट देतेंस ? ज्याच्या दर्शनमात्रेंकरून तुला इतका संताप होतो त्याचाच तूं अभिलाष धरतेंस, तेव्हां तूं किती वेडें आहेस ?–

सागरिका–" हृदय, प्रसीद प्रसीद । किममुनायासमात्रफलकेन दुर्लभजनप्रार्थनानुबंधेन । अन्यच्च येनैव दृष्टेन म एतादृशः संतापो ननु वर्धते । पुनरपि तमेव प्रेक्षितुमभिलषसीत्यहो ते मूढता। अयि नृशंस हृदय, जन्मतः प्रभृति सह संवर्ध्येमं जनं परित्यज्य क्षणमात्रदर्शनपरिचितं जनमनुगच्छन्कथं न लज्जसे । "

(शाकुंतलांतहि अशा अर्थाचें वाक्य आहे:–

शकुं०—(आत्मगतम्) **" हृदय, प्रथममेव सुखोपनते मनोरथे कातरभावं न मुञ्चसि । सानुशयविघटितस्य कथं ते सांप्रतं संतापः ।")**

(अशाच अर्थाचें समर्थन **मालतीमाधवां**तहि आहे:—

मालती:–"दर्शनं पुनस्तत्कालमनोहरं परिणामदीर्घसंतापदारुणं च । धन्याः खलु ताः स्त्रियो या स्त्वां न प्रेक्षन्ते । प्रेक्ष्यात्मनो हृदयस्य वा प्रभवन्ति । ")

चित्रफलक घेऊन मदनपीडित अशी **सागरिका** येते व ह्मणते, ' प्रियवल्लभाचें चित्र काढून तरी मी त्यास पोटभर पाहीन '–असें ह्मणून ती राजाचें चित्र काढते. **सुसंगता** हळूच येऊन पहाते व ह्मणते, **" कथं भर्तालिखितः । साधु प्रियसखि साधु । अथवा न कमलाकरमुज्झित्वा राजहंस्यन्यत्राभिरमते । "** (**शाकुंतलां**तहि अशाच प्रकारचें वर्णन आढळतें. **" अनुसूयादिष्ट्यातेऽनुरूपोऽभिवेशः । सागरं वर्जयित्वा कुत्र वा महानद्यवतरति । ")** दोन्हीहि दृष्टान्त फारच समर्पक आहेत.

सागरिका–(सबाष्पम्) **आलिखितो मयायम् । किं पुनर्निपतद्बाष्पसलिलेन मे दृष्टिः प्रेक्षितुं न प्रभवति ।**

(**मालतीमाधवां**तहि याच अर्थाचें वचन आहे:–

माधव मकरंदास ह्मणतो आहे:-

'वारंवारं तिरयति दृशावुद्गतो बाष्पपूरः'।)

सागरिका व सुसंगता ह्या दोघींच्या बोलण्यांतील विनोद खुबीदार असल्यामुळें तो पुढें दिला आहे:—

सुसंगता–सखि, क एष त्वयालिखितः ।

सागरिका–(सलज्जम्) प्रवृत्तमदनोत्सवे भगवाननङ्गः ।

सु०–(सस्मितम्) अहो ते निपुणत्वम् । किं पुनः शून्यमिव चित्रं प्रतिभाति । तस्मादहमप्यालिख्य रतिसनाथं करिष्ये । (वर्तिकां गृहीत्वा नाट्येन रतिव्यपदेशेन सागरिकामालिखति).

सा०–(विलोक्य सक्रोधम्) सखि, किमिति त्वयात्राहमालिखिता ।

सु०—(विहस्य) सखि, किमकारणे कुप्यसि । यादृशस्त्वया कामदेव आलिखितस्तादृशी मया रतिरालिखिता । तस्मादन्यथासंभाविनी, किं तवैतेनालपितेन । कथय सर्वं ।

सा०—(सलज्जा स्वगतम्) ननु ज्ञातास्मि प्रियसख्या । प्रियसखि, महती खलु मे लज्जा तस्मात्तथा कुरुष्व यथा न कोऽप्यपर एतद्वृत्तान्तं जानातीति ।

सु०—सखि, मा लज्जस्व । ईदृशस्य कन्यारत्नस्यावश्यमेवेदृशे वरेऽभिलाषेण भवितव्यम् । तथापि यथा न कोऽप्यपर एतद्वृत्तान्तं ज्ञास्यति तथा करोमि । एतया पुनर्मेधाविन्या सारिकयात्र कारणेन भवितव्यम् । कदाप्येषास्यालापस्य गृहीताक्षरा कस्यापि पुरतो मन्त्रयिष्यत इति ।

सागरिकेचें चित्र पाहून राजा आनंदानें तिचें वर्णन करतो:--

"लीलावधूतपद्मा कथयन्ती पक्षपातमधिकं नः ।
मानसमुपैति केयं चित्रगता राजहंसीव ॥"

अपि च ।

विधायापूर्वपूर्णेन्दुमस्या मुखमभूद्ध्रुवम् ।
धाता निजासनाम्भोजविनिमीलनदुःस्थितः ॥

सारिका न सांपडल्यामुळें त्या दोघी चित्रफलक नेण्याकरितां त्या ठिकाणीं येतात. कदली-गृहांतील राजा व विदूषक यांचा संवाद त्यांच्या कानीं पडतो. दोघी ऐकत उभ्या राहतात. राजा फिरून **सागरिकेचें** वर्णन करतो तें वर्णन ऐकून दोघींची खात्री होते. त्या ठिकाणीं कमलिनी-दलें व मृणालें यांनीं केलेली विरहिणीची शय्या दृष्टीस पडते. तीवर जसा कांहीं विरहिणीचा ठसाच उमटला आहे असें राजा वर्णन करतो:—

परिम्लानं पीनस्तनजघनसङ्गादुभयत–
स्तनोर्मध्यस्यान्तः परिमिलनमप्राप्य हरितम् ।
इदं व्यस्तन्यस्तं श्लथभुजलताक्षेपवलनैः
कृशाङ्ग्याः संतापं वदति नलिनीपत्रशयनम् ॥

हें वरील पद्य त्या वेळची यथायोग्य स्थिति दाखविणारें आहे ! या पुढें दुसऱ्या अंकांत **सागरिका** व **सुसंगता**, राजा व विदूषक, **वासवदत्ता** व **कांचनमाला** यांचे मुळांतील संवाद वाचण्यासारखे आहेत.

सभ्यपणा न सोडतां राणी रागानें गेली त्यावेळचें राजानें तिचें वर्णन केलें आहे तेंहि खुबीदार वाटल्यावरून पुढें दिलें आहे:—

विदूषक—भोः, दिष्ट्या वर्धसे । क्षेमेणातिक्रान्ता वासवदत्ता कालभ्रामिव तद्गामिष्ये ।

राजा—" धिङ् मूर्ख, अलं परितोषेण । यान्त्या निगूढो न लक्षितस्त्वया देव्याः कोपानुबन्धः । पश्य ।

भ्रूभङ्गे सहसोद्गतेऽपि वदनं नीतं परां नम्रता-
मीषन्मां प्रति भेदकारि हसितं नोक्तं वचो निष्ठुरम् ।
अन्तर्बाष्पजडीकृतं प्रभुतया चक्षुर्न विस्फारितं
कोपश्च प्रकटीकृतो दयितया मुक्तश्च न प्रश्रयः ॥

राजा अस्तास चाललेल्या सूर्याचें वर्णन करतो आहे:—

राजा–(विलोक्य सहर्षम् ।) सखे, सम्यगुपलक्षितम् । पर्यवसितमहः । तथाहि ।

यातोऽस्मि पद्मवदने समयो ममैष
सुप्ता मयैव भवती प्रतिबोधनीया ।
प्रत्यायनामयमितीव सरोरुहिण्याः
सूर्योऽस्तमस्तकनिविष्टकरः करोति ॥

विदूषक व राजा हे अंधकाराचें वर्णन करतातः—

विदूषक-शोभनं भणितम् । भो वयस्य, प्रेक्षस्व प्रेक्षस्व । एष खलु बहुलीकृतविरलवनराजिसंनिवेशो गृहीतघनपङ्कपीवरवन-वराहमहिषकृष्णच्छविरपसरति पूर्वदिशां प्रच्छादयंस्तिमिरसंघातः ।

राजा-(सहर्षं समान्ताद्विलोक्य।) वयस्य,सम्यगुपलक्षितम्। तथाहि।

पुरः पूर्वामेव स्थगयति ततोऽन्यामपि दिशं
क्रमात्क्रामन्नद्रिद्रुमपुरविभागास्तिरयति ।
उपेतः पीनत्वं तदनु च जनस्येक्षणपथं
तमः संघातोऽयं हरति हरकण्ठद्युतिहरः ॥

विदू०-(राजास) देवीचा वेष करून येणाऱ्या सागरिकेस मी घेऊन येतों. (असें ह्मणून जातो, राजा त्याची वाट पहात बसतो व ह्मणतो) काय पहा कामिजनाची इतर स्त्रीविषयीं किती आसक्ति असते ती! असें म्हणून तिचें वर्णन करतो:—

प्रणयविशदां दृष्टिं वक्त्रे ददाति न शङ्किता
घटयति घनं कण्ठाश्लेषे रसान्न पयोधरौ ।
वदति बहुशो गच्छामीति प्रयत्नधृताप्यहो
रमयतितरां संकेतस्था तथापि हि कामिनी ॥

वासवदत्ता व कांचनमाला संगीतशालेकडे जातात.

(ततः प्रविशत्युपविष्टः कृतावगुण्ठनो वसन्तकः)

विदू०-(कर्णौ दत्वा) यथासौ चित्रशालिकाद्वारे पदशब्दः श्रूयते तथा तर्कयाम्यागता सागरिकेति ।

कांच०--भर्त्रि, इयं सा चित्रशालिका। तद्यावद्वसन्तकस्य संज्ञां करोमि। (इति छोटिकां ददाति।)

विदू०–(सहर्षमुपसृत्य सस्मितम्) सुसंगते, सदृशः खलु त्वया कृतः कांचनमालाया वेषः। अथ सागरिका कुत्रेदानीम्।

कांच०--(अंगुल्या दर्शयन्ती) नन्वेषा!।

विदू०-(दृष्ट्वा सविस्मयम्) एषा स्फुटमेव वासवदत्ता!।

वास०--(साशंकमात्मगतम्) कथं लक्षितास्मि!।

विदू०–भवति सागरिके, एष खलु प्रियवयस्यस्त्वामेवोद्दिश्योत्कण्ठानिर्भरं मन्त्रयते। तन्निवेदयामि तवागमनम्।

(वासवदत्ता विहस्य कांचनमालामवलोकयति)

(सर्वे परिक्रामन्ति)

राजा--(सोत्कण्ठमात्मगतम्) अये, उपस्थितप्रियासमागमस्यापि किमिदमत्यर्थमुत्ताम्यति मे मनः। अथवा—

तीव्रः स्मरसंतापो न तथादौ बाधते यथासन्नः।
तपति प्रावृषि नितरामभ्यर्णजलागमो दिवसः॥

विदूषकाच्या सांगण्यावरून राजा राणीच्या जवळ जाऊन सागरिका समजून तिचें वर्णन करतोः—

राजा–(उपसृत्य) प्रिये सागरिके—

शीतांशुर्मुखमुत्पले तव दृशौ पद्मानुकारौ करौ
रम्भागर्भनिभं तवोरुयुगलं बाहू मृणालोपमौ।
इत्याह्लादकराखिलाङ्गि रभसान्निःशङ्कमालिङ्ग्य मा-
मङ्गानि त्वमनङ्गतापविधुराण्येह्येहि निर्वापय॥

वासवदत्ता-(सबाष्पमपवार्य।) कांचनमाले, एवं स्वयं मन्त्रयत आर्यपुत्रः। पुनरपि कथं मामालपिष्यतीत्यहो आश्चर्यम्।

कांचनमाला–भर्त्रि, एवमिदम्। 'किं पुनरपरं साहसिकानां पुरुषाणां न संभाव्यते'।

कांचनमालेनें साहसिक पुरुषांस उद्देशून वरील वाक्यांत टोला मारला आहे, तो अगदीं यथार्थ आहे !

राजा राणीच्या प्रीतीस अनुलक्षून ह्मणतो आहे:—

राजा—समारूढा प्रीतिः प्रणयबहुमानादनुदिनं
व्यलीकं वीक्ष्येदं कृतमकृतपूर्वं खलु मया।
प्रिया मुञ्चत्यद्य स्फुटमसहनाजीवितमसौ
प्रकृष्टस्य प्रेम्णः स्खलितमविषह्यं हि भवति॥

सागरिकेचें आपल्याशींच भाषण, गळफास घालणें व राजाची भेट:-

साग०—(सास्रं विमृश्य) वरमिदानीं स्वयमेवात्मानमुद्बध्योपरता भविष्ये। येन न पुनर्विदितसंकेतवृत्तान्ततया देव्या सुसंगतेव परिभूतास्मि। तद्यावदहमशोकपादपे गत्वा यथासमीहितं करिष्ये। (इति परिक्रामति)

विदू०—(आकर्ण्य) तिष्ठ तावत्तिष्ठ। ननु पदशब्दः श्रूयते। जानामि कदापि गृहीतप्रस्तावा पुनरपि देव्यागता भवेत्।

राजा—वयस्य, महानुभावा खलु देवी। कदाचिदेवमपि स्यात्। तत्त्वरितं निरूपय।

विदू०—यद्भवानाज्ञापयति। (इति निष्क्रामति।)

साग०—(उपसृत्य) तद्यावदेतया माधवीलतया पाशं विरच्याशोकपादप आत्मानमुद्बध्य व्यापादयामि। (इति लतापाशं रचयन्ती) हा तात, हा तात, हा अम्ब, हा अम्ब, एषेदानीमनाथाशरणा विपद्ये मन्दभागिनी। (इति कण्ठे लतापाशमर्पयति)

विदू०—(विलोक्य) का पुनरेषा। कथं पुनर्देवी वासवदत्ता। (ससंभ्रममुच्चैः।) भो वयस्य, परित्रायस्व परित्रायस्व। एषा खलु देवी वासवदत्तात्मानमुद्बध्य व्यापादयति।

राजा—(कण्ठात्पाशमपनयन्।) अयि, साहसकारिणी, किमिदमकार्यं क्रियते।

साग०—(राजानं दृष्ट्वा ।) अयि । कथमेष भर्ता । (सहर्षमात्मगतम्) यत्सत्यमेतं प्रेक्ष्य पुनरपि मे जीविताभिलाषः संवृत्तः । अथवा । एनं प्रेक्ष्य कृतार्था भूत्वा सुखमात्मानमुद्बध्य जीवितं परित्यजे । (प्रकाशम्) मुञ्चतु भर्ता पराधीनः खल्वयं जनः । न पुनरीदृशमवसरं मर्तुं प्राप्यते । त्वमपि देव्या मात्मानमपराधिनं कुरुष्व । (इति पुनः कंठे पाशं दातुमिच्छति ।)

राजा—(निरूप्य सहर्षम् ।) कथं प्रिया मे सागरिका ! । (इति कण्ठात्पाशमाक्षिप्य) (इति बाहुपाशमाक्षिप्य कण्ठे गृहीत्वा स्पर्शसुखमभिनीय विदूषकं प्रति ।) सखे, इयमनभ्रा वृष्टिः ।

विदूषकः—भोः, एवमेतत् । यद्यकालाभ्रा भूत्वा देव्यागत्यान्यथा न करिष्यति ।

(ततः प्रविशति वासवदत्ता कांचनमालाच ।)

वासवदत्ता—कांचनमाले मम चरणनिपतितमार्यपुत्रमवधीर्यागच्छन्त्या मयातिनिष्ठुरं कृतम् । तदिदानीं स्वयमेव गत्वार्यपुत्रमनुनयिष्ये ।

कांचनमाला—कान्या धन्या देवीं वर्जयित्वैवं भणितुं जानाति । वरं स एव देवो दुर्जनो भवतु । न पुनर्देवी । तदेतु देवी ।

(इति परिक्रामतः)

राजा--(सागरिकेस) अयि मुग्धे, किमद्यापि मध्यस्थतया वयं विफलमनोरथाः क्रियामहे ।

कांचनमाला-(कर्णं दत्वा) भर्त्रि, यथा समीपे भर्ता मन्त्रयते तथा तर्कयामि त्वामेवानुनेतुमागच्छति । तदुपसर्पतु भर्त्री ।

वासवदत्ता--(सहर्षम्) तदलक्षितैव पृष्ठतो गत्वा कण्ठे गृहीत्वा प्रसादयिष्ये ।

विदू०--भवति सागरिके, निश्वस्ता भूत्वा प्रियवयस्यमालापय ।

वासवदत्ता-(आकर्ण्य सविषादम् ।) कांचनमाले, सागरिकाप्यत्र तिष्ठति । तच्छृणुवः । ज्ञात्वा पश्चादुपसर्पिष्ये । (इति तथा करोति ।)

सागरिका--भर्तः किमेतेनालीकदाक्षिण्येन जीवितादप्यधिकवल्लभाया देव्याः पुनरप्यात्मानमपराधिनं करोषि ।

राजा—अयि, मिथ्यावादिनी खल्वसि । कुतः ।

श्वासोत्कम्पिनि कम्पितं कुचयुगे मौने प्रियं भाषितं
वक्त्रेऽस्याः कुटिलीकृतभ्रुणि तथा यातं मया पादयोः ।
इत्थं नः सहजाभिजात्यजनिता सेवैव देव्याः परं
प्रेमाबन्धविवर्धिताधिकरसा प्रीतिस्तु या सा त्वयि ॥

वास०--(उपसृत्य सरोषम्) आर्यपुत्र युक्तमेतत् । सदृशमेतत् ।

राजा—(दृष्ट्वा सवैलक्ष्यम् ।) देवि, न खल्वकारणे मामुपालब्धुमर्हसि । त्वामेव मत्वा वेषसादृश्याद्विप्रलब्धा वयमिहागताः । तत्क्षम्यताम् । (इति पादयोः पतति ।)

वासवदत्ता—(सरोषम्) आर्यपुत्र, उत्तिष्ठोत्तिष्ठ । किमद्यापि ' सहजाभिजातया सेवया ' दुःखमनुभाव्यते ।

राजा—(स्वगतम्) किमेतदपि श्रुतं देव्या । तत्सर्वथा देवीप्रसादनोपायं प्रति निराशीभूताः स्म । (इत्यधोमुखस्तिष्ठति ।)"

राजाकडे पाहणाऱ्या सागरिकेस व वसंतकास घेऊन राणी जाते. राजा त्या वेळच्या स्थितीचें वर्णन करतो:—

किं देव्याः कृतदीर्घरोषमुषितस्निग्धस्मितं तन्मुखं
त्रस्तां सागरिकां सुसंभृतरुषा संतर्ज्यमानां तथा ।
बद्धा नीतमितो वसन्तकमहं कं चिन्तयामीत्यहो
सर्वाकारकृतव्यथः क्षणमपि प्राप्नोमि नो निर्वृतिम् ॥

राजा खिन्न होऊन देवीला प्रसन्न करण्याकरितां जातो. सागरिकेच्या स्पर्शसुखाची आठवण होऊन राजा ह्मणतो:—

अम्भोजगर्भसुकुमारतनुस्तदासौ
कण्ठग्रहे प्रथमरागघने विलीय ।
सद्यः पतन्मदनमार्गणरन्ध्रमार्गै-
र्मन्ये मम प्रियतमा हृदयं प्रविष्टा ! ॥

वीररसाचें वर्णनः—

विजयवर्मा—देव, कृतनिश्चयश्चासौ
योद्धुं निर्गत्य विन्ध्यादभवदभिमुखस्तत्क्षणं दिग्विभागा-
न्विन्ध्येनेवापरेण द्विरदपतिघटापीडबन्धेन रुन्धन् ।
वेगाद्बाणान्विमुञ्चन्समदगजघटोत्पिष्टपत्तिर्निपत्य-
प्रत्यैच्छद्वाञ्छिताप्तिद्विगुणितरभसस्तं रुमण्वान्क्षणेन ॥

अपि च ।

अस्त्रव्यस्तशिरस्त्रशस्त्रकषणैः कृत्तोत्तमाङ्गे क्षणं
व्यूढासृक्सरिति स्वनत्प्रहरणे वर्मोद्गमद्वह्निनि ।
आहूयाजिमुखे स कोसलपतिर्भग्ने प्रधाने बले

राजा—कथमस्मदीयान्यपि बलानि भग्नानि ।

विजयवर्मा—

एकेनैव रुमण्वता शरशतैर्मत्तद्विपस्थो हतः ॥

फारा दिवसांनीं आपल्या स्वामीचें दर्शन झालें असतां वृद्ध झालेल्या स्वामिभक्ताच्या स्थितीचें वर्णनः—

बाभ्रव्यः—वसुभूते, अद्य खलु चिरात्स्वामिनं द्रक्ष्यामीति यत्सत्यमानन्दातिशयेन किमप्यवस्थान्तरमनुभवामि । कुतः ।

विवृद्धिं कम्पस्य प्रथयतितरां साध्वसवशा-
दविस्पष्टां दृष्टिं तिरयति पुनर्बाष्पसलिलैः ।
स्खलद्वर्णां वाणीं जडयतितरां गद्गदतया-
जरायाः साहाय्यं मम हि परितोषोऽद्य कुरुते ॥

राजा—(शेवटीं अग्नींत शिरून घाबरल्यासारखें करतो व अग्नीस म्हणतो) 'प्रियाविरहानें जो दग्ध झाला नाहीं, त्याला तुझ्या ज्वाला काय करणार आहेत ?' कामाधीन झालेल्या जनास असें वाटणें हें कांहीं आश्चर्य मानावयास नको !

विरम विरम वह्ने मुञ्च धूमानुबन्धं
प्रकटयसि किमुच्चैरर्चिषां चक्रवालम् ।
विरहहुतभुजाहं यो न दग्धः प्रियायाः
प्रलयदहनभासा तस्य किं त्वं करोषि ॥

त्या काळच्या चालीरीती वगैरे.

यांत शिवदेवतेचें वर्णन आढळतें.

यांतील अमात्य **यौगंधरायण** याच्या वर्तनावरून–राजास चांगला लाभ करून द्यावयाचा असला म्हणजे त्याला पूर्वी न कळवितां शेवटीं निदर्शनास आल्यावर मग नम्रतेनें कळवीत असत–असें दिसतें.

सिंहलद्वीपाहून इकडे येण्यास प्रवहण–जहाजासारखें साधन होतें असें लक्षांत येतें.

गारुडी चमत्कारिक खेळ करीत असत.

मणिमंत्रौषधींच्या अनुभवाचें वर्णन आढळतें.

वृक्षदोहद—अकालीं वृक्षांस फलपुष्पें येणें याचेंहि वर्णन आढळतें.

संतोषकारक कृत्य केल्यावर बक्षीस देण्याची चाल होती.

नियमोपवास करण्याची व ब्राह्मणाला दान देण्याचीहि चाल होती.

वसन्तोत्सव करण्याची चाल होती.

'हास्तिकप्रायमशेषसैन्यम्' 'मत्तद्विपस्थो हतः' इ० वरून हस्तिसैन्याचा बराच प्रचार होता असें लक्षांत येतें.

शपथ वाहण्याची चाल होती.

प्रियदर्शिका.

प्रियदर्शिकेंतील तात्पर्यरूपानें गोष्ट.--यांत असलेल्या गर्भनाटकासंबंधानें दोन शब्द.-प्रियदर्शिकेंतील कांहीं गोष्टींविषयीं विचार व वर्णनस्थलांचे निर्देश.-दोन्ही नाटिकांत अनेक गोष्टींचें सादृश्य.--त्या काळच्या चालीरीती इ०

प्रियदर्शिकेंतील तात्पर्यरूपानें गोष्ट.

अंगदेश[1]चा राजा **दृढवर्मा** याला एक सुंदर कन्या होती. **कलिंग**[2]-देशचा राजा **कलिंग** यानें तिची मागणी केली, परंतु ती त्याला न देतां **दृढवर्म्यानें** **वत्सराजास**[3] ती देऊं केली. तेव्हां **कलिंगानें** **दृढवर्म्यावर** स्वारी केली. ह्या गडबडींत **दृढवर्म्याच्या** कंचुकीनें **प्रियदर्शिकेस** **दृढवर्म्याचा** स्नेही **विंध्यकेतुराजा** याच्यापाशीं आणून ठेविलें. याच सुमारास **वत्सराजानें** **विंध्यकेतूचा** पराभव करण्याकरितां **विजयसेन** सेनापतीस पाठविलें. त्यानें त्याचा वध करून **प्रियदर्शिका** ही त्याचीच कन्या समजून तिला **वत्सराजाकडे** आणिलें. त्यानें तिला आपली राणी **वासवदत्ता** इच्या स्वाधीन करण्यास व नृत्यगायनकला शिकविण्यास व ती उपवर झाली म्हणजे कळविण्यास सांगितलें. ती अरण्यांत सापडली म्हणून तिला **आरण्यका** असें नांव पडलें. हींच यांतील मुख्य नायिका होय.

वासवदत्तेची आई आणि **प्रियदर्शिकेची** आई ह्या सख्या बहिणी होत्या, तरी **वासवदत्तेस** माहीत न झाल्यामुळें **प्रियदर्शिका** ही त्या ठिकाणीं दासीप्रमाणेंच असे. आपल्या पित्यानें आपणास **वत्सराजास** देऊं केलें असल्याचें तिला माहीत होतें. तरी हाच तो **वत्सराज** असें तिला प्रथम माहीत नव्हतें.

---

१ **अंगदेश** हा **भागलपुराच्या** पश्चिमेस **गंगा** व **शरयु** यांच्यामध्यें होता.

२ हा देश **ओरिसापासून** **द्राविडपर्यंत** होता. हल्लींची **राजमहेंद्री** हीच राजधानी ' **दंतपूर** ' या नांवानें प्रसिद्ध होती.

३ **वत्सराजानें** **विजयसेन** सेनापतीस **विंध्यकेतूवर** स्वारी करण्यास सांगून त्याचा पराभव केला याचें कारण नाटिकेंत कोठें आढळत नाहीं.

एके दिवशीं राणीच्या सांगण्यावरून **आरण्यका** आपल्या सखीसह बागेंत पुष्करणींतील कमलें तोडण्यास गेली असतां त्या ठिकाणीं तिची व **वत्सराजा**ची दृष्टादृष्ट झाली! तेव्हां तिचें सौंदर्य पाहून राजा मोहित झाला व ती आपणास कशी प्राप्त होईल ह्या विवंचनेंत तो पडला. पुढें पित्यानें ज्याला देऊं केलें होतें तोच हा **वत्सराज** असें तिला समजून तिचेंहि प्रेम त्यावर बसलें. हा प्रकार राजाचा मित्र **वसंतक, आरण्यके**ची सखी **मनोरमा** व राजघराण्यांतील पोक्त बाई **सांकृत्यायनी** यांस समजतांच त्या ह्या उभयतांचा योग कसा जुळून येईल ह्या विषयीं विचार करूं लागल्या. तथापि **वासवदत्ते**ला ही गोष्ट आवडणार नाहीं, म्हणून त्यांनीं तिला कळविलें नाहीं. मग त्यांनीं राजाला आपल्या मसलतींत घेऊन **वत्सराज प्रद्योता**च्या येथें बंदींत असतां त्यानें **वासवदत्तेचें** कसें हरण केलें हें राणीस मनोरंजनाच्या मिषानें करून दाखवावें, असें ठरविलें. ह्या उपनाटकांत **आरण्यकेनें वासवदत्तेचें** व **मनोरमेनें वत्सराजाचें** सोंग घ्यावें व खेळ ऐनभरांत आला म्हणजे **वत्सराजानें** पुढें होऊन बाकीची बतावणी करावी व त्यांचा गांधर्वविवाह व्हावा. पुढें याप्रमाणें सर्व घडूनहि आलें, परंतु कांहीं अमर्याद गोष्टी घडून आल्यामुळें **वासवदत्तेस** राजाचा संशय येऊन तिनें **आरण्यकेस** रागानें खोलींत कोंडून ठेवलें!

कलिंगानें दृढवर्म्यास पदच्युत केलें. हें ऐकून **वत्सराजानें** त्याचें राज्य त्यास मिळवून देण्याकरितां आपल्या सेनापतीस **कलिंगावर** पाठविलें. त्यानें त्याचा पराजय करून व **दृढवर्म्यास** त्याच्या राज्यावर बसवून तो कंचुकीसह परत आल्यावर ही शुभवार्ता **वत्सराजास** सांगतो आहे तों, **आरण्यकेनें** विष प्राशन केलें. तिची अवस्था कठिण आहे, असें **मनोरमेनें** येऊन सांगितलें. **दृढवर्म्या**कडील वर्तमान सांगत असतां **प्रियदर्शिकेस विंध्यकेतू**च्या जवळ ठेविलें होतें. परंतु तेथून ती नाहींशी झाली, असें **वासवदत्तेनें** ऐकतांच तिला अत्यंत दुःख झालें.

आरण्यकेनें विषप्राशन केल्याचें वर्तमान **मनोरमेनें** सांगितलें तेव्हां तिला लवकर घेऊन येण्यास राणीनें सांगितलें. त्या प्रमाणें तिनें तिला आणिल्यावर ती कंचुकीच्या दृष्टीस पडली. तेव्हां त्यानें तिला ओळखिलें; व तिची भयंकर स्थिति पाहून तो अत्यंत शोक करूं लागला. यावरून ही आपली बहीण **प्रियदर्शिकाच** आहे असें राणीस कळून ती फार घाबरी झाली व **वत्सराजास** विष उतरण्याची विद्या अवगत असल्याचें तिला माहीत असल्यामुळें तिनें त्याजकडून मंत्रविद्येनें विष उतरवून ती नीट झाल्यावर तिचें राजाकडून पाणिग्रहण करविलें !

या नाटिकेंत **प्रद्योताची** कन्या **वासवदत्ता** इचें बंदींत असतां कसें हरण केलें हें गर्भनाटक किंवा **उदयनचरितनाटक** संविधानकांत ग्रथित केलें आहे; व **प्रियदर्शिकेस वासवदत्तेची** भूमिका देऊन **वत्सराजाकडून** तिचा गांधर्वविवाह करविला आहे.

यांत असलेल्या गर्भनाटकासंबंधानें दोन शब्द.

ह्या नाटिकेंत अंक ३ यांत गर्भनाटक आहे, तें मात्र निराळें आहे. **वत्सराज प्रद्योताचे** येथें बंदींत असतां त्यानें त्याची कन्या **वासवदत्ता** हीस गायनवादन शिकविलें व तिचें मन वेधून हरण केलें. ह्या मजकुराचें गर्भनाटक (उपनाटक) **कौमुदीमहोत्सवाचे** प्रसंगीं **वासवदत्ताराणीच्याच** करमणुकीकरितां तिच्याच संमतीनें करून दाखविण्यांत आलें. परंतु त्याचा उद्देश तसा नसून जवळच्या कांहीं मंडळीच्या मनांत **आरण्यके (प्रियदर्शिके**)चा व **वत्सराजाचा** गांधर्वविवाह करून देण्याचा होता व त्याप्रमाणें तो तडीस गेला आहे. हें गर्भनाटक वाचतांना बरीच मनोवेधकता वाटते.

यांत **रत्नावलीप्रमाणेंच वत्सराजाची प्रियदर्शिकेच्या** प्राप्तीची उत्कट इच्छा आहे व ती पूर्ण होण्याकरितां गर्भनाटक मध्यें करण्याचा हेतु आहे.

संस्कृत नाटकांत **उत्तररामचरितांतहि** उपनाटक आहे. यांत कवीनें **सीतेची** अनुकंपनीय व कष्टमय स्थिति **रामचंद्राच्या** दृष्टीस पाडली आहे

व ती त्यास पाहतांनां असह्य झाली आहे! **सीतात्यागाचें** अन्यायाचें वर्तन **रामचंद्र** व पौरजन यांच्या मनावर ठसविण्याकरितांच कवीनें तें रचलें आहे. **शेक्सपीयरच्या हॅम्लेट** नाटकांत उपनाटक आहे. आपल्या चुलत्याचें पापकृत्य उघड दाखविण्याकरितांच त्या उपनाटकाची योजना केली आहे. **उत्तररामचरितांतील** व **हॅम्लेटांतील** अशा दोन्ही उपनाटकांतील कृति नायकाच्या मनास झोंबून पश्चात्ताप वाटावयाकरितांच रचलेल्या आहेत. तसा प्रकार यांत नसून **वत्सराजानें वासवदत्तेचें** कसें हरण केलें, हें तिला दाखविण्याच्या मिषानें **आरण्यकेशीं** गांधर्वविवाह करण्याकरितां हें केलें आहे. **मनोरमेनें** घेतलेली आपली भूमिका पुढें राजानें स्वतःच घेऊन **प्रियदर्शिकेशीं** गांधर्वविवाह केला आहे, हा भाग यांत बरा साधला आहे. यांत शेवटीं अधिक फाजिलपणा झाल्यामुळें राणी रागावली आहे व सर्व प्रकार उघडकीस आला आहे.

ह्या चरित्रास अनुलक्षून **वत्सराजाच्या** संबंधानें प्रथमांकांत एक खुबीदार द्व्यर्थी पद्य आहे तें असें:—

" **घनबन्धनमुक्तोऽयं कन्याग्रहणात्परां तुलां प्राप्य।**
रविरधिगतस्वधामा प्रतपति खलु वत्सराज इव ॥ "

प्रियदर्शिकेंतील कांहीं गोष्टीविषयीं विचार व वर्णनस्थलांचे निर्देश.

" **व्यक्तिर्व्यञ्जनधातुना** " इ. हें **प्रियदर्शिकेच्या** तृतीयांकांतील १० वें पद्य व " **अंतःपुराणां विहितव्यवस्थः** " इ. हें त्याच अंकांतील ३ रें पद्य **नागानंदांत** नायकाच्या व कंचुकीच्या तोंडीं जसेंचें तसेंच आढळतें. यावरूनहि ह्या ग्रंथाच्या एककर्तृत्वास आणखी आधार सापडतो.

अमात्यरुमण्वान् वत्सराजाकडे जात असतां राजसेवकाच्या मनाची स्थिति कशी होते याचा अनुभव त्यानें वर्णिला आहे तो अगदीं यथार्थ आहे.

रुमण्वान्–(विचिन्त्य)

तत्क्षणमपि निष्क्रान्ताः कृतदोषा इव विनापि दोषेण ।
प्रविशन्ति शङ्कमाना राजकुलं प्रायशो भृत्याः ॥

राजसेवकाच्या मनाची स्थिति यांत चांगली दाखविली आहे.

वत्सराजानें विजयसेनास विंध्यकेतूबरोबर युद्धास पाठविलें असतां तो परत आल्यावर विंध्यकेतूच्या पराक्रमाचें वर्णन करतो आहे. पुढील वर्णनांत वीररस बराच आहे.

पादातं पत्तिरेव प्रथमतरमुरःपेषमात्रेण पिष्ट्वा
दूरान्नीत्वा शरौघैर्हरिणकुलमिव त्रस्तमश्वीयमाशाः ।
सर्वत्रोत्सृष्टसर्वप्रहरणनिवहस्तूर्णमुत्खाय खड्गं
पश्चात्कर्तुं प्रवृत्तः करिकरकदलीकाननच्छेदलीलाम् ॥
एवं बलत्रितयमाकुलमेक एव कुर्वन्कृपाणकिरणच्छुरितांसकूटः ।
शस्त्रप्रहारशतजर्झरितोरुवक्षाः श्रान्तश्चिराद्विनिहतो युधि विन्ध्यकेतुः॥

राजा–रुमण्वन् । सत्पुरुषोचितं मार्गमनुगच्छतो यत्सत्यं व्रीडिता एव वयं विन्ध्यकेतोर्मरणेन ।

यावरून ‘ शत्रोरपि गुणा ग्राह्याः ’ या उदात्त तत्वाचें प्रतिबिंब श्रीहर्षाच्या विचारांत व्यक्त झालें असल्याचें दिसतें !

अमात्यरुमण्वान् यानेंहि वत्सराजास अनुलक्षून असेंच पुढें ह्मटलें आहे.

रु०–देव । त्वद्विधानामेवं गुणैकपक्षपातिनां रिपोरपि गुणाः प्रीतिं जनयन्ति ।

विजयसेन वत्सराजास सांगतो आहे:–“ कृतकृपण-प्रलापा विन्ध्यकेतोर्वेश्मन्यभिजात्यानुरूपा कन्यका तद्दुहितेत्यस्माभिरानीता द्वारि तिष्ठति। तां प्रति देवः प्रमाणम् । ”

राजा—यशोधरे । गच्छ गच्छ । त्वमेव वासवदत्तायाः समर्पय । वक्तव्या च देवी । भगिनीबुद्ध्या त्वयैव सर्वदा द्रष्टव्या ।

गीतनृत्यवाद्यादिषु विशिष्टकन्यकोचितं सर्वं शिक्षयितव्या । यदा वरयोग्या भविष्यति तदा मां स्मारयेति ।

आपल्या घरीं चालत आलेली अभिनव वस्तू पाहिल्यावांचून मनुष्याच्यानें राहवत नाहीं, असें असून तिला न पाहतां राजा तीस परभारें राणीच्या हवालीं करण्यास सांगतो. हें मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध आहे असें वाटतें. त्यांतून त्याची तशीच साधुवृत्ति असती तर मग असो. परंतु तसें नसून त्याचें विलासी वर्तन असल्याचें वर्णन आहे.

प्रतीहारी--यद्देव आज्ञापयति । (इति निष्क्रान्ता ।)

(नेपथ्ये वैतालिकः ।)

लीलामज्जनमङ्गलोपकरणस्नानीयसंपादिनः
सर्वान्तःपुरवारविभ्रमवतीलोकस्य ते संप्रति ।
आयासस्खलदंशुकाव्यवहितच्छायावदातैः स्तनै-
रुत्क्षिप्तापरशातकुम्भकलशेवालंकृता स्नानभूः ॥

येथील हें स्नानभूचें वर्णन व कादंबरींतील तारापीडाच्या स्नानभूचें वर्णन यांत बरेंच सादृश्य आढळतें !

मध्यान्हकाळच्या सूर्यप्रखरतेमुळें घडून आलेल्या स्थितीचें वर्णनः—

राजा—(उर्ध्वमवलोक्य ।) अये । कथं नभोमध्यमध्यास्ते भगवान्सहस्रदीधितिः । संप्रति हि ।

आभात्यर्कांशुतापक्वथदिव शफरोद्वर्तनैर्दीर्घिकाम्भः
छत्राभं नृत्तलीलाशिथिलमपि शिखी बर्हभारं तनोति ।
छायाचक्रं तरूणां हरिणशिशुरुपैत्यालवालाम्बुलुब्धः
सद्यस्त्यक्त्वा कपोलं विशति मधुकरः कर्णपालीं गजस्य ॥

राजा उपवासानें कृश अशा आपल्या वासवदत्ता प्रियेचें वर्णन करितोः-

राजा—क्षामां मङ्गलमात्रमण्डनभृतं मन्दोद्यमालापिनी-
मापाण्डुच्छविना मुखेन विजितप्रातस्तनेन्दुद्युतिम् ।

सोत्कण्ठं नियमोपवासविधिना चेतो ममोत्कण्ठते
तां द्रष्टुं प्रथमानुरागजनितावस्थामिवाद्य प्रियाम् ॥

राजा आरण्यकेच्या अलौकिक स्वरूपाचें वर्णन करतोः—

पातालाद्भुवनावलोकनपरा किं नागकन्योत्थिता
मिथ्या तत्खलु दृष्टमेव हि मया तस्मिन्कुतोऽस्तीदृशी ।
मूर्ता स्यादिह कौमुदी न घटते तस्या दिवा दर्शनं
केयं हस्ततलस्थितेन कमलेनालोक्यते श्रीरिव ॥

राजा—अच्छिन्नामृतबिन्दुवृष्टिसदृशीं प्रीतिं ददत्यां दृशां
याताया विगलत्पयोधरपटाद्द्रष्टव्यतां कामपि ।
अस्याश्चन्द्रमसस्तनोरिव करस्पर्शास्पदत्वं गता-
नैते यन्मुकुलीभवन्ति सहसा पद्मास्तदेवाद्भुतम् ॥

आरण्यका व इंदीवरिका (सखी) यांचा संवादः--

चेटी—(कमलिनीपत्रग्रहणं नाटयन्ती ।) आरण्यके । अवचिनु त्वं पद्मानि । अहमप्येतस्मिन् नलिनीपत्रे शेफालिकाकुसुमान्यवचित्य देवीसकाशं गमिष्यामि ।

(चेटी गमनं नाटयति ।)

आर०—हला इन्दीवरिके । न शक्नोमि त्वया विनात्रासितुम् ।

चेटी–(विहस्य) यादृशमद्य मया देव्या मन्त्रितं श्रुतं तादृशेन चिरमेव मया विना त्वयासितव्यम् ।

आर०–(सविषादं) किं देव्या मन्त्रितम् ।

चेटी–एतत् । तदैषाहं वत्सराजेन भणिता,यथा यदैषा विन्ध्यकेतुदुहिता वरयोग्या भविष्यति तदाहं स्मारयितव्य इति । तत्सांप्रतं महाराजं स्मारयामि । येनास्या वरचिन्तापर्याकुलो भविष्यति ।

आर०--(सरोषं कर्णौ पिधाय ।) तद्गच्छ त्वम् । न त्वयासंबंधप्रलापिन्या प्रयोजनम् ।

आरण्यकेनें कानांवर हात ठेवून ' असंबद्धप्रलापिनी ' असें सखीस ह्मटलें आहे. यांत स्वारस्य कोणतें तें समजत नाहीं. शाकुंतलांत जसा प्रियवल्लभ संन्निध असल्यामुळें सख्यांच्या स्पष्टोक्तीवरून शकुंतलेस कोप दाखविणें ठीक दिसतें, तसें येथें दिसत नाहीं !

(शाकुंतलांत सख्यौ—उभयोराकारं विदित्वा । जनान्तिकम् । हला शकुंतले यद्यत्राद्य तातः संनिहितो भवेत् ।

शकुंतला–(सरोषं) ततः किं भवेत् ।

उभे–इमं जीवितसर्वस्वेनाप्यतिथिविशेषं कृतार्थं करिष्यति ।

शा. अं. प्र.

येथें शकुंतलेचा रोष प्रियजन समोर असल्यामुळें जसा शोभतो तसा आरण्यकेचा शोभत नाहीं !)

आरण्यका--(भ्रमरसंबाधं नाटयन्ती ।) हा धिक् हा धिक् । एते खल्वपरे परित्यज्य कमलिनीं नीलोत्पलवनानि समापतन्तौ निपुणतरं बाधमाना आयासयन्ति मां दुष्टमधुकराः। (उत्तरीयेण मुखं पिधाय सभयम्) हला इन्दीवरिके। परित्रायस्व मां परित्रायस्व माम्। एते दुष्टमधुकराः परिभविष्यन्ति।

विदूषकः--भो वयस्य। पूर्णास्ते मनोरथाः। यावदेव गर्भदास्याः सुता नागच्छति तावदेव त्वमपि तूष्णीको भूत्वोपसर्प। एषापि सलिलशब्दश्रुतेन पदसंचारेणेन्दीवरिकागच्छतीति ज्ञात्वा त्वामेवावलम्बिष्यते।

राजा—साधु वयस्य साधु । कालानुरूपमुपदिष्टम् । (इत्यारण्यकासमीपमुपसर्पति ।)

आरण्यका—(पदशब्दाकर्णनं नाटयन्ती ।) इन्दीवरिके । लघूपसर्प, लघूपसर्प । आकुलीकृतास्मि दुष्टमधुकरैः। (राजानमवलम्बते ।)

(राजा कण्ठे गृह्णाति । आरण्यकोत्तरीयं मुखादपनीय राजानमपश्यन्ती भ्रमरावलोकनं नाटयति ।)

याठिकाणीं तरुणपुरुषानें तरुणस्त्रीच्या गळ्यास मिठी मारली असतां तीस पुरुषस्पर्शापासून विकार होऊं नये व कळूं नये हें अस्वाभाविक दिसतें ! !

राजा—(स्वोत्तरीयेण भ्रमरान्निवारयन् ।)

अयि विसृज विषादं भीरु भृङ्गास्तवैते
परिमलरसलुब्धा वक्त्रपद्मे पतन्ति ।
विकिरसि यदि भूयस्त्रासलोलायताक्षी
कुवलयवनलक्ष्मीं तत्कुतस्त्वां त्यजन्ति ॥

आरण्यका—(राजानं दृष्ट्वा साध्वसं नाटयन्ती ।) कथं नैषेन्दीवरिका । (सभयं राजानं त्यक्त्वापसरन्ती ।) इन्दीवरिके । लघ्वागच्छ, लघ्वागच्छ । परित्रायस्व माम् ।

विदूषकः—भवति सकलपृथ्वीपरित्राणसमर्थेन वत्सराजेन परित्रायमाणा चेटीमिन्दीवरिकामाक्रन्दसि ।

(राजा " अयि विसृज " इत्यादि पुनः पठति ।)

आर०—(राजानमवलोक्य सस्पृहं सलज्जं चात्मगतम् ।) अयं खलु स महाराजो यस्याहं तातेन दत्ता । स्थाने खलु तातस्य पक्षपातः । (आकुलतां नाटयति ।)

चेटी—आयासिता खल्वारण्यका दुष्टमधुकरैः । तद्यावदुपसर्प्य समाश्वासयामि । आरण्यके । मा बिभिहि । एषोपगतास्मि ।

विदूषकः—(राजानं प्रति) भोः । अपसरापसर । एषा खल्विन्दीवरिकागता । तदेतं वृत्तान्तं प्रेक्ष्य देव्यै निवेदयिष्यति । (अंगुल्या निर्दिश्य ।) तदिदमेव कदलीगृहं प्रविश्य मुहूर्तं तिष्ठावः ।

(उभौ तथा कुरुतः ।)

चेटी-(इन्दीवरिका)-(उपसृत्य कपोलौ स्पृशन्ती ।) हञ्जे आरण्यके कमलसदृशस्य तव वदनस्यायं दोषो यन्मधुकरा एवमपराध्यन्ति । (हस्ते गृहीत्वा ।) तदेहि गच्छावः । परिणतो दिवसः ।

(गमनं नाटयतः ।)

आर०—(कदलीगृहाभिमुखमवलोक्य ।) हञ्जे इन्दीवरिके । अतिशिशिरतया सलिलस्योरुस्तम्भ इव समुत्पन्नः । तच्छनैः शनैर्गच्छावः ।

चेटी—तथा !

(इति निष्क्रान्ते ।)

विदूषकः—भोः । एहि निष्क्रमावः । तां गृहीत्वैषा दास्याः सुतेन्दीवरिका गता ।

(तथा कुरुतः ।)

राजा—(निःश्वस्य ।) **कथं गता । सखे वसन्तक । न खल्व-विघ्नमभिलषितमधन्यैः प्राप्यते ।** (विलोक्य ।) **सखे पश्य पश्य ।**

यांतील व **शाकुंतलां**तील भ्रमरबाधाकल्पना कांहीं सारखी असली तथापि **कविकुलगुरूंचें** वर्णनचातुर्य निराळें यांत कांहीं संशय नाहीं !

शाकुंतलांत-"शाकुंतला-(ससंभ्रमम्)**भ्रमरबाधां निरूपयति । सलिलसेकसंभ्रमोद्गतो नवमालिकामुज्झित्वा वदनं मे मधुकरोऽभि-वर्तते ।**

राजा—(विलोक्य सस्पृहम्)

चलापाङ्गां दृष्टिं स्पृशसि बहुशो वेपथुमतीं
रहस्याख्यायीव स्वनसि मृदु कर्णान्तिकचरः ।
करौ व्याधुन्वत्याः पिबसि रतिसर्वस्वमधरं
वयं तत्त्वान्वेषान्मधुकर हतास्त्वं खलु कृती ॥"

दोहींतील वर्णनचातुर्य मार्मिक वाचकांच्या लक्षांत येण्यासारखेंच आहे.

प्रियदर्शिकेंतील भ्रमर फार लोचट, अधीर व मर्यादेस सोडणारा असा आढळतो. **शाकुंतलां**तील भ्रमर अंगास जाऊन बिलगणारा इतका अधीर व अमर्यादशील वाटत नाहीं !

शाकुंतलांत-"हला परित्रायेथां । मामनेन दुर्विनीतेन दुष्ट-मधुकरेण अभिभूयमानां । उभे--(सस्मितम्) **के आवां परित्रातुं दुष्यन्तमाक्रन्द । राजरक्षितव्यानि तपोवनानि नाम"।**

प्रियदर्शिकेंत **विदूषकः-भवति सकलपृथ्वीपरित्राणसमर्थेन वत्सराजेन परित्रायमाणा चेटीमिंदीवरिकामाक्रन्दसि ।**

शाकुंतलांत-"अहो विघ्नवत्यः प्रार्थितार्थसिद्धयः"।

प्रियदर्शिकेंत–न खल्वविघ्नमभिलषितमधन्यैः प्राप्यते ।

शाकुंतलांत–“दर्भाङ्कुरेण चरणः क्षत इत्यकाण्डे
तन्वी स्थिता कतिचिदेव पदानि गत्वा ।
आसीद्विवृत्तवदना च विमोचयन्ती
शाखासु वल्कलमसक्तमपि द्रुमाणाम् ॥”

प्रियदर्शिकेंत–(उभे गमनं नाटयतः)

आर०–(कदलीगृहाभिमुखमवलोक्य) हञ्जे इन्दीवरिके अतिशिशिरतया सलिलस्योरुस्तभ इव समुत्पन्नः । तच्छनैः शनैर्गच्छावः ।

या ठिकाणीं **कालिदास** व **श्रीहर्ष** यांच्या कल्पना व विचार बरेच सारखे जुळतात. तथापि कोणी कोणाच्या कल्पना घेतल्या वगैरे, या संबंधानें आपला अभिप्राय देणें हें बरेंच धाडसाचें आहे. पुष्कळ भिन्न भिन्न कवींच्या कल्पना समानार्थक जमत असल्याचें यांत पुष्कळ ठिकाणीं आढळून येईल. **शाकुंतलां**त राजाकडे पाहत राहण्यास दर्भांकुर टोचल्याचें व झाडास वल्कल अडकल्याचें **शकुंतले**कडून निमित्त दाखविलें आहे. **प्रियदर्शिकें**त राजाकडे पाहत राहण्यास **प्रियदर्शिके**कडून शैत्यामुळें पाय ताठल्याचें निमित्त दाखविण्यांत आलें आहे. दोन्हीहि निमित्तें समर्पक आहेत !

आरण्यका व तिची सखी **मनोरमा** यांचा संवाद थोडक्यांत गमतीचा वाटल्यावरून खालीं दिला आहे:–

मनोरमा—यदि दृष्टा महाराजेन त्वं तदलं संतापितेन । स एवेदानीं दर्शनोपायपर्याकुलो भविष्यति ।

आरण्यका—अयं सखीजनः पक्षपातेन मन्त्रयते । अयि सखिपक्षपातिनि । देवीगुणनिगडनिबद्धे खलु तस्मिञ्जने कुत एतत् ।

मनो०—हला अपण्डिते । कमलिनीबद्धानुरागोऽपि मधुकरो

मालतीं प्रेक्ष्याभिनवरसास्वादलम्पटः कुतस्तामनासाद्य स्थितिं करोति।
यांतील दृष्टांत फारच समर्पक रीतीनें देण्यांत आलेला आहे.

नाटकगृहाचें वर्णनः—

साङ्कृत्यायनी–(विलोक्य ।) अहो प्रेक्षणीयता प्रेक्षागृहस्य ।

आभाति रत्नशतशोभितशातकुम्भ-
स्तम्भावसक्तपृथुमौक्तिकदामरम्यम् ।
अध्यासितं युवतिभिर्विजिताप्सरोभिः
प्रेक्षागृहं सुरविमानसमानमेतत् ॥

गर्भनाटकांतील चित्तवेधक भागः—

राजा—(प्रविश्य पटाक्षेपेण सहर्षं वस्त्रान्ते ग्रथितं बध्नाति ।) एवमेतत् । कः संदेहः ।

सपरिजनं प्रद्योतं विस्मयमुपनीय वादयन्वीणाम् ।
वासवदत्तामपहरामि न चिरादेव पश्याहम् ॥

यतः सुसंनिहितं सर्वं यौगन्धरायणेन ।

वासवदत्ता—(सहसोत्थाय ।) जयतु जयत्वार्यपुत्रः ।

राजा—(स्वगतम् ।) कथं प्रत्यभिज्ञातोऽस्मि देव्या ।

साङ्कृत्यायनी—(सस्मितम् ।) राजपुत्रि । अलमलं संभ्रमेण। प्रेक्षणीयकमेतत् ।

राजा—(आत्मगतं सहर्षम् ।) इदानीमुच्छ्वासितोऽस्मि ।

वास०—(सविलक्षस्मितमुपविश्य ।) कथं मनोरमैषा । मया पुनर्ज्ञातमार्यपुत्र एष इति । साधु मनोरमे साधु । शोभनं नर्तितम् ।

साङ्कृ०—राजपुत्रि । स्थान एव कृता भ्रान्तिस्ते मनोरमया। पश्य ।

रूपं तन्नयनोत्सवास्पदमिदं वेषः स एवोज्ज्वलः
सा मत्तद्विरदोचिता गतिरियं तत्सत्त्वमत्यूर्जितम् ।

लीला सैव स एव सान्द्रजलदह्रादानुकारी स्वरः
साक्षाद्दर्शित एष नः कुशलया वत्सेश एवानया ॥

राजा—(आरण्यकाया हस्तं गृहीत्वा ।)

सद्योऽवश्यायबिन्दुव्यतिकरशिशिरः किं भवेत्पद्मकोशो
हादित्वं नास्य मन्ये सदृशमिदमुषस्येव वीतातपस्य ।
मुञ्चन्त्येते हिमौघं नखरजनिकराः पद्म किं सोऽपि दाही
ज्ञातं स्वेदापदेशादविरतममृतं स्यन्दते व्यक्तमेतत् ॥

अपि च ।

एतेन बालविद्रुमपल्लवशोभापहारदक्षेण ।
हृदये मम त्वयायं न्यस्तो रागः स्वहस्तेन ॥

आरण्यका—(स्पर्शविशेषं नाटयन्ती ।) हा धिक् हा धिक् । एतां मनोरमां स्पृशन्त्या अनर्थमेव मेऽङ्गानि कुर्वन्ति ।

राजानें आरण्यकेचा हात धरल्यावर तीस ही मनोरमाच (स्त्री) आहे असें माहीत असून सुद्धां पुरुषस्पर्शामुळें निराळे विकार भासले व असे विकार भासणें स्वाभाविकच आहे! परंतु मागें राजानें आरण्यकेच्या गळच्यांत मिठी मारल्यावर देखील तिला पुरुषस्पर्श कळूं नये हें चमत्कारिक आहे !

वासवदत्ता—(सरोषं हसन्ती ।) साधु मनोरमे साधु । शोभनं त्वया नर्तितम् ।

मनोरमा—(सभयं कम्पमाना पादयोर्निपत्य ।) भट्टिनि । न खल्वहमत्रापराध्यामि । एतेन खलु हताशेन बलादलंकारान्गृहीत्वा द्वारस्थितेनेह निरुद्धा । न पुनर्ममाक्रन्दन्त्याः शब्दो मूर्खनिर्घोषान्तरितः केनापि श्रुतः ।

वासवदत्ता—हञ्जे उत्तिष्ठ । ज्ञातं सर्वम् । वसन्तकः खल्वारण्यकावृत्तान्तनाटके सूत्रधारः ।

विदूषकः—स्वयमेव चिन्तय । कुत्रारण्यका कुत्र वसन्तक इति ।

वासवदत्ता—मनोरमे। सुगृहीतं कृत्वैनमागच्छ तावत्प्रेक्षणीयमस्य पश्यामि ।

मनोरमा—(स्वगतम्) इदानीं समाश्वसितास्मि । (प्रकाशम् । विदूषकं करे बध्नाति ।) हताश । इदानीमनुभवात्मनो दुर्नयस्य फलम् ।

यांत **मनोरमेनें** राणीस सांगितलें कीं विदूषकानें मजजवळून अलंकार हिसकून घेतले व मला येथें आडवून धरलें. ह्या मूर्खाच्या ओरडण्यापुढें माझें ओरडणें कोणास ऐकूं गेलें नाहीं. हें **मनोरमेनें** राणीस खोटें सांगितलें. कारण **मनोरमेनेंच** राजाच्या सोंगाच्या बतावणीचीं भूषणें त्याला दिलीं व तीं त्यानें अंगावर घालून तो आपल्या सोंगाची बतावणी करण्यास रंगभूमीवर गेला. असें **मनोरमेच्या** भाषणांतच स्पष्ट आहे; असें असून ही दासी विदूषकावर उलटली, इतकेंच नव्हे तर विदूषकाचे हात बांधून " हताश, इदानीमनुभवात्मनो दुर्नयस्य फलम् " । असेंहि त्यास ह्मणाली. तेव्हां ही मोठी लबाड होती असें दिसतें !

मनोरमा--भर्तः सत्यमेव मण्डयैतैराभरणैरात्मानम् । (इत्याभरणान्यङ्गादवतार्य राज्ञे समर्पयति । राजा परिदधाति ।)

याठिकाणीं विदूषकानें राजास पुढील वाक्यांत टोलाहि दिला आहे. व तो यथायोग्य आहे.

विदूषकः--एते खलु राजानो दास्यापि एवं नर्त्यन्ते । अहो कार्यस्य गुरुता ।

मनोरमेचें भाषण राणीस खरें वाटून तिनें विदूषकास बांधून आणण्यास सांगितलें; परंतु विदूषकानें तरी आपल्यावर कुभांड रचलेलें कां सहन केलें तें समजत नाहीं. त्यालाहि असें खोटें सांगून उडवाउडवी करतां आली असती व त्याचा पक्षहि खरा होता! मग त्यानें कां तसें केलें नाहीं तें समजत नाहीं !

रागावलेल्या **वासवदत्तेचें** वर्णनः--

स्निग्धं यद्यपि वीक्षितं नयनयोस्ताम्रा तथापि द्युति--
र्माधुर्येऽपि सति स्खलत्यनुपदं ते गद्गदा वागियम् ।
निश्वासा नियता अपि स्तनभरोत्कम्पेन संलक्षिताः
कोपस्ते प्रकटप्रयत्नविधृतोऽप्येष स्फुटं लक्ष्यते ॥

रत्नावलींतहि रागावलेल्या **वासवदत्तेचें** असेंच प्रायः वर्णन आहे.

(पहा र. अं. २. प. १९)

विषप्राशनानें **आरण्यकेची** अपरिहार्य अवस्था पाहून इचा लाभ आपल्याला होत नाहीं असें समजून राजा दुःखानें ह्मणतो आहेः-

संजातसान्द्रमकरन्दरसां क्रमेण
पातुं गतश्च कलिकां कमलस्य भृङ्गः ।
दग्धा निपत्य सहसैव हिमेन चैषा
वामे विधौ न हि फलन्त्यभिवाञ्छितानि ॥

आरण्यकेस विषवेग मात्र आहे, बाकी विषाचे सर्व परिणाम मजवरच घडत आहेत असें राजा वर्णन करतो आहे.

एषा मीलयतीदमीक्षणयुगं जाता ममान्धा दिशः
कण्ठोऽस्याः प्रतिरुध्यते मम गिरो निर्यान्ति कृच्छ्रादिमाः ।
एतस्याः श्वसितं हृतं मम तनुर्निश्चेष्टतामागता
मन्येऽस्या विषवेग एव हि परं सर्वं तु दुःखं मम ॥

हा शेवटचा विनोदरूपी संवाद गमतीचा असल्यावरून पुढें दिला आहेः-

विदूषकः--भवति । त्वं भगिनीं गृहीत्वा कण्ठ एवं परितुष्टासि । वैद्यस्य पारितोषिकं विस्मृतम् ।

वासवदत्ता--वसन्तक । न विस्मृतम् ।

विदूषकः--(राजानं निर्दिश्य सस्मितम् ।) **वैद्य । प्रसारय हस्तम् । भगिन्या अग्रहस्तं ते पारितोषिकं दापयिष्यामि ।**

(राजा हस्तं प्रसारयति ।)

(वासवदत्ता प्रियदर्शिकाहस्तमर्पयति ।)

राजा—(हस्तमुपसंहृत्य ।) **किमनया । संप्रत्येव कथमपि प्रसादितासि ।**

वासवदत्ता—कस्त्वमग्रहीतुम् । प्रथमेव तातेनेयं दत्ता । म

विदूषकः—भोः । माननीया खलु देवी । मास्याः प्रतिकूलं कुरु ।

(वासवदत्ता राज्ञो हस्तं बलादाकृष्य प्रियदर्शिकामर्पयति ।)

राजा—(सस्मितम् ।) **देवी प्रभवति । कुतोऽस्माकमन्यथा कर्तुं विभवः ।**

जसें कांहीं राणीकरितांच राजास **आरण्यके**चा स्वीकार करणें भाग पडलें आहे !

त्या काळच्या चालीरीती इ०

शिवदेवतेचें वर्णन आहे.

नियमोपवासव्रतेंहि होतीं.

एकाएकीं जाऊन शत्रूवर छापा घालण्याची चाल होती.

नायिकेच्या वर्णनांत '**उत्तरीयेण मुखं पिधाय**' व नायकाच्या वर्णनांत '**स्वोत्तरीयेण भ्रमरान्निवारयन्**' असें असल्यामुळें हातांत रुमाल बाळगण्याची चाल होती असें दिसतें.

राजाच्या येथें कन्यकांस नृत्यगायन शिकविण्याची चाल होती.

वत्सराजानेंच पाणी घेऊन नायिकेचें विष उतरल्याचें वर्णन यांतच आहे. यावरून मंत्रसिद्धीवर भरवसा व त्याचा अनुभव होता असें दिसतें.

शत्रूच्या देखील अनाथ मुलावर प्रसाद (कृपा) करण्याची चाल होती.

वसंतोत्सव करण्याची चाल होती.

नाटकगृहाचें वर्णन आहे-यावरून स्वतंत्र नाटकगृहें बांधलेलीं असत, असें दिसतें.

स्त्रिया पुरुषाचें सोंग घेत असत, असें यांतच **मनोरमेनें** राजाचें सोंग घेतलें होतें यावरून उघड होतें.

दोन्ही नाटिकांत अनेक गोष्टींचें सादृश्य.

रत्नावलींतील पात्रांचीं व **प्रियदर्शिकेंतील** पात्रांचीं नांवें प्रायः तींच आहेत. दोहींतील नांदीचीं प्रथम पद्यें–**शिव** व **पार्वती**–यांच्या संबंधानें वर्णिलेलीं आहेत. **बाणानेंहि** हर्षराजा हा **शिवभक्त** असल्याचेंच पुष्कळ ठिकाणीं वर्णिलें आहे. दोन्ही नाटकांचा प्रयोग **वसंतोत्सवांतच** केला असल्याचें वर्णन आहे. **'श्रीहर्षो निपुणः कविः'** हें पद्यहि दोहींत सारखेंच आहे. **श्रीहर्षानें** राजे जिंकल्यावर **वसंतोत्सवासाठीं** आलेल्या मांडलिक राजांच्या कर्मणुकीकरितां रचलेल्या नाटिकांचे प्रयोग करून त्यांस रंजविलें असावें असें वाटतें. **रत्नावलींत 'द्वीपादन्यस्मादपि'** ह्या दैवचरित्रापासून सुरुवात आहे. **प्रियदर्शिकेंत**–

" राज्ञो विपद्बन्धुवियोगदुःखं देशच्युतिर्दुर्गममार्गखेदः ।
आस्वाद्यतेऽस्याः कटुनिष्फलायाः फलं मयैतच्चिरजीवितायाः ॥ "

यांतहि दैवचरित्र आहे परंतु तें आर्थिक आहे. **प्रियदर्शिकेंतील** पद्यांत दैवाची तितकी स्पष्टोक्ति नाहीं. परंतु ह्या पद्यापुढें कंचुकीचें भाषण आहे, त्यांत **"कथमेकान्तनिष्ठुरमीदृशं च दैवमस्मासु"** असें दैवास अनुलक्षून आहेच.

रत्नावली (सागरिका) व **प्रियदर्शिका (आरण्यका)** ह्या दोन्ही नाटिकांतील मुख्य राणी **वासवदत्ता** इच्या बहिणीच (चुलत व मावस-बहिण) असल्याचें वर्णन आहे. व त्या **वत्सराजासच** देऊं केलेल्या होत्या, परंतु **वासवदत्ताराणीस** हें माहित नसल्यामुळें तिच्या हातूनच त्यांचे प्रथम हाल झाले आहेत. नंतर तिजकडूनच त्या दोघी सुखी झाल्या आहेत. थोर राजांच्या मुलींची पहिल्यापासून अशी सारखी दुःस्थिती कशी असावी! **रत्नावलीस सिंहलेश्वरानें** आपल्या अमात्याबरोबरच **वत्स-राजाकडे** पाठविलें. **वत्सराजाबरोबर** जर तिचें लग्न व्हावयाचें तर कांहींतरी

आप्तमंडळी तिच्याबरोबर असावयास नको काय? दोहींतहि युद्धप्रसंग आहेत. दोहींतहि आपल्या सरदारांनीं शत्रूंचा पराभव केला आहे तरी **वत्सराज** शत्रूंच्याच पराक्रमाची वाहवा करतो आहे. यावरून मुख्य नाटकांत उदात्ततत्वें असल्याबद्दल दर्शविलें आहे. दोहींतहि **वासवदत्ते**कडून विदूषकास वायनदान दिल्याचें वर्णन आहे. दोहींतहि राजानें मुख्य नायिकांच्या समजावण्या केलेल्या आहेत. दोहींतहि बागेंतील वृक्षांचीं वर्णनें आहेत. **रत्नावली** व **प्रियदर्शिका** ह्या दोघींनीं आपला जन्मवंश उघड केला नाहीं. दोहींतहि **सागरिका** व **आरण्यका** यांच्या ह्मणण्यांत 'तातानें ज्याला देऊं केलें तोच हा **वत्सराज**' असें आहे. **रत्नावलीं**त भाटाच्या तोंडावाटे '**उदयन-स्येंदोः**' असें **सागरिकेनें** ऐकून हाच तो **उदयन—वत्सराज** असें ह्मटलें आहे, परंतु **प्रियदर्शिकें**त राजास पाहिल्यावर "**अयं खलु स महाराजो यस्याहं तातेन दत्ता**" असें **आरण्यकेनें** ह्मटलें आहे. यावरून जसा काय तो तिच्या ओळखीचाच असल्याबद्दल लक्षांत येतें. परंतु तो ओळखीचा असल्याचें ह्यांत कोठेंहि दिग्दर्शन नाहीं. दोहींत विरहावस्थेचें वर्णन आहे. अशा अनेक गोष्टींवरून दोहींतील बरेंच सादृश्य जुळून आल्यासारखें दिसतें. **सागरिका** व **आरण्यका** ह्या दोन्ही नायिकांसहि संकटप्रकार सारखेच आहेत. एकीवर आगींत सांपडल्याचा व दुसरीवर विषप्राशनाचा! दोहींचीहि मुक्तता **वत्सराजाकडून**च झालेली आहे. दोन्ही नाटिकांत **वासवदत्ता-**राणीकडूनच **रत्नावली** व **प्रियदर्शिका** यांस **वत्सराजा**सच अर्पण करण्यांत आल्या आहेत. दोन्ही नाटिकांतील **वत्सराज** व **वासवदत्ता** हे भिन्न भिन्न असावे किंवा एकच असावे हें निश्चितपणें सांगतां येणें कठीण आहे. **बृहत्कथेचें** संस्कृत (संक्षिप्त) भाषांतर **कथासरित्सागर** यांत **वत्सराज** व **वासवदत्ता** यांच्या संबंधानें अनेक कथा आहेत, त्यांचाच आधार ह्या नाटिकांत घेतला असावा असें वाटतें.

नागानंद.

नागानंदांतील संक्षिप्त गोष्ट.-प्रत्येक अंकासंबंधानें थोडक्यांत विवेचन.-कांहीं चित्तवेधक स्थलनिर्देश.-त्या काळच्या चालीरीती इ०

नागानंदांतील संक्षिप्त गोष्ट.

नागानंद हें **श्रीहर्षा**च्या दोन्ही नाटकांपेक्षां निराळ्या तऱ्हेचें नाटक आहे. या तऱ्हेचें नाटक संस्कृत वाङ्मयांत हेंच असल्यानें याची योग्यता बरीच समजली पाहिजे. यांतील विचार **बौद्ध**मतास अनुसरून आहेत व त्यांचीं चित्रें वाचकांच्या मनावर यथायोग्य वठविण्याचा ग्रंथकारानें प्रयत्न केला आहे, तो चांगला साधला आहे. यास **बृहत्कथें**तील आधार घेतला आहे. (**कथासरित्सागर** तरंग २२ यांत मूल कथानक आहे.) **विनता** व **कद्रू** आणि नाग व गरुड यांच्या वैराचा परिणाम यांत आढळून येतो. **विद्याधरजीमूतकेतु** यास **जीमूतवाहन** नांवाचा मुलगा होता. तो आपल्या पित्याच्या मर्जीस्तव कांहीं काळ गादीवर बसला. त्याला राज्यसौख्यापेक्षां आपल्या आईबापांची सेवा करून पुत्रधर्म पाळणें व परोपकार करणें हें अधिक श्रेयस्कर वाटलें. **जीमूतकेतूला** आपलें पूर्वीचें स्थान बदलणें भाग पडलें, त्यामुळें त्यानें आपल्या पुत्रास **मलय**-पर्वतावर दुसरें सुस्थळ पाहण्यास सांगितलें. त्याप्रमाणें **जीमूतवाहनानें** आपला राज्यकारभार मंत्र्यावर सोपवून तो **हिमालय**पर्वतावर आपल्या पितरांची सेवा करण्याकरितां जाऊन राहिला. त्या ठिकाणीं आपल्या सोबत्यासह तेथील वनसौंदर्य पाहत असतांना देवीच्या देवालयांतून स्त्रीच्या गायनाचा ध्वनि त्याचे कानीं पडला. त्या ठिकाणीं ह्या नाटकांतील नायिका **सिद्धराजकन्या मलयवती** व **जीमूतवाहन** यांची दृष्टादृष्ट झाली व एकमेकांचें सौंदर्य पाहून तीं दोघेंहि प्रेमबद्ध झालीं. परंतु नंतर **मलयवती**च्या बापाकडून तिला बोलावणें येऊन ती तेथून गेल्यामुळें दोघांची तुटातूट झाली. त्यामुळें दोघांना विरहदुःख अनुभवावें लागलें. पुढें

जीमूतवाहनास स्वप्नांत चंदनलतागृहांतील शिलातलावर बसून आपली प्रिया प्रणयकोपानें आपली निंदा करीत व रडत असल्याचें दिसलें ! यामुळें तो मित्रासह विनोदार्थ तेथें जाऊन तिचें वर्णन करीत बसला. नायिका जवळच आलेली होती. तिला वाटलें, हा दुसऱ्या प्रणयिनीवर आसक्त असून तिचेंच वर्णन करतो आहे व त्यामुळें ती निराश झाली. **जीमूतवाहनाला मलयवती** तेथें आहे हें माहीत नसून तो आपल्या प्रणयिनीचें चित्र काढून मनाची करमणूक करून घेत होता. हें **मलयवतीनें** पाहून हें कोणातरी दुसऱ्या हृदय-वल्लभेचें चित्र काढून हा आपलें मनोरंजन करीत आहे, असें वाटून ती फार निराश झाली. इकडे **मलयवती**चा बाप **विश्वावसु** यानें **जीमूतवाहना**ला आपली मुलगी देण्याचा निश्चय करून त्याजकडे निरोप पाठविला. परंतु **जीमूतवाहनास मलयवती** व आपली प्रणयिनी एकच, हें माहीत नसल्यामुळें त्यानें ती गोष्ट नाकारली, त्यामुळें **मलयवती** अगदींच निराश होऊन ती आपला प्राणत्याग करण्यास सिद्ध झाली. तिनें आपल्या गळ्याला फास लावला, तेव्हां तिची दासी ओरडून मोठ्यानें हाका मारूं लागली, त्यावेळीं तिच्या मदतीकरितां जवळ असलेल्या **जीमूतवाहनानें** येऊन तिचें निवारण केलें. तेव्हां दोघांनीं एकमेकांस ओळखिलें. इतक्यांत **जीमूतवाहना**च्या बापानें-हि **मलयवती**स आपल्याला सून करण्याचें कबूल केलें असल्याचें समजलें. मग मोठ्या समारंभानें दोघांचें लग्न झालें. पुढें **जीमूतवाहनाचें** राज्य शत्रु **मतंग** यानें स्वारी करून घेतलें, अशी वार्ता आली. तेव्हां **मित्रावसूनें** **जीमूतवाहनाला मतंगा**वर स्वारी करून त्याला शासन करतों असें सांगितलें. परंतु युद्धांत कत्तल करून रक्तपात करणें हें त्यास ठीक वाटलें नाहीं. राज्यप्राप्तीच्या बाबतींत उदासीन राहून व शांतवृत्तीनें आपल्या आईबापांची सेवा करून त्यानें तपोवनांतील आयुष्यक्रमच पसंत केला. त्यास परोपकाराची अत्यंत हौस असल्यामुळें तशा प्रसंगाची तो नेहमीं वाट पाहात असे.

एके वेळीं **मित्रावसू**बरोबर **जीमूतवाहन** हा **मलय**पर्वतावर उभा असतां गरुडानें मारलेल्या नागांच्या अस्थिसमुहाकडे त्याचें लक्ष गेलें. त्या योगानें त्याच्या मनाला फार दुःख वाटलें, आणि कोणत्या उपायानें आपणाला या निर्दय गरुडापासून सर्पजातीची सुटका करितां येईल, याविषयीं तो विचार करूं लागला. मग **मित्रावसू**पासून त्याला असें समजलें कीं, आपल्या जातीचा समूळ नाश न व्हावा ह्मणून **वासुकीनें** गरुडाला भक्षणार्थ रोज एक एक सर्प देत जावा असा ठराव केला आहे. मग **जीमूतवाहनानें** आपल्या मनांत असा विचार केला कीं, आपल्याला एका नागाचा तरी प्राण वाचवितां येईल तर तो वाचवून आपल्या देहाचें सार्थक्य करावें. त्यादिवशीं **शंखचूड** नांवाच्या नागाची गरुडाच्या भक्ष्यस्थानीं जाण्याची पाळी होती, तीप्रमाणें तो त्या ठिकाणीं चालला होता व त्याची आई शोक करीत त्याच्या मागून चालली होती. त्यावेळीं **मित्रावसु** घरीं गेला असल्यामुळें त्या ठिकाणीं **जीमूतवाहन** एकटाच उभा होता, त्याच्या दृष्टीस तो देखावा पडला ! **शंखचूडनाग** चालला आहे व त्याचे मागून त्याची आई शोक करीत चालली आहे, असें **जीमूतवाहना**च्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्यानें जवळ जाऊन तिचें शांतवन केलें. पुढें **शंखचूड** व त्याची आई **गोकर्णमहादेवा**च्या दर्शनास गेलीं. इतक्यांत सासुरवाडीहून तांबडा पोशाक आला होता, तो वध्यचिन्हासारखा आरक्त असल्यामुळें **जीमूतवाहन** यानें आपलें अंग झाकून घेऊन शिळेवर जाऊन बसला. नेहमींप्रमाणें गरुड येऊन व तें आपले भक्ष्य समजून तो त्यास घेऊन चालला असतां दुसऱ्याच्या प्राणरक्षणाकरितां आपल्याला मरण येत आहे ह्मणून **जीमूतवाहन** सानंद वृत्तींत राहिला. इकडे **जीमूतवाहन** आला नाहीं व दुश्चिन्हेंहि दृष्टीस पडलीं, त्यामुळें **जीमूतवाहना**च्या घरची मंडळी चिंताक्रांत झाली. व कांहीं तरी मोठें अरिष्ट आलें असावें असें त्यांस वाटलें. पुढें **जीमूतवाहना**च्या मस्तकांतील रक्तानें भरलेला मणि त्याच्या मातापितरांच्या पुढें पडला, त्यामुळें त्यांच्या अंतःकरणांत भीति व शंका उत्पन्न झाली.

शंखचूडनागहि मागून धावत त्या ठिकाणीं आला. त्याजकडून सर्व वर्तमान समजलें. तेव्हां ते सर्वजण फारच दुःखित होऊन शोक करूं लागले. मग त्या सर्वांनीं आपल्या जीवित-त्यागाचा निश्चय केला. नंतर **शंखचूडानें** गरुडाच्या मागें धावत जाऊन 'मला मारावयाचें तें तूं भलत्यालाच धरून मारिलेंस!' असें ह्मटलें. यावरून गरुडालाहि शंका उत्पन्न झाली व आपण साधुपुरुषास मारलें आणि त्यामुळें आपल्याला मोठें पाप घडलें ह्मणून त्यालाहि फार वाईट वाटलें. गरुडानें त्याची साधुवृत्ति पाहून आपण हा प्रत्यक्ष **बोधिसत्व** (ईश्वरावतार)च मारला, असें म्हणून गरुडानें **जीमूत-वाहनाला** सोडून दिलें, व या पापाला मरणाखेरीज दुसरें प्रायश्चित्त नाहीं, ह्मणून **जीमूतवाहनाच्या** मातापितरांनीं आपली चिता पेटविण्यास अग्नि आणिला होता, त्यानें आपणास दग्ध करून घेण्याचा त्यानें निश्चय केला. इतक्यांत **जीमूतवाहन** सावध झाला, असें पाहून गरुडानें त्याची क्षमा मागितली. **जीमूतवाहनानें**हि गरुडास हिंसा करण्यापासून परावृत्त होण्यास उपदेश केला व त्यानें त्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें. गरुडानें त्याचें सर्वांग चोंचीनें व नखांनीं तोडल्यामुळें **जीमूतवाहन** शेवटीं अगदीं आसन्न-मरण झाला. त्यामुळें सर्व निराश होऊन शोक करूं लागले. तें पाहून गरुडाला अत्यंत पश्चात्ताप झाला. पुढें तो **इंद्रा**कडे गेला व त्यानें त्यास अमृत-वृष्टि करण्यास सांगितलें. **मलयवतीनें**हि **गौरी**ची प्रार्थना केली व तिनें प्रकट होऊन तिला अभय दिलें. इतक्यांत अमृत-वृष्टि होऊन **जीमूतवाहनाचें** पुनरुज्जीवन झालें. त्यामुळें सर्वांस आनंद झाला. अमृत-वृष्टीनें सर्व सर्प जिवंत झाले व पुढें सर्व आनंदांत निमग्न राहिले. ह्या कथाभागाच्या आधारावर हें नाटक रचिलें आहे.

नागानंदांतील प्रत्येक अंकासंबंधानें थोडक्यांत विवेचन.

नागानंदांत-सूत्रधारः 'अलमतिविस्तरेण। अद्याहं वसंतोत्सवे।'

याच्या जागीं ' **अद्याहमिन्द्रोत्सवे** ' असें आहे. ' **विद्याधरजातके प्रतिनिबद्धं नागानंदनामकं नाटकं कृतं** ' असाहि सूत्रधाराच्या ह्मणण्यांत फरक आहे. ' **श्रीहर्षो निपुणः कविः** ' ह्या पद्यांत ' **वत्सराजचरितं-** ' च्या जागीं ' **बोधिसत्वचरितं** ' एवढाच फरक आहे. यांवरून व दुसऱ्याहि अनेक गोष्टींत तिन्ही ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं सारखींच वर्णनें व

---

१ हा **इन्द्रोत्सव** केव्हां होतो या विषयीं येथें स्पष्टता नाहीं. **भागवतांत नंदादिक** गोप **इन्द्रोत्सव** करीत असत, परंतु **श्रीकृष्णानें इंद्राचा** गर्व हरण करण्याकरितां तो निषिद्ध करून पर्जन्यवृष्टीकरितां **गोवर्धनोत्सव** सुरू केला व त्यामुळें आति पर्जन्य पडला असें वर्णन आहे. तेव्हां पर्जन्यकालापूर्वी **इन्द्रोत्सव** करण्यांत येत असावा असें वाटतें.

दुसरीकडे निराळया तऱ्हेचें या उत्सावाचें वर्णन आहेः—

या उत्सवाच्या आरंभीं ह्मणजे भाद्रपद (**शुद्ध**) अष्टमीच्या दिवशीं लोक अरण्यामध्यें जात असत आणि एक भलामोठा वृक्ष तोडून नगरामध्यें मोठ्या समारंभानें आणून त्याचा एक स्तंभ उभारीत. या स्तंभाला इंद्र असें ह्मणत असत. (**काव्यप्रकाश–२–**पद्य–'**इन्द्रार्थो स्थाणुरिन्द्रः**') हा भाद्रपद शुद्ध द्वादशीच्या दिवशीं तो फिरून अरण्यामध्यें नेऊन गुप्तरीतीनें टाकीत असत. प्राचीन हिंदुराज्यांचा लय झाल्यावर हा उत्सव करण्याची चाल बंद पडली असावी असें वाटतें. **बृहत्कथा** आणि **कालिकापुराण** या ग्रंथांत **शक्रध्वजोत्थापनाचें** (ह्मणजे **इंद्राच्या** सन्मानार्थ स्तंभ उभा करण्याचें) वर्णन सापडतें.

" **उत्थापयेत्तु रवैः सर्वलोकस्य वै पुरः ।**
रहो विसर्जयेत् केतुं विशेषोऽयं प्रपूजने ॥ " कालिकापुराण.

या महोत्सवाविषयीं जास्त माहिती पाहिजे असल्यास **वराहमिहिराच्या बृहत्कथेंत** ४३ प्र० त पहा.

मृच्छकटिकांतहि **इन्द्र**महोत्सवाचा उल्लेख आहे. विदूषक ५।चव्या अंका।त चेटास ह्मणतो आहेः—

'**अरे त्वमपीदानीमिन्द्रमहकामुक इव सुष्टु किं काकायसे का केति।**'

तसेंच अंक १० यांत चांडाल ह्मणतातः—

" **इन्द्रः प्रवाह्यमाणो गोप्रसवः संक्रमश्च ताराणाम्।**
सुपुरुषप्राणविपत्तिश्चत्वार इमे न द्रष्टव्याः ॥ "

असें आहे.

कल्पना आहेत, यांवरून तिहींचा कर्ता **श्रीहर्ष** असें निःसंशय लक्षांत येण्यासारखें आहे.

रत्नावली व **नागानंद** ह्या दोहींतहि नायिकांनीं अशोकवृक्षाखालीं गळफास घालण्याचे प्रयत्न केले आहेत. दोहींतहि चित्रपट कदलीपत्रानें झाकल्याचें वर्णन आहे. दोन्ही नायिकांचें–हृदय व मदन–यांस उद्देशून सारख्याच विचाराचें भाषण आहे. तिहींतहि नायिकेच्या शून्य हृदयत्वाचें वर्णन आहे. यांवरून आणि '**अंतःपुराणां विहितव्यवस्था**' इ० हें व '**व्यक्तिर्व्यञ्जनधातुना**' इ० हीं **प्रियदर्शिके**तील पद्यें **नागानंदां**तहि जशीचीं तशींच असल्यावरून व इतर अनेक ठिकाणचीं वर्णनें व कल्पनासादृश्यें यांवरून तिहींचा कर्ता एक असल्याबद्दल कोणाचीहि खात्री झाल्यावाचून राहणार नाहीं.

प्रथमांकांत नायक जीवित, तारुण्य व राज्य यांविषयीं अनादर व अनासक्ति दाखवितो. त्याचा मित्र विदूषक हा त्यास जिवंत असून मृतासारख्या आपल्या मातापितराकरितां कां उगीच दुःख भोगतोस. आतां गुरुसेवा पुरे झाली, तर अनेक सुखें देणाऱ्या अशा राज्योपभोगाचा उपभोग घे, म्हणून सांगतो. नायक राज्यसुखापेक्षां मातृपितृसेवेंतच परम सुख असल्याचें त्यास सांगतो. विदूषक नायकास म्हणतोः–'मित्रा, तुझीं आणखीहि अनेक कर्तव्यें राहिलीं आहेत.' 'जें करावयाचें तें केलें आहे' असें नायक त्यास म्हणतो.

न्यांय्ये वर्त्मनि योजिताः प्रकृतयः सन्तः सुखं स्थापिता
नीतो बन्धुजनस्तथात्मसमतां राज्ये च रक्षा कृता ।
दत्तो दत्तमनोरथाधिकफलः कल्पद्रुमोऽप्यर्थिने
किं कर्तव्यमतःपरं कथय वा यत्ते स्थितं चेतसि ॥

---

१ **रत्नावलीं**तहि अशाच अर्थाचें पद्य आहेः—

"**राज्यं निर्जितशत्रु योग्यसचिवे न्यस्तः समस्तो भरः ।**
सम्यक्पालनलालिताः प्रशमिताशेषोपसर्गाः प्रजाः" ॥ इ०

यांत **श्रीहर्षानें** स्वानुभवच घातला आहे असें वाटतें. नंतर विदूषक ह्मणतोः–'प्रधान, अमात्य नेमून तूं राज्याचा बंदोबस्त जरी ठेवला आहेस तरी तुझा प्रबळ शत्रु **मतंग** केव्हां राज्य घेईल याचा नेम नाहीं.' यावर 'शत्रूनें राज्य घेतलें तरी हरकत नाहीं, स्वदेहादिक सर्व परोपकाराकरितांच आहे, याकरितां राज्य घेऊन त्यांत तो बिचारा कां सुख मानीना !' असें नायक ह्मणतो. पुढें नायक 'पूर्वस्थलीं कंदमूलफलादि संपल्यामुळें जेथें यांची विपुलता असेल असें सुस्थल पाहण्यास पित्यानें सांगितलें आहे, याकरितां तसें स्थल पाहण्यास **मलय**पर्वतावर जाऊं' असें मित्रास म्हणतो. मग ते दोघे **मलय**पर्वतावर जातात. तेथें गेल्यावर नायिकेच्या भेटीचा योग येऊन उभयतांचें एकमेकांवर प्रेम जडतें. **मलय**पर्वतावरच्या वृक्षादिकांचें व नायक व नायिका यांच्या शृंगारचेष्टांचें यांत बरेंच वर्णन आहे व विरक्त नायक शृंगाररसांत अगदीं रंगून गेला आहे ! अशा विरक्त नायकास इतर नाटकांतल्याप्रमाणें शृंगाररसांत अगदीं गर्क करून टाकणें हें ठीक वाटत नाहीं.

दुसऱ्या अंकांतहि शृंगाररसच भरला आहे व नायक व नायिका यांचा गांधर्वविवाह होऊन विवाहसमारंभास सुरुवात झाली आहे.

तिसऱ्या अंकांत विवाहानिमित्त मद्यपानोत्सवाचें वर्णन केलें आहे. ह्या मद्यपानाच्या धागडधिंग्यापेक्षां अशा सत्वगुणी नायकाच्या संबंधानें दुसऱ्या एखाद्या उदात्त तत्वास अनुसरून वर्णन केलें असतें तर फार बरें झालें असतें. यांतहि नायिकेस अनुलक्षून नायकानें तिचें रसभरित वर्णन केलें आहे. तसेंच **कुसुमाकरोद्यानाचें** व विद्याधर आपल्या सुंदरींसह मद्यपानोत्सव करीत असल्याचें वर्णन आहे. यांत कांहीं विनोदाचे प्रकारहि आहेत.

ह्याच अंकाच्या शेवटीं **मित्रावसु** (नायकाचा मेव्हणा) "शत्रु **मतंगानें** तुमचें राज्य घेतलें आहे, याकरितां मला आज्ञा द्यावी, ह्मणजे मी शत्रूचा विध्वंस करतों" असें ह्मणतो. यावर नायकानें वैराग्याच्याच गोष्टी सांगून त्याचें निवारण केलें आहे व त्यास तसाच उपदेश केला आहे.

ह्याच विषय वर्णून कवीनें सर्वांकाची भरती केली असती तर बरें झालें असतें. व विवाहानिमित्त मद्यपानोत्सव व मध्येंच नायिकेचें वर्णन व शेवटीं शत्रूनें राज्य घेतल्यामुळें **मित्रावसु** त्याचा नाश करण्यास सिद्ध झाला असतां नायकाचा त्यास वैराग्योपदेश अशा तुटक तुटक विषयांची एकत्र खिचडी झाली नसती असें वाटतें.

चार व पांच ह्या दोन्ही अंकांत नायकाच्या उदात्त शीलास अनुसरून वर्णन आहे; व तें यथायोग्य आहे. ह्या दोन्ही अंकांतील वर्णन उदात्त दयावीर नायकास चांगलें शोभण्यासारखें आहे. ह्या रसाचा मासला दुसरीकडे कोठेंहि न मिळणारा असा आहे. तो ज्यांस पाहावयाचा असेल त्यांनीं हे दोन्ही अंक वाचावे. यांतील कोणते उतारे घ्यावे व कोणते न घ्यावे यांविषयीं माझ्या मनाचा खरोखरीच घोटाळा झाला व त्यामुळेंच मी ते दोन्ही अंक वाचण्याची वाचकांस आग्रहपूर्वक शिफारस करीत आहें. श्रृंगाररसाच्या भोक्त्यांची इच्छाहि यांतील पूर्वींच्या अंकांत पूर्ण होण्यासारखी आहे. इतर रस व नैसर्गिक वर्णनेंहि यांत अंगभूत आहेत.

नागानंद हें **रत्नावली** व **प्रियदर्शिका** यांप्रमाणें नाटिका नाहीं. हें पंचांकी नाटक असून संस्कृतवाङ्मयांत असलेल्या नाटकांहून हें बरेंच निराळें आहे. तथापि श्रृंगाररसाचा प्रकार यांत इतरांसारखा बराच आढळून येतो. विद्याधर **जीमूतवाहन** याचे विचार व कृति यांत बौद्ध-धर्माचीं उदात्त तत्वें दिसून येतात. तसेंच पितृसेवा, परोपकृति, इत्यादि सद्गुण त्याचे ठिकाणीं आढळतात. **जीमूतवाहन** याचे मातापितर व स्त्री आणि **शंखचूड**नाग व त्याची माता यांच्या शोकाचा या नाटकांत करुण-रसपरिप्लुत व हृदयद्रावक ठसा उमटला आहे. **जीमूतवाहना**चें परोपकारार्थ स्वजीवितनिरपेक्षेचें थोर औदार्य यांत चांगलें व्यक्त झालेलें आहे. यावरून ग्रंथकाराच्या मनांत ठसलेल्या **बौद्ध**तत्वांचें हें द्योतक आहे असें लक्षांत येतें. **श्रीहर्ष** हा विद्येस उत्तेजन देणारा होता; तसाच तो नृत्य, गीत, नाट्यकला ह्यांसहि उत्तेजन देणारा होता असें त्याच्या नाटकरचनेवरून

व इट्सिंगनें श्रीहर्ष स्वतः **नागानंद**नाटकाचा प्रयोग करवीत असल्याचें वर्णन केल्यावरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

हा कवि **कालिदास** व **भवभूति** यांच्या तोडीचा जरी म्हणतां येणार नाहीं, तरी दुसऱ्या प्रतीच्या कविमालिकेंत यास बराच वरती बसविण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं. याच्या ग्रंथांतील कवित्व चांगल्या प्रकारचें आहे, असें त्याच्याच तिन्ही ग्रंथांतील उताऱ्यांवरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. एकसारखें युद्ध करून शत्रु जिंकण्याचें काम चालू असतां **बाणा**दिकवींच्या संगतीनें विद्याव्यासंग चालू ठेवून त्यानें ग्रंथरचना केली व तींत त्यास इतकें यश मिळालें ही कांहीं सामान्य गोष्ट म्हणतां येणार नाहीं.

हें नाटक मुख्यत्वेंकरून शृंगार व वीर ह्या रसांनीं भरलेलें आहे. यांत करुण व अद्भुत हे रसहि अंगभूत आहेत.

साहित्यशास्त्रांत वीररसाचे चार प्रकार सांगितले आहेत. "**स दानधर्मयुद्धैर्दयया च चतुर्धेति ।**" यांत दयावीराचें उदाहरण '**यथा जीमूतवाहनः ।**' असें म्हणूनः–

"**शिरामुखैः स्यन्दत एव रक्तमद्यापि देहे मम मांसमस्ति ।**
तृप्तिं न पश्यामि तवापि तावत्किं भक्षणात्त्वं विरतो गरुत्मन् ॥"

असें यांतीलच उदाहरण दिलें आहे. तेव्हां दयेमुळें जिवावर उदार होणें, हा नायकाच्या अंगीं वीररस असल्याचेंच साहित्यशास्त्रांत वर्णन केलें आहे.

नागानंदांतील कांहीं चित्तवेधक स्थलनिर्देश.

नागानंदांतील प्रथमांकांत **जीमूतवाहना**चें स्वाभाविक वैराग्य दाखविण्यास सुरवात केली आहे. तो जीवित, तारुण्य व राज्यादि सुखें तुच्छ मानून पितृसेवा, परोपकारादि कृत्यें यांतच सुख मानितो आहे. त्याचे मातापितर ज्या ठिकाणीं राहत होते, त्या ठिकाणचीं कंदमूलफलें संपल्यामुळें त्यांनीं आपले पुत्रास दुसरें स्थान पाहण्यास सांगितलें, तेव्हां तो आपल्या मित्रासह **मलय**पर्वतावर सुस्थळ पाहण्यास गेला आहे.

नायक **जीमूतवाहन** पितृसेवेंतच सार्थक्य मानून राज्यादि सुखें कष्ट-कारक आहेत असें ह्मणतो आहे.

तिष्ठन् भाति पितुः पुरो भुवि यथा सिंहासने किं तथा
यत् संवाहयतः सुखं हि चरणौ तातस्य किं राजके ।
किं भुक्ते भुवनत्रये धृतिरसौ भुक्तोज्झिते या गुरो-
रायासः खलु राज्यमुज्झितगुरोस्तत्रास्ति कश्चिद्गुणः ॥

मित्र विदूषक **मलय**पर्वतावर गेल्यावर त्या ठिकाणच्या वायूचें वर्णन करतो आहे.

भो वयस्य प्रेक्षस्व प्रेक्षस्व एष खलु सरसघनचन्दनवनोत्सङ्ग-परिमिलिनलग्नबहलपरिमलो विषमतटोपहतजर्जरितनिर्झरोच्छलित-शिशिरशीकरासारवाही प्रथमसङ्गमोत्कण्ठितप्रियाकण्ठग्रह इव मार्ग-परिश्रममपनयन् रोमाञ्चयति प्रियवयस्यं मलयमारुतः ।

आत्रेय (विदूषक) याच्या हें मुखांतून निघालेलें वचन नायकाच्या प्रियासमागमास सूचकच झालें, असें लक्षांत येतें !

यांत मत्त हस्ती चंदनवृक्षास गंडस्थळें घाशीत असल्याचें, समुद्राच्या लाटा **मलय**पर्वताच्या गुहांत शिरून आदळत असल्यामुळें त्यांचे प्रति-ध्वनि होत असल्याचें व सिद्धाङ्गना पर्वतावर सहल करीत असल्यामुळें त्यांच्या पायाचा लाल रंग जागजागीं उमटल्याचें वर्णन करून हा पर्वत माझें मन उत्कंठित करतो आहे असें नायक ह्मणतो आहे.

माद्यत्कुञ्जरगण्डभित्तिकषणैर्भग्नस्रवच्चन्दनः
क्रन्दत्कन्दरगह्वरो जलनिधेरास्फालितो वीचिभिः ।
पादालक्तकरक्तमौलिकशिलः सिद्धाङ्गनानां गतै-
र्दृष्टोऽयं मलयाचलः किमपि मे चेतः करोत्युत्सुकम् ॥

यांत कदाचित् त्या ठिकाणीं फिरणाऱ्या नायिकेच्या पायांचाहि राग असेलच. त्यावर नायकाचे पाय पडल्यामुळेंच त्याच्या अंतःकरणांत तिचा अनुराग शिरण्यास येथूनच पाया (सुरुवात) झाला कीं काय असें वाटतें !

त्या ठिकाणीं मुनिजन वेदविचार करीत असल्याचें, शिष्य वेदशास्त्रपठण व समिधा तयार करीत असल्याचें, व तापसकुमारिका वृक्षांच्या आळ्यांत पाणी घालीत असल्याचें नायक वर्णन करतो आहे.

नायकः—(सविस्मयं विलोक्य) **अहो नु खलु मुदितमुनिजनप्रविचार्यमाणसंदिग्धवेदवाक्यविस्तरस्य पठद्बटुजनच्छिद्यमानार्द्रार्द्रसमिधस्तापसकुमारिकापूर्यमाणबालवृक्षालवालस्य प्रशान्तरमणीयता तपोवनस्य ।**

इहहि—मधुरमिव वदन्तः स्वागतं भृङ्गशब्दै-
र्नतिमिव फलनम्रैः कुर्वतेऽमी शिरोभिः ।
ननु ददत इवार्घं पुष्पवृष्टिं किरन्तः
कथमतिथिसपर्यां शिक्षिताः शाखिनोऽपि ॥

येथें वृक्ष देखील अतिथींचा सत्कार करीत आहेत असें वाटतें. ×

गायनध्वनि ऐकूं येतो व तो चालू असल्यामुळें त्याचें व त्यामुळें झालेल्या हरिणांच्या स्वाभाविक स्थितीचें यांत वर्णन केलें आहे:—

स्थानप्राप्त्या दधानं प्रकटितसमतामन्द्रतारव्यवस्था-
निर्ह्रादिन्या विपञ्च्या मिलितमलिरुतेनेव तन्त्रीस्वरेण ।
एते दन्तान्तरालस्थिततृणकवलच्छेदशब्दं नियम्य
व्याजिह्माङ्गाः कुरङ्गाः स्फुटललितपदं गीतमाकर्णयन्ति ।

कादंबरींत महाश्वेता शंकरासमोर गायन करीत असतां त्या ठिकाणच्या हरिणादिकांची अशीच स्थिति वर्णिलेली आहे.

दासी नायिकेस तिरस्कारानें ह्मणते:—

चेटी—(साधिक्षेपम्) **भर्तृदारिके ननु भणामि किमेतस्या देव्या निष्करुणायाः पुरतो वादितेन । या एतावन्तं कालं कन्यकाजनदुष्करैर्नियमोपासनैराराधयन्त्या अद्यापि न ते प्रसादं दर्शयति ।**

नियमोपवासादिकांनीं देवता पावल्या नाहींत ह्मणजे मनुष्याच्या मुखावाटे असलेच स्वाभाविक उद्गार निघतात !

× येथें शा. अं ४ यांतील ' क्षौमं केनचित् ' इ० पद्याचें स्मरण होतें

विदूषक नायकास ह्मणतोः—

विदूषकः—भो वयस्य कन्यका खल्वेषा तत्किं न प्रेक्षावहे।

नायकः-को दोषः। कन्यका हि निर्दोषदर्शना भवन्ति। किन्तु कदाचिदस्मान् दृष्ट्वा बालभावसुलभलज्जासाध्वसान्नाचिरमिह तिष्ठेत्। तदनेनैव तमालजालान्तरेण पश्यावः।

विरक्तनायकासहि कन्यावलोकनाची उत्कंठा झालीच !

(प्रियदर्शिकेंतहि 'निर्दोषदर्शना कन्यका खलु विश्रब्धमिदं पश्यामः' असें नायकानें विदूषकास ह्मटलें आहे.)

नायकः--(सस्पृहमवलोकयन्) वयस्य, केयमिति नावगच्छामि। एतत्पुनरहं जानामि,—

स्वर्गस्त्री यदि तत् कृतार्थमभवच्चक्षुःसहस्रं हरे-
र्नागी चेन्न रसातलं शशभृता शून्यं मुखेऽस्याः स्थिते।
जातिर्नः सकलान्यजातिजयिनी विद्याधरी चेदियं
स्यात् सिद्धान्वयजा यदि त्रिभुवने सिद्धाः प्रसिद्धास्ततः॥

मलयवतीस पाहिल्यावर नायकानें तिचें हें वर्णन केलें आहे !

नायका-(अपवार्य) हञ्जे अतिसाध्वसेन न शक्नोम्येतस्याभिमुखी स्थातुम्। (नायकं सलज्जं तिर्यक् पश्यन्ती किंचित्परावृत्तमुखी तिष्ठति)

कवीनें येथं हें एक चित्तवेधक चित्रच उठवून दिलें आहे !

नायक व नायिका यांस पाहून तपस्वी ह्मणतो आहेः—

तापसः-(उभौ विलोक्य स्वगतम्) चिरात्खलु युक्तकारी विधिः स्याद्यदि युगलकमेतदन्योन्यानुरूपं घटयेत्।

(शाकुंतलांतहि याच अर्थाचें वचन आहेः—

" समानयन् तुल्यगुणं वधूवरं चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः। ")

नायिकेस घरून बोलावणें आल्यावर तिच्या मनाची जी स्थिति झाली आहे तिचें वर्णन.—नायिका ह्मणतेः—

---

१ 'कन्या त्वजातोपयमा सलज्जा नवयौवना।' असें कन्येचें लक्षण साहित्यदर्पणांत आहे.

एकतो गुरुवचनमन्यतो दयितदर्शनसुखानि ।
गमनागमनविमूढमद्यापि दोलायते मे हृदयम् ॥
(शाकुंतलांतहि अशाच अर्थाचा श्लोक आहे:-
"कृत्ययोर्भिन्नदेशत्वात् द्वैधी भवति मे मनः।
पुरः प्रतिहतं शैले स्रोतः स्रोतोवहो यथा ॥")

नायिका मदनास उद्देशून ह्मणते आहे:-

भगवन् कुसुमायुध, येन त्वं रूपशोभया निर्जितोऽसि तस्य त्वया न किमपि कृतम् । मम पुनरनपराद्धाया अप्यबलेति कृत्वा प्रहरन्न लज्जसे।

(रत्नावलींतील नायिकेच्या ह्मणण्यांतहि अशाच कांहीं अर्थाचें वर्णन आलें आहे:-

'भगवन् कुसुमायुध, निर्जितसकलसुरासुरो भूत्वा स्त्रीजनं प्रहरन् कथं न लज्जसे '।

सखी निराश नायिकेचें समाधान करते आहे:-

चेटी —भर्तृदारिके, मैवं भण । किं मधुमथनो वक्षःस्थलेन लक्ष्मीमनुद्वहन् निर्वृत्तो भवति ।

(प्रियदर्शिकेंतहि सखी नायिकेस ह्मणते आहे:-

" हला अपण्डिते, कमलिनीबद्धानुरागोऽपि मधुकरो मालतीं प्रेक्ष्याभिनवरसास्वादलम्पटः कुतस्तामनासाद्य स्थितिं करोति । ")

श्रीहर्षकवीचे दोन्हीहि ग्रंथांतले दृष्टांत फारच समर्पक आहेत !

नायकः—

व्यावृत्यैव शितासितेक्षणरुचा तानाश्रमे शाखिनः
कुर्वत्या विटपावसक्तविलसत्कृष्णाजिनौघानिव ।
यद् दृष्टोऽस्मि तया मुनेरपि पुरस्तेनैवमय्याहते
पुष्पेषो भवता मुधैव किमिति क्षिप्यन्त एते शराः ॥

विदू०—भो वयस्य कुत्र खलु ते गतं तद्धीरत्वम् ।

विरक्त नायकास मदनपीडित पाहून विदूषकानें गमतीनें टोला दिला आहे तो यथार्थ आहे !

नायिकेचा भाऊ आपली सद्गुणी बहीण जीमूतवाहनास देऊं केल्यामुळें संतोष मानतो आणि तो दयाळू असल्यामुळें प्रसंगीं प्राणत्याग करण्यास मागेंपुढें पाहणारा नसल्यामुळें खेदहि मानितो आहे:—

यद्विद्याधरराजवंशतिलकः प्राज्ञः सतां सम्मतो
रूपेणाप्रतिमः पराक्रमधनो विद्वान् विनीतो युवा ।
यश्चासूनपि संत्यजेत् करुणया सत्त्वार्थमभ्युद्यत-
स्तेनास्मै ददतः स्वसारमतुलां तुष्टिर्विषादश्च मे ॥

जीमूतवाहनानें दुसऱ्या प्रणयिनीचें चित्र काढलें आहे व तीवर हा आसक्तचित्त आहे अशा गैरसमजुतीनें नायिका **मलयवती** गळफास लावून प्राण देण्यास सिद्ध झाली असल्यामुळें तिची सखी मोठ्यानें ओरडून तिचें रक्षण करण्यास हाका मारूं लागली. तेव्हां नायक धावत जाऊन तिचा फास काढून टाकतो आणि तिला चित्र दाखवून तिचा गैरसमज दूर करतो. अशा अर्थाचें पुढील वर्णन आहे.

नायिका—किं ममैतेन दौर्भाग्यकलङ्कमलिनेनात्यन्तदुःखभागिनाद्यापि शरीरेण धारितेन । तदिहैवाशोकपादपेऽनयातिमुक्तलतयोद्बध्यात्मानं व्यापादयिष्यामि । तदेवं तावत् । (प्रकाशं विलक्षस्मितेन) हञ्जे प्रेक्षस्व तावन्मित्रावसुर्दूरं गतो न वेति । येनाहमपीतो गमिष्यामि ।

Devagupta's position, however, in the rival contest of that period is not quite clear. For while, on the one hand his title of Mahârâjâdhirâja proves him to have been a claimant of the imperial dignity, he appears, on the other hand in the battle of Râjya Vardhana against S'ilâditya in 606 A. D. on the side of the latter. What probably happened was this: we have seen that the two brothers Kumâra and Mâdhava were sent to Prabhâkara's, court (H. C. 119). They are not likely to have been sent by their elder brother, who laid claim to the imperial dignity, but by their father Mahâsenagupta. The latter, accordingly, must have been still reigning at that time. As Kumâra was then 18 years of age (H. C. 120), the same as his friend Râjya, who was born in 586 A. D., the year of his being sent to Prabhâkara's court must have been 604 A. D. Accordingly Mahâsena was still alive and reigning in 604 A. D. He probably died, however, in the same year; the sending of his two sons may have been his dying arrange-

ment. He was succeeded by Deva, who at once assumed the imperial title. By this assumption he would naturally come into collision with Prabhâkara, who since the dethronement of S'ilâditya in 593 A. D. had been the head of the empire. This explains two things. (1) how it came to pass that on S'ilâditya's restoration and march to the reconquest of Kanauj and Thanesar, Devagupta is found on the side of S'ilâditaya fighting against Râjya Vardhana, by whom he was defeated in 606 A. D., as mentioned in Harsha's inscriptions; (2) how it was that he is omitted from the Later Gupta genealogical list; the Guptas evidently looked upon him as a renegade of whom they had no reason to be proud.

There may, however, have been a more cogent reason for Devagupta's exclusion from the Genealogical list. From Bâṇa's account of the occurrences it appears that, while Râjya lost his life through the treachery of "The king of Gauḍa" (H. C. 178), "a man named Gupta" as Bâṇa contemptuously calls him (H. C. 224), was also implicated in the deed. In another place (H. C. 251) Bâṇa calls him "a noble called Gupta". In both cases he disdains to call the accomplice by his proper name. I suggest that this accomplice was Devagupta. He had joined S'ilâditya in his capture of Kanauj, had shared his defeat at the hand of Râjyavardhana, had afterwards escaped back to Kanauj and finally assisted the king of Gauḍa,[1] who was holding the town, in the treacherous murder of Râjya. If we remember that, as I have pointed out, in all probability

1. According to Hiuen Tsiang(Siyuki, i, 210)the king of Gauḍa's name was S'as'ânka, and his country was Karṇa-suvarṇa. The latter has been rightly indentified by Mr. Beheridge with Rangmaṭi, near Berhampur inBengal(Journal A. S. B. LXII, 315).The name Narendragupta has also been attributed to S'as'ânka, but on quite insufficient grounds. Cunningham (Survey reports, IX, 157) says (in 1879) that he "learned from Dr. Bühler that in the Jain Books S'as'ânka is called

Kumârgupta was with Râjya at the time, and shared his miserable fate, it sufficiently explains the detestation in which Devagupta must have been held by his family, and his total exclusion from mention in the family list.

The leading events of the period may now be chronologically tabulated thus:—

C. 533. A. D. Vikramâditya (Yas'odharman—Vishnuvardhana) defeats the Huns, founds the Mâlwa empire, and reigns c. fifty years.

C. 583. A.D. Prabhâkara succeeds to the chieftainship of Thanesar, and sets up a rival claim to empire. A ten years' war ensues with Mâlava.

C. 593. A.D. S'ilâditya, son of Vikramâditya is dethroned, and retires to the Huns of the Punjab and Kashmir.

C. 604. A. D. Devagupta, chief of Eastern Mâlva, also sets up a rival claim, but submits to S'ilâditya, who has returned and regained Mâlva with the help of Pravarsena II of Kashmir.

C. 606. A.D. Decisive battle between S'ilâditya and Râjya Vardhana, resulting in the final destruction of the Mâlva empire."

Narendra Gupta." But Bühler (Epigr. Ind., I, 70), in 1888, bases his information only on "One M. S. of the Shrîharshacharita." That manuscript information cannot have been of much value, for it is entirely ignored by the translators Cowell and Thomas. Beal, in n. 16 to his Siyuki, i, 210, states the name as a fact; but it does not appear that he had any other basis for his statement than Cunningham's apparently misunderstood information of Bühler. Practically, therefore, Narendragupta as a name of S'as'ânka is a delusion. The latter's real indentity and relation to contemporary dynasties still requires elucidation I may return to this some day; the present paper is already too long for it.

डॉ. होर्नलेसाहेबांनीं रॉयल ए. सोसायटीपुढें हर्षावर वाचलेल्या निबंधाचें मुद्देसूत संक्षिप्त भाषांतरः—

हर्षवर्धनाच्या शिलालेखावरून (Madhuban Copper-plate Epigraphia Indica 1, 72) त्याचा बाप प्रभाकर [ठाणेसरचा राजा(chief) याचें बर्णन परमभट्टारक आणि महाराजाधिराज अशा पदव्यांनीं केलें आहे. याचा अर्थ असा होतो कीं, प्रभाकर इ. स. ५८०–६०६ मध्यें होता] त्यानें आपणास प्रतिस्पर्धी राजा म्हणून प्रस्थापित केलें होतें. आणि त्या कालचा माळव्याचा राजा शिलादित्य याच्या आणि त्याच्या लढाया झाल्या असाव्या. या शिवाय प्रभाकरानें आपणास प्रतिस्पर्धी राजा म्हणवून घेतलें नसावें. दुसरें शर्ववर्माच्या अशिरगड शिक्यावरून (Corpus Inscr–Indica 3220), त्याचा बाप ईशानवर्मा कनोजाचा मौखरी राजा यास महाराजाधिराज अशी पदवी होती. यावरून माळव्याच्या राजाचा दुसरा प्रतीस्पर्धी हा होता, असें दिसून येतें. ईशानवर्म्याच्या नाण्यावरून तो. इ. स. ५६५ सालीं होता. प्रभाकराचा बाप आदित्यवर्धन आणि ईशानवर्मा हे समकालीन होते. तेव्हां ईशानवर्मा ५६५ त होता. या म्हणण्यास पुष्टी येते व माळव्याचा विक्रमादित्य याचा प्रतिस्पर्धी ईशानवर्मा असल्याबद्दल सिद्ध होतें (?) यावरून मौखरीराजे आणि मालवराजे यांच्या लढाया झाल्या असल्या पाहिजेत.

या गोष्टीच्या सिद्धचर्थ हर्षचरितांतहि कांहीं पुरावा सापडतो. हा ग्रंथ त्याच वेळचा आहे. ठाणेसरच्या आणि कनोजच्या राजांबरोबर मालवराजानें लढाया केल्याबद्दल बाणानें वर्णिलें आहे. मालवाच्या शत्रूंनीं शिलादित्यास पदच्युत केलें, असें राजतरंगिणींत आहे. ते शत्रू हेच होत. प्रभाकरानें मालव (शिलादित्य) आणि हूण यांजबरोबर लढाया केल्या. त्यांत प्रभाकरास सर्वथैव जय मिळाला नाहीं. कारण, त्यानें आपला मुलगा राज्य (राज्यवर्धन) यास पुनः हूणांवर पाठविलें. मालवानें कनोज जिंकून प्रभाकराचा जावई ग्रहवर्मा यास मारलें, राज्यानें

मालवास पराजित केलें; परंतु गौडानें राज्यास मारलें. बाणानें माळवाचें नांव दिलें नाहीं; परंतु त्यावेळीं तेथें या शिवाय दुसरा राजा नव्हता. (?)

हर्षचरित्रांत, प्रभाकरास राज्य आणि हर्ष असे दोन मुलगे व राज्यश्री नांवाची मुलगी होती. तिच्यावेळीं तिची आई गरोदर असतां राज्यास सहावें वर्ष लागलें होतें, आणि धाकटा हर्ष यास दुसरें वर्ष लागलें होतें. कारण, तो आपल्या दाईचीं बोटें धरून पांच सहा पावलें टाकूं लागला होता व बारीक दातांनीं त्याच्या मुखास शोभा येऊं लागली होती. दुसरे वर्षीं राज्यश्री जन्मली. यावरून दोन भावांमध्यें चार वर्षांचें आणि हर्ष व राज्यश्री यांजमध्यें तीन वर्षांचे अंतर होतें. प्रभाकरानें आपल्या दरबारीं दोन गुप्तराजपुत्र—कुमार आणि माधव यांस आपल्या दोन मुलांचे सोबतीसाठीं बोलाविलें होतें. (?) त्यांत वडील कुमाराचें वय १८ वर्षांचें व त्याचा मित्र राज्य याचें सुमारें इतकेंच. हर्ष व माधव यांचें १४ वर्षांचें आणि राजश्रीचें ११ वर्षांचें असावयाचें आणि " तिला जरा लौकरच ऋतु प्राप्त झाला " (!) या हर्षचरित्रांतील मजकुराशीं (ह. च. पान १२१) मेळ जमतो. (!) नंतर प्रभाकरानें राज्यास हूणांवर पाठविलें. तो परत आल्यावर लवकरच त्याला मिश्रु फुटूं लागली. यावरून तो त्यावेळीं सुमारें २० वर्षांचा व हर्ष १६ वर्षांचा असावा. यावर्षींच हर्ष गादीवर बसला. (पुढें राज्य थोड्या महिन्यांनींच वारला त्यामुळें) त्यावेळीं हर्ष पोर होता असें दोनदां म्हटलेलें आहे (!) हर्षास इ. स. ६०६ च्या आक्टोबरांत राज्याभिषेक झाला. त्याचें जन्म इ. स. ५९० त, राज्याचें ५८६ त, राज्यश्रीचें ५९३ त, झालें असलें पाहिजे. अर्थात् प्रभाकराचें यशोवतीशीं लग्न इ. स. ५८५ पूर्वीं झालें असावें व ५८३ च्या सुमारास तो गादीवर बसला असावा. हा शरीरसंबंध कांहीं अंशीं प्रतिस्पर्धी होण्यास कारण झाला असावा. तिच्या नावावरून माळव्याचा राजा यशोधर्म विक्रमादित्याची ती मुलगी असली पाहिजे. तो वारला तेव्हां प्रभाकरानें सासऱ्याच्या राज्या-वर आपला हक्क सांगितला असावा. कारण, त्याचा मुलगा शिलादित्य

हूणपक्षाचा होता व तो लोकप्रियहि नव्हता. विक्रमादित्यानें प्राचीन गुप्त-कुलाचा नायनाट करून गादी बळकावली होती हें येथें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. त्यानें हूणापासून रक्षण केलें होतें आणि तो शहाणा व पराक्रमी होता, ह्मणून तो होता तोंपर्यंत त्याचें राज्य सुराक्षित होतें. परंतु त्यानें गादी बळकावलेली होती, हें कोणी विसारले नव्हते. गुप्तराजघराण्याची एक शाखा पूर्वमाळव्यांत राज्य करीत होती, त्या शाखेचा आणि कनोज-चे मौखरीराजे यांचा शरीरसंबंध होता व त्याचप्रमाणें ठाणेश्वरच्या रजपूतराजांचाहि होता. ह्या राजांनीं गुप्तपक्ष धरून माळव्याच्या राज्याच्या अनाधिकारी हक्कास प्रतिबंध केला, यांत आश्चर्य नाहीं.

मौखरी आदित्यवर्मा यानें गुप्तकन्या हर्षा इजबरोबर विवाह केला होता. (Corpus. Inscr. Ind., Introd., 14.) यांचा मुलगा ईशान-वर्मा, यानें सार्वभौम पदवी धारण केली. ही गोष्ट विक्रमादित्य (माळव्या-चा राजाधिराज) जिवंत असतां इ. स. ५६५ मध्यें झाली, ह्मणजे तो प्रतिस्पर्धी झाला. त्याचप्रमाणें ठाणेश्वरचा राजा आदित्यवर्धन यानें गुप्त-कन्या महासेनागुप्ता इच्याशीं लग्न केलें होतें. (Corpus. Inscr. Ind, III Introd, 15) तिचा मुलगा प्रभाकर यानें सार्वभौम पदव्या धारण केल्या होत्या. यावरून तो प्रतिस्पर्धी झाला. ही गोष्ट ५८३ त घडली असावी. यावरून माळव्याचे गादीवर त्याच वेळेस बदल झाल्याचें दिसतें. विक्रमादित्य इ. स. ५८३ त मेला असला पाहिजे. त्याचें राज्य ५३३—५८३ पर्यंत होतें. त्याचा मुलगा शिलादित्य याचा गादीवर हक्क नाहीं, असें प्रभाकराचें ह्मणणें असावें (?) यांत आणखी अशी भर पडली कीं, त्यानें आपली मुलगी मौखरीराजपुत्र ग्रहवर्मा यास दिली. मौखरीराजा अवंतीवर्मा याचा मुलगा ग्रहवर्माहि माळव्याच्या राज्यावर हक्क सांगणारा होता (?) यावरून शिलादित्यानें कनोजवर ६०६त स्वारी करून ग्रहवर्म्या-स मारून त्याच्या स्त्रीस अंधारकोठडींत टाकलें. यावेळीं राज्यश्री सुमारें १३ वर्षांची होती. त्यानें तिला क्रूरपणानें वागविलें. यावरून तो कसा होता हें उघड होतें !

विक्रमादित्यानें माळव्याचें राज्य इ. स. ५३३ त स्थापन करून तें इ. स. ५८३ पर्यंत केलें. हूणांपासून सोडविणारा शहाणा व पराक्रमी तो होता, ह्मणून त्याला सर्व मानीत असत. यामुळें त्याला कोणी अपाय केला नाहीं. त्याचा मुलगा (?) शिलादित्य क्रूर होता. त्याला स्वदेशाभिमान नव्हता, हें हुणसंगतीवरून व्यक्त होतें. (!) तो इ. स. ५८३ त गादीवर बसतांच चोंहींकडे असंतोष झाला. (?) प्रभाकराचे मौखरी व पूर्वेकडील गुप्त यांच्याशीं शरीरसंबंध झाले असल्यामळें त्यानें शिलादित्यावर स्वारी केली. (There" are the enemies " of the Rajatarangini-iii 330). व त्याचा व त्याचे साथीदार हूण यांचा पराभव केला. तेव्हां तो काश्मीराकडे पळून जाऊन हूणांच्या आश्रयानें राहिला. (III ३३०)

मग काश्मीरचा हूण राजा दुसरा प्रवरसेन याच्या मदतीनें त्यानें आपलें माळव्यांतील राज्य पुनः संपादिलें (III ३३०) त्यानें मौखरी व ठाणेश्वरचे राजे पुन्हा आपल्या ताब्यांत आणण्याचा निश्चय केला. त्यानें कनोजवर स्वारी करून ग्रहवर्म्यास मारून तें राज्य घेतलें व राज्यश्रीस कैद केलें. प्रभाकरानें शिलादित्याचे मदतगार हूण यांजवर उत्तरेस आपला पुत्र राज्य यास पाठविलें. परंतु पुढें थोड्याच महिन्यांनीं (?) त्याचा बाप वारल्यामुळें त्याला परत यावें लागलें. शिलादित्यानें कनोज घेतलें व तो ठाणेश्वरावर स्वारी करणार आहे असें समजतांच घाईनें मिळविलेले घोडेस्वार घेऊन राज्य निघाला. त्याची व शिलादित्याची वाटेंत गांठ पडली. दोघांची लढाई होऊन शिलादित्याचा पूर्ण पराभव झाला. त्याचें सर्व सामान व दरबारच्या स्त्रियासुद्धां राज्यास सांपडल्या. गौडशशांकानें त्याचा पक्ष स्वीकारला होता व मालवराज स्थानेश्वरावर चाल करून गेला तेव्हां कनोज गौडाच्याच स्वाधीन होतें. (?) त्यानें विश्वासघातानें राज्यास मारलें. या गडबडींत राज्यश्री बंदींतून सुटून विंध्यारण्यांत पळून गेली व तेथून हर्षानें तिची सुटका केली.

शिलादित्याचा पराभव ६०६ च्या उन्हाळ्यांत झाला हें प्रसिद्ध आहे (?) ही माळव्याची दुसरी लढाई (?) ज्या पहिल्या लढाईत (?) शिलादित्य पद-

च्युत झाला त्या कालाचा सुगावा बाणाच्या वर्णनांत आढळतो. राज्यश्री-च्या जन्माचे वेळेस यशोवतीच्या भावानें भंडीस राजा व हर्ष यांच्य तैनातीस दिलें. तेव्हां तो ८ वर्षांचा होता. राज्यश्रीचें जन्म इ. स. ५९३ मध्यें झालें. यशोवती ही यशोधर्म्याची मुलगी असली पाहिजे. (?) तिचा भाऊ शिलादित्य व त्याचा मुलगा भंडी असला पाहिजे. (?)

शिलादित्याला भंडीस आपला शत्रु प्रभाकर याच्या स्वाधीन करणें भाग पडलें असावें. (!) त्यानें ५९३ त पदच्युत झाल्यावर हूणसाहाय्यानें पुनः राज्य प्राप्त झाल्यावर द्वेषानें युद्ध केलें याचें कारण त्याला आपल्या मुलास शत्रूच्या स्वाधीन करणें भाग पडलें, हेंच असावें (?)

भंडीस हूएनसँगनें पोनी (Poni-siyuki, i 210) असें नांव दिलें आहे. हा चुकीचा उच्चार आहे किंवा चिनीभाषेंत तसें असावें. राजपुत्रास भंडी हें नांव चमत्कारिक दिसतें. हें संस्कृत नाहीं किंवा हिंदु नाहीं. भंड या शब्दाचें तें रूपांतर आहे, असें कोणी ह्मणेल तर भंडी (Buffoon) हें नांव राजपुत्रास योग्य नाहीं. हें हूणांचें असून चिनीभाषेंत पोनी व संस्कृतांत भंडी अशीं याचीं रूपें झालीं आहेत. शिलादित्याचा ओढा हूणांकडे असल्याचें आणखी हें प्रत्यंतर आहे (!)

आतां भंडीनें आपल्या बापाशीं लढाई कशी केली? तर भंडीला प्रभाकराच्या स्वाधीन केलें. तेव्हां तो ८ वर्षांचा होता. प्रभाकर त्याला मुलाप्रमाणें व त्याचे पुत्र भावाप्रमाणें मानीत असत. पुढें ११-१२ वर्षांनीं भंडीचा बाप परत आला, तेव्हां बापलेकांत अगदीं परकेपणा झाला होता (!) राज्य शिलादित्याशीं ६०६ मध्यें लढण्यास गेला, तेव्हां भंडीस बापावर प्रेम करण्यास कांहींच कारण राहिलें नाहीं (!) भंडीनें बापाचा पक्ष सोडून राज्याचा स्वीकारला (!) राज्यानें शत्रूंनां जिंकलें त्यांत देवगुप्त ह्मणून एक होता असें शिलालेखांत आहे. (e.g. the Madhuban copper plate in Epigra. Ind. i, 72). शिलालेखांतील देवगुप्त कोठला राजा याविषयीं सांगितलें नाहीं परंतु कुमार व माधव-

गुप्त यांचा व त्याचा कांहीं संबंध असावा असें वाटतें ! बाणानें यांनां मालवराजपुत्र म्हटलें आहे. *देवगुप्त माळव्याचा राजा असल्यामुळें असें मनांत येतें कीं, तो कुमार व माधव यांचा बाप तर नसेलना ? आदित्यसेनाच्या अफसडशिलालेखांत (Corpus Insc. Ind., III, 200) गुप्तराजांची वंशावळ आहे. तींत माधव हा महासेनगुप्ताचा पुत्र असें आहे व महासेन हा प्रभाकरचा मामा. आफसड शिलालेखांतील माधवगुप्त तोच प्रभाकराच्या येथें पाठवलेला माधव, यांत शंका नाहीं. तेव्हां माधवाचा देवगुप्त बाप होत नाहीं (!) तर त्याचें दुसरें नातें असावें. प्रभाकराच्या बापाच्या पिढीचा महासेनगुप्त असून त्याची बहीण महासेनगुप्ता इच्याशीं त्यानें लग्न केलें होतें. प्रभाकराचा पुत्र हर्ष याच्या बरोबरीचा माधव. हें अफसडलेख व ह. च. यांवरून सिद्ध होतें. आतां प्रभाकराच्या बरोबरीचा कोणीतरी महासेन व माधव यांच्या मधला असावा. तो देवगुप्त होय. अफसडलेखावरून ही मधली खिंड कशी भरून काढावी, हेंहि समजतें (!) या घराण्यांतील प्रत्येक आपल्या पूर्वजांचा (सुत आणि तनय) ह्मटलेला आहे. माधवाच्या संबंधानें तो महसेनापासून आला (तस्मात् अभूत्) असें ह्मटलें आहे. (!) कृष्ण जसा वसुदेवापासून आला, तसा माधव महासेनापासून आला. (!) वसुदेवाला देवकीपासून आठ पुत्र झाले त्यांत कृष्ण धाकटा. यावरून महासेनासहि पुष्कळ पुत्र होते (!) व त्यांत माधव हा धाकटा, व मीं ह्मणतों देव सर्वांत किंवा दोघांपेक्षां तरी वडील होता (!) महासेनास तीन पुत्र तरी असलेच पाहिजेत, आणि अलबत अधिकहि असतील. देव व माधव

* बुल्हरच्या मतें देवगुप्त माळव्याचा राजा होता. (Epigr. Indi, i, 70) परंतु त्याचा देश पंजाबांत ठाणेश्वरजवळचा माळवा असें आहे. परंतु तेथें माळवा मुळींच नाहीं. तो वायव्यप्रांतांत फत्तेपूर जिल्ह्यांत गंगेच्या काठीं आहे. बुल्हरच्या मनांत हाच माळवा असावा. (कावेल व थामस हे प्रस्तावनेंत असेंच ह्मणतात.) हा माळवा ठाणेश्वराहून ३५० मैल आहे. शिवाय तो अगदीं लहान आहे व तेथें राजधानी असल्याबद्दल प्रमाण आढळलें नाहीं.

याच्यांत ८-१० वर्षांचें अंतर असावें. तेव्हां देवगुप्त प्रभाकराच्या बरोबरीचा होता. तर मी ठरवितों कीं, पूर्वमाळव्याच्या गादीवर महासेनाच्या मागून देव बसला, व त्याच्या मागून माधव बसला. (!) कुमारानें राज्य केलें नाहीं. कारण, राज्यानें शिलादित्यावर स्वारी केली तींत तो बळी पडला. (?)

अफसडशिलालेखांत देवगुप्तानें राज्य केल्याबद्दल उल्लेख नाहीं, तरी त्यानें राज्य केल्याबद्दल वाकाटकच्या शिलालेखांत (Corpus. Inscr. Ind, iii, 235) पुरावा मिळतो. त्यांत महाराजाधिराज देवगुप्त याचा प्रवरसेन हा आईकडून नातू मुलीचा मुलगा ? (Maternal grandson) असें आहे. यावरून देव हा एके वेळीं राज्यारुढ होता इतकेंच नाहीं, तर ईशानवर्म्यानें महाराजाधिराज पदवी धारण करून जसा हक्क सांगितला त्याप्रमाणें देवानेंहि सांगितला (!). हे दोन देवगुप्त एकच, इतकें सिद्ध करण्याचें राहिलें. वाकाटकशिलालेखांतील अक्षरांचा जुनेपणा डॉ. बुलरच्या लक्षांत आला व त्यानें त्याचा काल पांचव्या शतकाचा मध्य असें दर्शविलें. (Indian Antiquary, xii, 240) परंतु देवगुप्त कोण ? याच्या निर्णयाचा यत्न त्यानें केला नाहीं. डॉ. फ्लीट याला जरी शिलालेखाचा जुनेपणा ठरविण्याचें कठिण वाटलें, तरी त्यानें देव हा अलीकडील गुप्तांच्या यादींतला असावा असें ठरविलें. व त्याचा काल ६८०–७०० हा ठरविला (Corpus. Inscr. Introd. 15) प्रो. किल्हार्न यानें एपिग्रा. इंडिका (iii 260) यांत डॉ. फ्लीटनें फक्त देवगुप्ताचा निर्णय कबूल केला. वाकाटक शिलालेखांतील देवगुप्त हाच हर्ष-शिलालेखांतील देवगुप्त असें मीं बिनदिक्कत समजतों. मधुबनशिलालेख हा डॉ. फ्लीट यास माहित असता तर त्यांनेंहि असेंच वाटलें असतें. (!)

त्या कालाच्या लढायांत देवगुप्त कोणीकडे होता हें कळत नाहीं. देवाच्या महाराजपदवीपासून तो राज्यावर हक्क सांगणारा होता. परंतु ६०६ मध्यें शिलादित्याशीं राज्यानें लढाई केली तींत देव शिलादित्या-

च्या बाजूचा होता. यावरून कुमार व माधव यांनां प्रभाकराच्या दरबारीं पाठविलें होतें तें त्यांच्या वडील भावानें पाठविलें नसावें, तर त्यांचा बाप महासेन यानें पाठविलें असावें. (!) व तो त्यावेळीं राज्यावर असावा. कुमाराचें वय १८ वर्षांचें होतें राज्याचेंहि तितकेंच होतें. राज्याचा जन्म इ. स. ५८६ मध्यें झाला. (?) तेव्हां कुमार व माधव यांस प्रभाकराकडे ६०४ मध्यें पाठविलें. यावरून ६०४ मध्यें महासेन जिवंत असून राज्य करीत होता. त्यानें मरण्याचे वेळेस आपले दोन पुत्र प्रभाकराकडे पाठविलें असावें. महासेनाच्या मागें देवगुप्त गादीवर बसला. व लागलीच त्यानें सार्वभौम पदवी धारण केली. (?) यामुळें प्रभाकराचें व त्याचें युद्ध होणें स्वाभाविक आहे. कारण ५९३ मध्यें तो पदभ्रष्ट झाला. तेव्हांपासून प्रभाकर सार्वभौम राजा होता. यावरून दोन गोष्टींचा खुलासा होतो. (१) शिलादित्यानें पुनः राज्य मिळवून तो कनोज व ठाणेश्वर यांवर स्वारी करण्यास निघाला तेव्हां त्याची आणि राज्याची लढाई झाली. तींत देवगुप्त शिलादित्याकडचा होता व त्याचा राज्यवर्धनानें ६०६ त पराभव केला. दुसरी गोष्ट अलीकडील गुप्तांच्या वंशावळींतून त्याचें नांव वगळलें, याचें कारण तो घातकी व त्याचा त्यांनां अभिमान नव्हता ह्मणून. (!)

त्याचें नांव वगळण्यास आणखीं एक कारण दिसतें तें असें कीं, +गौडराजानें विश्वासघातानें राज्याचा खून केला त्यांत गुप्त ह्मणून

×ह्युएनसँगप्रमाणें (Siyuki, i, 210) हा गौडराजा शशांक होता व त्याचा देश कर्णसुवर्ण होता. मि. बिव्हरीज यानें हा देश बंगाल्यांत बेऱ्हामपुराजवळ रंगमती ह्मणून ठरविलें ते बरोबर आहे. शशांकास नरेंद्रगुप्त हें नांवहि होतें, असें ह्मणतात्. परंतु यास आधार नाहीं. (!) कनिंगह्माम (1869, Survey Reports ix 157) मध्यें ह्मणतो कीं, जैनग्रंथांत यास नरेंद्रगुप्त ह्मटलें आहे, असें डॉ. बुल्हरनें ह्मटलें आहे. परंतु त्याला (Epigr Ind. i, 70) ही माहिती १८८८ मध्यें हर्षचरिताच्या एका प्रतीवरून मिळाली. ही साधार नसावी. कारण मि. कावेल आणि टामस ह्या भाषांतरकर्त्यांनीं ती दिलेली नाहीं (!) बील हा आपल्या सियुकी i, २१० च्या नं. १६ मध्यें हें नांव देतो, परंतु कनिंगह्यामला दुसरा आधार असल्याचें दिसत नाहीं. तेव्हां शशांकाचे ‘ नरेंद्रगुप्त ’ हें नांव मुळींच नव्हतें असें ह्मटलें पाहिजे. (!)

एक सामील होता. यास बाणानें 'गुप्त' ह्मटलें आहे. दुसऱ्या ठिकाणीं त्याला "एक बडा मनुष्य गुप्त" असें ह्मटलें आहे. दोन्ही ठिकाणीं त्याचें नांव तिरस्कारानें त्यानें दिलें नाहीं. हा देवगुप्त असावा.(?) राज्यानें शिलादित्याचा पराभव केला, त्यांत त्याचाहि पराभव केला असावा. नंतर तो कनोजला पळून गेला. तेथें त्यानें गौडाला राज्याचा घात करण्यांत मदत केली (!) त्यावेळीं कुमारगुप्त राज्या बरोबर असावा व राज्याप्रमाणें त्याचाहि परिणाम झाला असावा, असें दाखविलें आहे. यावरून देवगुप्ताचा त्याचे कुटुंबांतील माणसें तिरस्कार करीत होतीं व वंशावळींतून त्याचें नाव अजिबात गाळून कां टाकिलें याचाहि खुलासा होतो (!)

त्या काळच्या मुख्य गोष्टी कालानुक्रमानें पुढें दिल्या आहेत:—

C५३३ विक्रमादित्य (यशोधर्मन-विष्णुवर्धन) यानें हुणाचा पराजय करून माळव्यांत आपली गादी स्थापिली. त्यानें ५० वर्षे राज्य केलें.

C५८३ प्रभाकर ठाणेश्वराच्या गादीवर बसला व सार्वभौम पदावर आपला हक्क सांगूं लागला. त्याच्या व शिलादित्याच्या १० वर्षें लढाया झाल्या.

C५९३ शिलादित्य पदभ्रष्ट होऊन पंजाब व काश्मीरच्या हूणांकडे गेला.

C६०४ पूर्वमाळव्याचा राजा देवगुप्त हा सार्वभौमपदावर हक्क सांगून प्रतिस्पर्धी झाला परंतु काश्मीरच्या दुसऱ्या प्रवरसेनाच्या मदतीनें शिलादित्यानें परत येऊन माळवा पुन्हा आपल्या हस्तगत केला. त्याच्या स्वाधीन देवगुप्त झाला.

C६०६ शिलादित्य व राज्यवर्धन यांच्यामध्यें निकराच्या लढाई होऊन माळव्याच्या राज्याचा नाश झाला.

डॉ. होर्नले यांच्या हर्षावरच्या निबंधांतील मुद्यासंबंधानें विवेचन.

परम-भट्टारक व महाराजाधिराज वगैरे प्रायः सर्व शिलालेखांत स्वतंत्र राजांनां ह्मटलेलें असतें. ह्या पदव्या माळव्याच्या राजासच लावलेल्या आहेत असें नाहीं. व एवढ्यावरूनच परस्परांत प्रतिस्पर्धित्व सिद्ध होतें असें डा. होर्नले यांनीं आपल्या निबंधांत ठरविलें आहे, तें कसें तें मला समजत नाहीं. हर्षचरितांत, सोनपतताम्रपत्रांत, (नं. ५२) आणि बंसूखेर व मधुबनशिलालेखांत प्रभाकरवर्धनास "परमभट्टारक महाराजधिराज" असें ह्मटलेलें आहे. असें असून डॉ. होर्नले साहेबांनीं त्यास संस्थानिक (chief) असें कोणत्या आधारानें ह्मटलें आहे, तेंहि कळत नाहीं. मालवराजानें स्थानेश्वरच्या आणि कनोजच्या राजांबरोबर लढाया केल्या परंतु मालवराजा कोणता, याजबद्दल हर्षचरितांत कोठें कांहीं उलेख नाहीं. डॉ. होर्नलेसाहेब तो मालवराज शिलादित्यच असला पाहिजे असें ह्मणतात. परंतु हाच तो असल्याबद्दल त्यांनीं पुरावा दिला आहे तो खात्री होण्यासारखा वाटत नाहीं. शिवाय हा शिलादित्य ह्या प्रकरणांत ह्मटलेला मालवराज नसून आमच्या मतें देवगुप्त हा मालवराज असावा हें पुढील विवेचना वरून लक्षांत येईल.

प्रभाकरानें मालवराज (शिलादित्य) व त्याचे साथीदार हूण यांजवर, स्वारी केली, असें साहेबांनीं ह्मटलें आहे. परंतु हर्षचरितांत यास 'मालवलक्ष्मीलता परशुः' व 'हूणहरिणकेसरी' ह्या प्रभाकरास दिलेल्या विशेषणां खेरीज दुसरा आधार नाहीं! 'प्रभाकरास सर्वथैव जय मिळाला नाहीं, ह्मणून त्यानें आपला मुलगा 'राज्य' (राज्यवर्धन) यास पुनः हूणांवर पाठविलें.' असें साहेब ह्मणतात. तर मग बाणानें प्रभाकरास 'हूणहरिणकेसरी' 'मालवलक्ष्मीलतापरशुः' इत्यादि विशेषणें योजिलीं आहेत, तीं यथार्थ नाहींत, असें ह्मणावें लागेल! कारण शत्रूंचा पूर्ण पराजय झाल्या खेरीज किंवा ते पक्के कह्यांत आल्या खेरीज अशीं विशेषणें योजणें योग्य होणार नाहीं. त्याला सर्वथैव जय मिळाला असला, तरी

कांहीं काळानें हूण पुनः गडबड करूं लागले तेव्हां प्रभाकरानें राज्यवर्धनास काश्मीराकडे हूणांवर पाठविलें असेल, असाहि संभव आहे. बाणानें प्रभाकरास दिलेल्या विशेषणांवरून हूण किंवा मालव यांजबरोबर प्रभाकराची पहिली लढाईच कशी ठरते ! हेंहि मला समजत नाहीं ! त्या काळीं अस्तित्वांत असलेल्या बाणकवीच्या वर्णनावरून प्रभाकरानें अनेकदां पराक्रम केले असल्यामुळें त्यानें त्यास अशीं विशेषणें योजिलीं असावीं.

हल्लींच्या आमच्या आंग्लपातशहास 'शाहुपुराधिपज्वरः' 'निजामामयमहौषधिप्रतिमः' 'गायकवाडप्रजागरः' इंदुरेन्दुग्रहः' 'लष्कराधिपहरिणकेसरी' अशा प्रकारचीं कोणीं विशेषणें लाविलीं, तरी तीं सर्वथैव योग्य आहेत, यांत बिलकुल शंका नाहीं. परंतु यांवरून कोल्हापुरच्या महाराजाशीं, निजामाशीं वगैरे, पहिली लढाई अमुक वेळीं झाली असावी, असा जर कोणीं, ह्या विशेषणावरून तर्क चालविला तर तो जितका अयोग्य आहे, तितकेंच प्रभाकरास लावलेल्या विशेषणांवरून मालवाशीं किंवा हूणाशीं पहिली लढाई अमुक वेळीं झाली असावी, वगैरे ठरविणें अप्रयोजक होय ! मालवाशीं किंवा हूणाशीं प्रभाकरानें युद्ध केव्हां केलें याबद्दल हर्षचरितांत ह्या विशेषणाखेरीज दुसरा पुरावा दिसत नाहीं.

होर्नले व दुसरे युरोपियन पंडित यांनीं पावलें टाकणें, दांत येऊं लागणें व मिश्रू फुटणें यावरून काल-निर्णय अगदीं पक्का करून टाकला आहे ! परंतु अमक्याच नेमक्या वेळीं ह्या गोष्टी घडून येण्याचें निश्चित नसल्यामुळें कांहीं महिन्यांचे व वर्षांचें देखील अंतर पडण्याचा संभव आहे. साहेबांनीं राज्याचें (राज्यवर्धनाचें) १८ वर्षांचे, हर्षाचें १४ वर्षांचें व राज्यश्रीचें ११ वर्षांचें व तिला लागलींच (लवकर) ऋतु प्राप्त झाला ! याचा मेळ जमतो, असें ह्मटलें आहे. परंतु प्राचीन काळीं स्त्रीपुरुषांचें तारुण्य इतक्या अल्प वयांत सुरूं होणें हें कोणासहि खरें वाटावयाचें नाहीं ! या करितां हें साहेबांचें अनुमान चुकीचें आहे, असें वाटतें.

प्रभाकरवर्धनानें आपल्या दोघां मुलांनां जवळ सेवक कशाप्रकारचे बाळगावे, या विषयीं उपदेश करून मालवराजपुत्र कुमारगुप्त व माधवगुप्त हे माझ्या कसोटीस उतरलेले आहेत, याकरितां हे दोघे तुमच्याजवळ असूं द्या ह्मणून त्यानें त्यांची शिफारस करून त्यांनां बोलावून आणण्यास द्वारपालास सांगितलें आहे. व तो त्यांनां लागलींच घेऊन आला आहे. यावरून ते प्रभाकराच्या येथें बरेच दिवस राहिलेले असावे. याखेरीज त्यांनां '**बहुधापरीक्षितौ**' 'कसोटीस उतरलेले आहेत' असें कसें ह्मणतां येईल ? ह्या साहेबांच्या व इतर युरोपियनांच्या लेखांवरूनच हे गुप्तराजपुत्र प्रभाकराचे मामेभाऊ जर ठरतात, तर प्रभाकर त्यांस 'भृत्य' 'अनुचर' असें कधींहि ह्मणणार नाहीं व त्यानें त्यांनां बोलावून आणलें, तेव्हां त्यांनीं राज्यवर्धन व हर्ष यांनां देखील नमस्कार केले असल्याचें हर्षचरितांत वर्णन आहे ! प्रभाकराचे मामेभाऊ ह्मटले ह्मणजे ते त्याच्या पुत्रांचे पितृव्यसमान झाले. वडिलांनीं धाकट्यास नमस्कार करण्याची चाल आर्यलोकांत नाहीं. त्या कालीं बरोबरीचें नातें असलें तरी एकमेकांस भेटण्याची मात्र चाल होती. यावरून पुष्कळ युरोपियनांनीं जुळविलेलें हें नातें चुकीचें आहे असें वाटतें! याठिकाणीं देखील नामसादृश्य (महासेनगुप्त व महासेनगुप्ता) यावरूनच हें नातें जुळविलेलें दिसतें! ह्मणजे प्रभाकराच्या आईचें नांव महासेनगुप्ता असें आहे व यास शिलालेखांत आधार आहे. परंतु यावरूनच महासेनगुप्त नांवाचा राजा प्रभाकराची आई महासेनगुप्ता हिचा बिनदिक्कत सहोदर कसा ठरतो ? पक्कें नातें ठरविण्यास नामसादृश्याखेरीज आणखी दुसरा एकादा तरी पुरावा पाहिजे व तो कोणीहि दिलेला नाहीं! बहीणभावांचें नातें निश्चित होण्यासच जर अगदीं लंगडा पुरावा आहे तर पुढचें नातें ठरणें शक्यच नाहीं !

हर्ष हा सोळावे वर्षीं गादीवर बसला. असें इतर युरोपियन पंडितांप्रमाणेंच डॉ. होर्नले साहेबांनींहि ह्मटलें आहे. व्हिन्सेन्टस्मिथ याच्या इतिहासांत वगैरे यासंबंधानें टिपेंत शिलालेखांचे वगैरे आधार दिलेले

आहेत; परंतु ते प्रायः अनुमानधक्यानें ठरविलेले आहेत, असेंच प्रायः दिसतें! या ह्मणण्याच्या बळकटीकरितां साहेबांनीं हर्षचरितांत हर्षाला दोन वेळ 'बाल' ह्मटलें असल्याचें आढळतें, असें प्रतिपादन केलें आहे. (!) आतां राज्यवर्धन मालवराजावर स्वारी करण्यास निघाला तेव्हां हर्षानें "मीहि बरोबर येतों" असें ह्मटलें असतां राज्यवर्धनानें त्याचें निवारण करून "मीच जातों, तूं घरीं रहा" असें ह्मटल्यावर हर्षानें "यदि बाल इति" जर 'मी लहान आहे' तर मला सोडून जाणें योग्य नाहीं, मी वडिलांच्या जवळच पाहिजे!" असें म्हटले आहे. आर्यलोकांत कोणी मोठा झाला असला तरी वडील माणसाजवळ लहान ह्मणण्याचाच परिपाठ आहे. तसेंच—पुढें दिवाकरमित्रानेंहि "इतक्या लहान वयांत फारच विनय आढळतो" अशा प्रकारें हर्षास ह्मटलें आहे. हेंहि वरील संप्रदायासच अनुसरून आहे. यावरून हर्ष गादीवर बसण्याच्या वेळीं बालच होता असें ठरत नाहीं. तथापि सोळाव्या वर्षी जर यास बाल ह्मणतां येतें, तर पुढें तीन चार वर्षे गेलीं तरी त्याचें बालत्व अगदींच नष्ट होणार नाहीं!

प्रभाकराची पट्टराणी यशोवती ही माळव्याचा राजा यशोधर्मा विक्रमादित्य याच्या ह्या नांवांतील 'यशो' वरूनच त्याची मुलगी कशी ठरवितां येते? ह्याला आणखी दुसरा एकादा तरी चांगला पुरावा द्यावयास पाहिजे होता, परंतु तो साहेबांनीं दिलेला नाहीं! शिलादित्य हा त्याचाच मुलगा ठरविला आहे. त्याच्या वाट्यास 'यश' न जातां त्याचें दुसरें नांव 'विक्रमादित्य' यांतील 'आदित्य' गेला आहे व ह्मणूनच त्यानें क्रूर कृत्यें करून मोठा प्रकाश पाडला आहे कीं काय कोण जाणें!!! 'यशो' वरून यशोधर्म्याची मुलगी ठरविणें ह्मणजे सुतानें स्वर्ग गांठण्यासारखेंच साहस होय!

प्राचीन गुप्तराजाला हाकून देऊन आपण त्याच्या राज्याचा उपभोग घेणारा जर यशोधर्मा हा होता, तर तो कितीहि चांगला असला तरी मौखरी आणि वर्धन राजेहि 'महाराजाधिराज' इत्यादि पदवीधर होते, त्यानें

राज्य बळकावलें असल्याचें ते विसरले नव्हते, व त्यांचा माळव्याच्या राज्यावर हक्क पोहोंचत होता, तर त्यांनीं त्याजबरोबर शेवटपर्यंत अगदीं मूग कसे गिळले होते ! हें समजत नाहीं. साहेबांच्या ह्मणण्यावरूनच जर यशोधर्मा हा मोठा पराक्रमी होता, तर शिलालेखांतील व हर्षचरितांतील पुराव्यावरून प्रभाकर हा महापराक्रमी होता अशा विषयीं त्या काळीं असलेला बाण साक्ष देत आहे ! राजकारणांत हक्क पोहोंचत असल्यावर आणि अंगीं पराक्रम व एकमेकांस एकमेकांचा दुजोरा असल्यावर अशी साधुवृत्ति कोण स्वीकारणार आहे ? तेव्हां साहेबांचें हें ह्मणणें मनुष्यस्वभावाच्या अगदीं विरुद्ध आहे, असें वाटतें. यशोधर्म्याच्या पुढें ह्या दोघा प्रतिस्पर्ध्यांचें अगदीं चालत नव्हतें व त्यानें हूणांपासून संरक्षण केलें होतें, अशा विषयीं तसे आधारहि दिलेले नाहींत !

कोणाच्या नांवांतील नामैकदेशाच्या आधारावरून ती त्याची मुलगी किंवा मुलगा होत असल्याचें कसें अगदीं ठाम निश्चित करितां येतें, हें मला तरी समजत नाहीं ! कारण कांहीं नांवांचें पुरे साम्य सहजगत्या देखील जमून आलेलें आहे ! ह्या प्रकरणांतच 'आदित्यर्धन' व 'आदित्यवर्मन्' 'हर्ष' व 'हर्षा' हीं नांवें तर अगदीं पूर्णपणें देखील जमून आलीं आहेत, तर यांचें नातें कोणतें जुळवावयाचें ?

" राज्य (राज्यवर्धन) घाईघाईनें मिळविलेले घोडेस्वार घेऊन मालवराजावर गेला " असें साहेबांनीं ह्मटलें आहे. परंतु तसें नसून तो दहाहजारच घोडेस्वारांनिशीं भंडीस बरोबर घेऊन युद्धास गेला आहे ! 'बाकीचें पुष्कळ सैन्य तुजजवळच असूं दे' असें त्यानें हर्षास ह्मटलें आहे. यावरून घाईनें मिळाले तितकेच स्वार घेऊन तो गेला, हें साहेबांनीं नीट न पाहतांच लिहिलें आहे !

" ग्रहवर्मा हा माळव्याच्या राज्यावर हक्क सांगणारा होता. ह्मणून त्यावर मालवराजानें स्वारी केली. " यास चांगला आधार दिलेला नाहीं. " मालवलक्ष्मीलतापरशुः " असा प्रभाकरवर्धन बारल्यामुळें त्याचे मुलगे व

जावइ अल्पवयस्क पाहून त्यानें त्यांची राज्यें घेण्याकरितां असें साहस केलें असावें असें मला वाटतें.

"हूण व मालव हे एकमेकांचे साथीदार होते," असें साहेबांनीं ह्मटलें आहे, परंतु याबद्दल हर्षचरितांत कोठें अल्पदेखील पुरावा नाहीं. **'मालवलक्ष्मी-लतापरशुः' 'हूणहरिणकेसरी'** ह्या बाणानें प्रभाकरास दिलेल्या विशेषणा-वरूनच हूण हे मालवाचे साथीदार होते, असें अनुमान करावयाचें तर **'सिन्धुराजज्वरः' 'गुर्जरप्रजागरः' 'लाटपाटवपाटच्चरः' 'गांधारद्विप-कूटपाकलः'** इत्यादि प्रभाकराच्या पराक्रमामुळें त्याला लावलेल्या विशे-षणांत ह्मटलेले राजेदेखील मालव व हूण यांनां साहाय्यकारी होते, असें कां ह्मणूं नये ? तेव्हां नुसत्या कल्पनेच्या तरंगांवर ऐतिहासिक गोष्टी ठरविणें हें अगदीं अप्रशस्त आहे. तसेंच नुसत्या विशेषणावरून पहिली लढाई अमुकवर्षीं झाली असावी, असें ठरविणेंहि साहसाचें आहे !

' भंडी हें भंड या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश असावा व याचा अर्थ विदुषक किंवा नकल्या असा आहे. ' असें साहेब ह्मणतात. आतां भंड ह्मणून एक वेदाचा कर्ता असल्याबद्दल चार्वाकानें ह्मटलें आहे. यावरूनहि कदाचित् भंडि झालें असेल. किंवा 'भंडि' हें तरंगाचें नांव आहे यावरून कदाचित् हेंच नांव यास ठेवलें असेल ! अथवा भंड-भंडन याचा अर्थ कवच असा आहे यावरून भंड ज्याला आहे तो भंडी ह्मणजे कवची (योद्धा) असें होतें; तेव्हां यामुळेंहि कदाचित् हें सार्थ नांव त्याला लाविलें असेल ! साहेबांनीं भंड याचा विदूषक हाच अर्थ घेऊन हें नांव राजपुत्रास योग्य नाहीं, असें ह्मणण्याचें कारण त्यांनां हूणपक्ष सिद्ध करा-वयाचा असल्यामुळें स्वपक्ष समर्थनाकारितां हा अर्थ त्यांनीं बुद्धचाच घेतला असल्याचें दिसतें ! परंतु हें हूणांचें नांव असावें किंवा हें ठेविल्यामुळें हूणांकडे त्याचा ओढा असल्याचें सिद्ध होतें ! असें साहेबांचें ह्मणणें बरो-बर वाटत नाहीं.

राज्यश्रीच्या जन्माच्या वेळेस यशोवतीच्या भावानें आपल्या बहिणीच्या घरीं आपला मुलगा भंडी यास राज्यवर्धन व हर्ष ह्यांच्या सहवासास आणून ठेविलें. त्यावर प्रभाकराचें आपल्या पुत्राप्रमाणें व त्याच्या पुत्रांचें भावाप्रमाणें प्रेम होतें, तें ठीकच. कारण, तो राजपुत्रांचा मामेभाऊच होता. त्याच्याशीं प्रभाकराचा वैरसंबंध असता तर त्यावर प्रभाकराचें व त्याच्या पुत्राचें इतकें प्रेम कसें राहतें ? साहेबांनीं यशोवतीचा भाऊ ठरविलेल्या शिलादित्यानें भाचीच्या नवऱ्यास मारणें, त्यानें अनाथ झालेल्या आपल्या भाचीस बिड्या ठोकून बंदींत टाकणें, शत्रु ठरलेल्या शिलादित्याशीं युद्ध करण्याकरितां शत्रुपुत्राच्या (भंडीच्या) ताब्यांत राज्यवर्धनानें दहा हजार घोडेस्वार देऊन त्याची मदत त्याच्याच बापा विरुद्ध लढण्यास घेणें, साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें दहा बारा वर्षांत बापलेक ऐकून देखील एकमेकांस माहित नसणें, व त्यांची अगदीं ओळख देखील पार बुजून जाणें, भंडीसारख्या चाणाक्ष व तेजस्वी आठ वर्षांच्या मुलाला आपल्याला बाप आहे किंवा नाहीं व तो कोठला कोण? याचें भान देखील न राहणें, त्यानें शत्रुपुत्राबरोबर आपल्या बापाशींच लढाईस जाणें, त्याचा पराभव करण्यास मदत करणें, आणि राज्यवर्धन मारला गेला तरी बापाच्या दरबारांतील स्त्रिया, त्यांचे अलंकार, छत्रचामरें, वगैरें राजसंपत्ति बुचाडून घेऊन मूल असलेल्या राजपुत्रा (हर्षा) कडेच परत येणें, तसेंच ह्युएनसँगच्या लेखांवरून हाडवैरी †शिलादित्याशीं हर्षानें शरीरसंबंध करणें, वगैरे प्रकार असंभाव्य, मनुष्यस्वभावाविरुद्ध व खरो-

---

†माळव्याच्या शिलादित्यराजाचा पुतण्या हा हर्षाचा जावई असल्याचें ह्युएनसंगचे वर्णनांत असल्याबद्दल आढळून येते तो मजकूर खालीं दिला आहे.

'The present king (Valabhi) is of the Kshatriya Casta as they all are. He is the nephew of Siladitayaraja of Malwa and son-in-law of son of Siladitya the present king of Kanyakubja. Hiuen Tsiang. Vol. II p. 267.'

खरीच फारच चमत्कारिक वाटतात! यामुळें नामैकदेशावरून **यशो-**धर्म्याची ठरविलेली मुलगी **यशोवती** ही त्याची मुलगी असल्याबद्दल व ती **शिलादित्याची** बहीण असल्याबद्दल मोठीच शंका वाटते व साहेबांनीं नांवांतील ' यशो ' वरून जोडलेला संबंध बरोबर असेलसें वाटत नाहीं ! याबद्दल आणखी कांहीं प्रमाणें द्यावयास पाहिजे होतीं, परंतु तीं त्यांनीं दिलेलीं नाहींत ! यावरून साहेबांचें हें तर्कशास्त्र अगदीं चुकीचें आहे, असें वाटतें.

" **महासेनगुप्ताच्यामागें देवगुप्त** गादीवर बसला व लागलींच त्यानें सार्वभौम पदवी धारण केली. यामुळें **प्रभाकराचें** व त्याचें युद्ध होणें स्वाभाविक आहे " असें साहेबांनीं ह्मटलें आहे. आतां हर्षचरितावरून पाहतां **प्रभाकर** वारल्यावर **राज्यवर्धन मालवराजावर** स्वारी करण्यास गेला, तेव्हां **मालवराज–देवगुप्त** याचा व **राज्यवर्धन** याचा लढा होण्याचा प्रसंग आला या पूर्वीं **प्रभाकराचा** व **देवगुप्त** याचा विरोध होण्याचा संभवच नाहीं. असें असून साहेबांनीं असें कसें ह्मटलें तें समजत नाहीं. !

अफसडशिलालेखांतील **माधवगुप्त** हाच हर्षचरितांत वर्णिलेला **माधवगुप्त** यांत बिलकूल शंका नाहीं. परंतु **वाकाटकच्या** शिलालेखांतील **देवगुप्त** मात्र निराळा याचा व **कुमार** व **माधव** यांचा संबंध तरी नसावा. (निदान सहोदर संबंध तरी नसावा.) यांतील **देवगुप्त** व **हूण–राजा प्रवरसेन** यांचा परस्पर कांहीं आप्तसंबंध असल्याबद्दल त्या शिलालेखांतच पुरावा मिळतो. यावरून हा **मालवराज** निराळा असावा व हाच **ग्रहवर्म्यास** मारणारा असावा. आतां **महासेनगुप्त** जर **प्रभाकराचा** मामा होता, असें ह्या व इतर युरोपियनांच्या लेखांवरून ठरतें, तर त्याचे मुलगे **प्रभाकराच्या** बरोबरीचे ह्मणजे त्याच्या समान पिढीचे (मामेभाऊ) होतात. ह्या ठिकाणीं साहेबांनीं जुळविलेल्या समानकालीन पद्धतीचा मला मोठा घोटाळा वाटतो आहे ! व यांत माझी तरी मति चालत नाहीं ! साहेबांची खिंड बुजाविण्याची गारुडी विद्या मला बिलकूल समजत नाहीं, व संमत नाहीं ! अफसडशिलालेखांत **'तस्मादभूत'**

याचा अर्थ 'He came from Mahasena' असा कसा होतो ? याचा अर्थ सुत किंवा तनय याप्रमाणें माधव हा महासेनापासून झाला (ह्मणजे पुत्र) असा सरळ होत असतां असा भलताच अर्थ कशा करितां केला ? हें मला मुळींच समजत नाहीं व तसा त्याचा अर्थहि होत नाहीं.

"हिरण्यगर्भो भुवनाण्डकादिव क्षपाकरः क्षीरमहार्णवादिव।
अभूत्सुपर्णो विनतोदरादिव द्विजन्मनामर्थपतिः पतिस्ततः।"
कादंबरी.

या बाणकवीच्या पद्यांत विनतेच्या उदरापासून गरुड जसा उत्पन्न झाला (म्हणजे पुत्र) तसा त्याला अर्थपति हा (पुत्र) झाला असाच अर्थ होतो. (व असे आणखीहि पुष्कळ प्रयोग आहेत) असें असून साहेबांनीं असा कसा अर्थ केला तें मात्र समजत नाहीं !

गयाप्रांतांत अफसड येथें १८ ९० त शिलालेख सापडला तो छापलेला आहे. तो बराच मोठा आहे. त्यांत सिंहासनारूढ गुप्तराजांचीं वंशावळ दिलेली आहे व पुढील मुद्याचे श्लोकहि आहेत. ते असेः--

" आजौ मया विनिहता बलिनो द्विषन्तः
कृत्यं न मेऽस्त्यपरमित्यवधार्य वीरः
श्रीहर्षदेवनिजसंगमवांछया च

* * * * "

" वसुदेवादिवतस्माच्छ्रीसेवनशोभोदितचरणयुगः।
श्रीमाधवगुप्तोऽभून्माधव इव विक्रमैकरसः ॥ "

पहिल्या श्लोकांत माधवगुप्तानें हर्षाबरोबर पराक्रम केल्याबद्दल आणि हर्षराजाचा व माधवगुप्ताचा सहवास असल्याबद्दल साक्ष पटत आहे ! यांतील चौथा चरण शिलालेखांतच अगदीं अस्पष्ट असावा, ह्मणून तो तेथें दिलेला नाहीं.

दुसऱ्या श्लोकाचा अर्थ वसुदेवाला जसा कृष्ण (पराक्रमादिगुणसंपन्न) झाला, तसा महासेनाला माधव (गुप्त) ' विक्रमैकरस ' पराक्रमी झाला. दोघे मुलगे पराक्रमादि अलौकिक गुणांनीं युक्त असले म्हणजे त्यांनां

रामकृष्णाचीच मात्र उपमा देण्याचा परिपाठ आहे. वसुदेवाचीं इतर अर्भकें उपजतांच कंसानें दगडावर आपटून मारलीं असल्यामुळें तीं कोठेंहि कोणी उपमानांत घेतल्याचें आढळत नाहीं! फक्त रामकृष्ण हे दोघेच मात्र उपमेंत घेण्याचा संप्रदाय आहे. त्याप्रमाणें येथें धाकटा माधव यास कृष्णाचा उपमेय केला आहे. व ह्यावरून वडील कुमार अर्थातच बलरामाचा उपमान असल्याचे सूचित होत आहे! होर्नलेसाहेबांनीं खिंडींत नेण्याकरितां वसुदेवाच्या दृष्टांतावरून महासेनास द्राविडीप्राणायामानें तिसरा देवगुप्त कोठला तरी आणून देऊन तो त्याच्या राज्यावरहि बसविला आहे! साहेबांनीं ह्या देवगुप्तास खिंडींत ओढून नेण्याचा प्रयत्न करून त्या बिचाऱ्याचे जे हाल केले आहेत ते सांगतां पुरवत नाहींत! वसुदेवाच्या दृष्टांतांत उपजतांच मारलेले मुलगे कोठेहि कोणी उपमेंत घेतलेले नाहींत. तसे गुण असले तर फक्त रामकृष्ण हे दोघे मात्र घेतलेले असतात. याला दुसरीकडचीं दूरचीं उदाहरणें शोधावयास नकोत! हर्षचरितांतच "**देव्या देवक्या इव चक्रपाणिर्यशोवत्या हृदये गर्भे च सममेव संबभूव हर्षः**" ह. च. उ. ४.

येथें हर्ष हा धाकटा ह्मणून शिलालेखांतल्या प्रमाणेंच त्याला कृष्णाची उपमा दिली आहे! अर्थात्च राज्यवर्धन बलरामासारखा वडील ह्मणून दाखवावयास नकोच! आतां येथें यशोवतीला देवकीची उपमा दिली आहे. तीवरून यशोवतीला आठ मुलें होती, असें कोणीं तर्कशास्त्र चालविलें तर किती असमंजसपणाचें होणार आहे? साहेबांनीं तर्कगारुडानें आणून भिडविलेला देवगुप्त हा अफसडशिलालेखांतील राज्यावर बसलेल्या गुप्तराजांच्या नामावळींत आढळत नाहीं. ह्मणून साहेबच ह्मणतात, तें ठीकच! ज्याचा माधवगुप्ताच्या वंशांत अभावच आहे, तो त्या वंशांतील राज्यारूढ झालेल्या नृपतींच्या नामावळींत सापडेल कोठून? "साळ्याच्या गाईला माळ्याचें वासरूं आणून बिलगाविलें" तर त्यास लाथा मिळून त्या बिचाऱ्या वासराचे मात्र हाल होणार आहेत! हाच न्याय येथें लागू पडतो! साहेबांनीं तो गुप्तराजांच्या नामावळींत नसण्याचे जे मुद्दे दिले आहेत

ते सर्व कागदी घोडे नाचविले आहेत ! वस्तुतः त्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. ' आफसडशिलालेखांत देवगुप्तानें राज्य केल्याबद्दल उल्लेख नाहीं. ' असें होर्नले साहेबच ह्मणतात. हा भलतीकडचाच ओढून आणलेला जर देवगुप्त आहे, व म्हणून त्याचा शिलालेखांत दिलेल्या राज्यपदस्थित पुरुषांत अभावच जर आहे तर तो राज्य कोठून करणार ! आधारालाच जर ठिकाण नाहीं तर आधेय कोठून असणार! वाकाटकशिलालेखांतला देवगुप्त राजाधिराज असला तरी तो निराळाच असला पाहिजे. त्याचा व माधवगुप्ताचा बिलकूल संबंध नसावा ! निदान या उभयतांचें सहोदर-त्वाचें नातें तरी नसावें, असें उघड दिसतें !

मालवराजानें ग्रहवर्म्यास मारल्यावर राज्यवर्धन हा मालवराजावर चालून गेला व त्याचा त्यानें नाश केला. परंतु गौडराजानें राज्यवर्धनाला विश्वासघातानें फसवून मारलें. आतां हा मालवराज हर्षाच्या शिला-लेखांत ह्मटलेला देवगुप्तच असला पाहिजे. याच्या संबंधानें तो माळव्याचा राजा असल्याबद्दल साहेबांस कबूल आहेच व हा माळव्याचा राजा अस-ल्याबद्दल (Epigra-Ind-1,70) यांतहि आधार आहेच. माळव्याच्या संबंधानें हर्षाच्या शिलालेखांतील देवगुप्त हाच ग्रहवर्म्यास मारणारा मालव राज असला पाहिजे, असें उघड दिसतें. ह. च. उ. ७ यांत राज्य-वर्धनानें मालवराजास जिंकल्यामुळें त्याची छत्रचामरादि राज्यलक्ष्मी, पायांत बिड्या ठोकलेले (संयत) मालवराज-लोक वगैरे सर्व भंडीनें मार्गांत हर्षास दाखविले आहेत! शिलालेखांतहि ' सर्वे समं संयताः ' असें आहेच. यावरून शिलालेखांतला देवगुप्त व हर्षचरितांतील मालवराज हे एकच असले पाहिजेत. आपल्या बहिणीची अशी दुर्दशा केली ह्मणूनच क्रोधानें राज्यवर्धनानें मालवराजाचा सर्वथैव मोड करून त्याला बांधून चाबकानें झोडून काढल्याबद्दल शिलालेखांत हर्षानें ह्मटलें आहे व मालव-राजाचें देवगुप्त असें स्पष्ट नांव देऊन त्यास शिक्षा केल्याबद्दल आपल्या बंधूच्या पराक्रमाचें त्यानें वर्णन केलें आहे ! साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें शिलादित्य हा युद्धांत मुख्य पुढारी होता व देवगुप्त त्याचा मदतगार

होता, तर हर्षानें मुख्य पुढारी असलेल्या शिलादित्याचेंच नांव शिलालेखांत दिलें असतें! मधुबन व बंस्खेर ह्या दोन्ही शिलालेखांतहि स्वतः हर्षानें ज्या अर्थी शत्रूचें देवगुप्त हेंच नांव दिलें आहे व त्यांत राज्यवर्धनानें देवगुप्तादि शत्रूंचा खरपूस समाचार घेतला असल्याचें वर्णन केलें आहे. त्या अर्थी देवगुप्त हाच मुख्य ग्रहवर्म्यास मारणारा मालवराज असला पाहिजे. शिलादित्य हा मुख्य व देवगुप्त हा साहाय्यकर्ता, असें साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें असतें तर शिलादित्याचेंच नांव हर्षानें ताम्रपत्रांत दिलें असतें. परंतु ज्याअर्थी तसें केलें नाहीं त्या अर्थी देवगुप्त हाच मालवराज व मुख्य शत्रु असला पाहिजे, व ह्मणूनच त्याचेंच नांव त्यानें दिलें आहे. हें कोणाच्याहि ध्यानांत येण्यासारखें आहे.

प्रभाकराच्या पुढें मालव, गौड, गुप्त, तसेंच हूण वगैरे इतर राजे यांचें कांहींच चालत नव्हतें. यामुळें तो मृत्यु पावतांच त्याचीं मुलें व जावई अल्पवयस्क पाहून त्यांनीं कट करून असा त्यांचा घात केला, असें उघड लक्षांत येण्यासारखें आहे. राज्यवर्धनानें मालवराजाचा सर्वथैव पराभव केल्यावर त्या कटांतील गौडशशांकानें मोठें अगत्य दाखवून व फसवून राज्यवर्धनास आपल्या घरीं नेऊन त्याचा विश्वासघात केला. हर्षचरितांत " **गौडाधिपेनमिथ्योपचारोपचितविश्वासं मुक्तशस्त्रमेकाकिनं विश्रब्धं स्वभवन एव भ्रातरं व्यापादितमश्रौषीत्** " असें आहे. हर्षाच्या दोन्ही शिलालेखांतहि "**प्राणानुज्झितवानरातिभवने सत्यानुरोधेन यः**" असें आहेच. ह्या सर्वांचा मेळ जमतो!

गंजामताम्रपत्रांत शंशाकराजा राज्य करीत असतां त्याच्या शकास गुप्तशकच ह्मटलें आहे. यावरून हा पूर्वेकडचा गुप्तराजा होता. यास "गौड" असेंहि ह्मटलें आहे. " **कान्याकुब्जाद्गौडसंभ्रमम्** " कनोजहून जातांनां गौडशशांकाची राज्यवर्धनास फसवून त्याचा खून करण्याच्या कामांत मोठी गडबड उडाली होती! असें या पदावरून दिसतें. हा शशांकगुप्त यानें किंवा याच्याच दुसऱ्या गुप्तसरदारानें कनोज हें आपल्या ताब्यांत घेतलें, असें " **गुप्तानाम्ना च गृहीते कुशस्थले** " असें भंडीनें

हर्षास सांगितलें आहे, यावरून उघड होतें. तसेंच “ गुप्तितो गुप्तनाम्ना कुलपुत्रेण निष्कासनम्” । ‘बंदिशाळेंतून गुप्तनांवाच्या सरदारानें (राज्यश्रीस) काढून दिलें ! असें राज्यश्रीच्या सख्यांनीं हर्षास सांगितलें आहे. यावरून ह्या गुप्तराजानें किंवा त्याच्या गुप्तसरदारानें राज्यश्रीस अनाथ समजून सोडून दिलेंसें दिसतें ! यामुळें साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें हा गुप्त तिरस्कारास पात्र नसून अत्यंत आदरास पात्र होता ! म्हणूनच त्यानें त्यास ‘ कुलपुत्र ’ म्हटलें असल्याचें बाणाच्या वर्णनांत आहे. बाणानें मालव, गौड, हूण ह्या नेहमीच्या ह्मणण्याच्या पद्धतीनें यालाहि गुप्त असें ह्मणून पुढें आदरानें ‘गुप्तकुलपुत्र ’ असेंहि ह्मटलें आहे. असाच संबंध बरोबर जुळतो यांत शंका नाहीं !

वाकाटकशिलालेखांतील व हर्षशिलालेखांतील देवगुप्त एकच असें हार्नलेसाहेब बिनदिक्कत ठरवितात, परंतु हे दोघे एक नसून निराळे असावे. डॉ. बुलर, फ्लीट व किल्हॉर्न ह्या यूरोपियन पंडितांची देखील यासंबंधानें व कालनिर्णयाच्या संबंधानें खात्रीची एकवाक्यता नाहीं. यावरून हे दोघे एक नसून निराळेच असले पाहिजेत व ह्मणूनच अफसडशिलालेखांतील राज्यकर्त्या पुरुषांत देवगुप्ताचें नांव नाहीं तें ठीकच !

“ गौडशशांकराजानें राज्यवर्धनाचा खून केला,त्यांत देवगुप्त हा सामील होता,” असें साहेब ह्मणतात. परंतु ही उलट गोष्ट कशी घडावी ? राज्यवर्धनानें देवगुप्तादिक राजांनां बिडद्या ठोकून चाबकानें झोडून काढल्याबद्दल हर्षानें स्वतः आपल्या दोन्ही शिलालेखांत ह्मटलें आहे, यावरून देवगुप्त हा पूर्वींच जर शत्रूच्या पुरा तावडींत सापडून ‘सर्वे संमं सयताः’ ह्मणजे सर्व बिडद्या ठोकलेले केल्याबद्दल शिलालेखांत व हर्षचरितांतहि ‘ संयत ’ असेंच जर वर्णन आहे, तर तो गौडशशांकास राज्यवर्धनाचा खून करण्याच्या कामांत मदत करण्यास कोठून व कसा जाणार ? यावरून साहेबांनीं स्वतः हर्षाचा शिलालेख व हर्षचरित हीं नीट न पाहतांच सिद्धांत ठोकून दिले आहेत असें दिसतें !!

कनिंगह्याम नें गौडास नरेंद्रगुप्त ह्मटलें आहे. हुएनसँगच्या पुस्तकाचा इंग्रजी भाषांतरकर्ता मि. बील यानें आपल्या सियूकी १,२१० न. १५ मध्यें शशांकाचें हें नांव दिलें आहे. हर्षचरिताच्या लेखी प्रतींतहि डॉ. बुलर यांस हें नांव आढळल्याबद्दल ह्मटलेलें आहे. असें असून डॉ. होर्नलेसाहेब, थामस व कावेल यांच्या हर्षचरिताच्या भाषांतरांत हें नांव कोठें आढळत नाहीं. तेव्हां हे सर्व आधार खोटे असल्याचें ठरवितात. यावरून फक्त भाषांतरावरूनच वरवर पाहून साहेबांनीं "चुटक्यांचे मांडव!" तयार केले आहेत, असें दिसतें! हर्षचरितांत एके ठिकाणीं श्लेषांत हें नांव आढळतें. गौडानें आपल्या प्रियबंधूचा प्राणघात केल्यामुळें, हर्ष रागावला आहे. त्याठिकाणीं बाणानें "**महाशीविषइव दुर्नरेन्द्राभिभव-रोषितः**" असें ह्मटलें आहे. दुर्नरेन्द्र ह्मणजे कच्चा मांत्रिक विषवैद्य (गारुडी) असला ह्मणजे त्यावर मोठा भुजंग जसा रागानें फूत्कार टाकतो त्याप्रमाणें दुष्ट '**नरेन्द्र**' (**गुप्त**) यानें केलेल्या पराभवामुळें हर्ष तसा त्यावर रागावला, असें बाणानें खुबीनें त्याचें नांव सूचित केलें आहे!

यूरोपियन पंडितांप्रमाणें अनुमानधक्यानें कालनिर्णय अगदीं पक्का निश्चित करण्याचें धाडस मी करीत नाहीं. ई. सनाच्या सहाव्या शत-काच्या उत्तरार्धांत व सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत ह्या गोष्टी घडून आल्या; एवढें मात्र खरें आहे!